# पवनापर्व

## विश्वासाची सुवर्णझेप

ज्ञानदेवें
रचिला पाया
तुका झालासे
कळस

पवना सहकारी बँक लि. पुणे

सुवर्णमहोत्सव स्मरणिका

सुवर्ण महोत्सवी वर्ष १९७३-२०२३

# पवनापर्व

## विश्वासाची सुवर्णझेप

### पवना सहकारी बँक लि. पुणे

सुवर्णमहोत्सव स्मरणिका

पवना सहकारी बँक लि.

सचोटी सहकार समृध्दी

PSB

स्फूर्तिस्थान



संस्थापक

**सहकार महर्षी खा. स्व. अण्णासाहेब मगर**

दीपस्तंभ



**श्री. ज्ञानेश्वर पांडुरंग लांडगे**

संस्थापक-अध्यक्ष, पवना सहकारी बँक लि. पुणे
मा. आमदार, प्रथम महापौर पिंपरी-चिंचवड महापालिका




PAVANA SAHAKARI BANK LTD.
मुख्य कार्यालय

# प्रवर्तक (१९७३)


अण्णासाहेब मगर


ज्ञानेश्वर लांडगे


मामासाहेब पिंपळे


शंकरलाल मुथा


एकनाथ नाणेकर


विष्णू गावडे


दिगंबरशेठ काळभोर


रघुनाथ गावडे


पांडुरंग काळभोर


सदाशिव फुगे


बाजीराव काळभोर


हरिभाऊ वाघेरे


नामदेव गायकवाड


बबन चिंचवडे


शिवराम नलावडे

नंबर : पीएनजे/बीएनवे/२३६ सन १९७२

महाराष्ट्र शासन

# नोंदणीचे प्रमाणपत्र

या प्रमाणपत्राद्वारे प्रमाणित करण्यात येत आहे की, पवना सहकारी बँक लि., चिंचवड, पुणे १९. ही संस्था महाराष्ट्र राज्य सहकारी संस्थांचे अधिनियम, १९६० मधील (सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४) कलम ९ (१) अन्वये नोंदण्यात आलेली आहे.

उपरिनिर्दिष्ट अधिनियमाच्या कलम १२(१) अन्वये व महाराष्ट्र राज्य सहकारी संस्थांचे नियम, १९६१ मधील नियम क्रमांक १०(१) अन्वये संस्थेचे वर्गीकरण सहकारी बँक. असून उप-वर्गीकरण इतर (बँक) नागरी बँक. आहे.

कार्यालयीन मोहोर :

सही

स्थळ पुणे.

हुद्दा (मो. वा. फडतरे.)
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे.

दिनांक : २२ जुलै १९७२.

## ५० वर्षांतील संचालक


दत्तात्रय कुदळे


जीवराज शिंदे


गजानन बारणे


रामेश्वरसिंह तपस्वी


भाऊसाहेब वाघेरे


सुभाष चिंचवडे


दत्तात्राय गव्हाणे


चंद्रकांत लांडगे


काळूराम बोऱ्हाडे


सदाशिव नाणेकर


तुकाराम काळभोर


दत्तात्रय लांडगे


शामराव फुगे


मोरेश्वर मासुळकर


यमुनाबाई गावडे


सुमनताई फुगे


अशोक नलावडे


ऊर्मिला काळभोर


विठ्ठल काळभोर


दामोदर गव्हाणे


रामभाऊ पिंपळे


वसंत लोंढे


दत्तात्रय दातीर


शिवाजी वाघेरे


चंद्रकांत नाणेकर

# ५० वर्षांतील संचालक


वसंत गावडे


राजशेखर डोळस


रमेश वाघेरे


सुरेश कुऱ्हाडे


शालिनी इंगळे


शकुंतला साठे


शांताराम गराडे


गणेश पिंजण


नितीन नाणेकर


जितेंद्र लांडगे


जयनाथ काटे


जयश्री गावडे


अजित गव्हाणे


शरद काळभोर


सुनील गव्हाणे


सचिन चिंचवडे


अमित गावडे


संभाजी दौंडकर


सचिन काळभोर


चेतन गावडे


बिपीन नाणेकर


दादू डोळस

## व्यवस्थापन मंडळ २०२३-२८



**श्री. शांताराम गराडे**
अध्यक्ष



**श्री. ज्ञानेश्वर लांडगे**
सदस्य



**श्री. विठ्ठल काळभोर**
सदस्य



**ॲड. विठ्ठल ठाकूर**
सदस्य



**श्री. गणेश पिंजण**
सदस्य



**सी. ए. राजेंद्र पाटील**
सदस्य

## ५० वर्षातील तज्ज्ञ संचालक



**सी. ए. मोरेश्वर काळभोर**



**ॲड. गोरक्षनाथ काळे**



**ॲड. विठ्ठल ठाकूर**



**श्री. विश्वनाथ वाखारे**



**ॲड. नितीन लांडगे**



**सी. ए. विजय सायकर**

# संचालक मंडळ २०२३-२८



**श्री. ज्ञानेश्वर लांडगे**
संस्थापक-अध्यक्ष



**श्री. जयनाथ काटे**
उपाध्यक्ष



**श्री. विठ्ठल काळभोर**
संचालक



**श्री. शांताराम गराडे**
संचालक



**श्री. वसंत लोंढे**
संचालक



**श्री. शामराव फुगे**
संचालक



**श्री. शिवाजी वाघेरे**
संचालक



**श्री. जितेंद्र लांडगे**
संचालक



**श्री. सुनिल गव्हाणे**
संचालक



**श्री. शरद काळभोर**
संचालक



**श्री. अमित गावडे**
संचालक

# संचालक मंडळ २०२३-२८



**श्री. सचिन चिंचवडे**
संचालक



**श्री. सचिन काळभोर**
संचालक



**श्री. चेतन गावडे**
संचालक



**श्री. बिपीन नाणेकर**
संचालक



**श्री. दादू डोळस**
संचालक



**सौ. जयश्री गावडे**
संचालक



**ॲड. उर्मिला काळभोर**
संचालक



**श्री. संभाजी दौंडकर**
संचालक



**ॲड. गोरक्षनाथ काळे**
तज्ज्ञ संचालक



**ॲड. नितीन लांडगे**
तज्ज्ञ संचालक



**श्री. मनेश बोऱ्हाडे**
मुख्य कार्यकारी अधिकारी

PSB

सुवर्ण महोत्सवी वर्ष १९७३-२०२३



प्रस्तावना

# ॥ ज्ञानदेवें रचिला पाया तुका झालासे कळस ॥

**संतकृपा झाली। इमारत फळा आली।।**
**ज्ञानदेवें रचिला पाया। उभारिलें देवालया।।**
**नामा तयाचा किंकर। तेणें रचिलें तें आवर।।**
**जनार्दन एकनाथ। खांब दिधला भागवत ।।**
**तुका झालासे कळस। भजन करा सावकाश।।**

संत बहिणाबाईंच्या या अभंगात वारकरी संप्रदायातील भक्तिरूपी मंदिराच्या उभारणीत सर्व संतांच्या योगदानाचं रूपकात्मक वर्णन आहे. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माउलींनी या मंदिराचा पाया रचला, जगद्‌गुरू संत तुकाराममहाराजांनी भक्तीचा कळस चढवला. त्यातून इमारत फलद्रूप झाल्याचा भक्तिभाव आहे. अशाच स्वरूपात पवना बँकेच्या सहकाररूपी मंदिराच्या उभारणीचा पाया अण्णासाहेब मगर यांच्याबरोबरीनं ज्ञानेश्वरजी लांडगेसाहेब आणि सहकाऱ्यांनी पन्नास वर्षांपूर्वी रचला. लांडगेसाहेबांच्या नेतृत्वाच्या भक्कम पायामुळे ही इमारत फलद्रूप झाली. पवनेच्या आर्थिक पाठबळाच्या प्रवाहाने सर्वसामान्यातील अनेकांचं जीवन अंकुरलं, फुललं आणि सुजलाम-सुफलाम झालं. जनसामान्यांच्या विश्वासाचं भक्कम बळ, संचालक मंडळाचं निःस्वार्थी काम आणि त्याला अधिकारी-कर्मचाऱ्यांकडून मिळणारी साथ, यामुळे पवना बँकेच्या सहकाररूपी मंदिरावर आज सुवर्णमहोत्सवी यशाचं कलशारोहण झालं आहे.




# ॥ ज्ञानदेवें रचिला पाया तुका झालासे कळस ॥

तरुण वयात सरपंच म्हणून गावाचं नेतृत्व आणि त्यानंतर स्थापन झालेल्या नगरपालिकेत शहराचं प्रतिनिधित्व करणारे ज्ञानेश्वरजी लांडगेसाहेबांसह त्यांच्या सहकाऱ्यांच्या मनात पन्नास वर्षांपूर्वी बँक काढण्याचं स्वप्न रुजलं. मोठ्या कष्टानं, सचोटीनं आणि निःस्वार्थ भावनेनं हे स्वप्न त्यांनी प्रत्यक्षात आणलं आणि जोपासलं. आज त्याचं जनसामान्यांच्या कल्पवृक्षात रूपांतर झालं. पवना सहकारी बँक, असं त्याचं नाव ! देशातील एक महत्त्वाचं औद्योगिक शहर म्हणून पिंपरी-चिंचवड शहराचा नावलौकिक आहे. छोट्या-मोठ्या गावांचं एकत्रीकरण करून नगरपालिका स्थापन झाली. शहराचा झपाट्यानं विकास झाल्यानं महापालिकेत रूपांतर झालं. शहराच्या या जडण-घडणीत मोलाचा वाटा असणाऱ्या संस्थांमध्ये सहकार क्षेत्रात पवना सहकारी बँकेचा सहभागही उल्लेखनीय आहे. उद्योगधंदे मोठ्या प्रमाणावर वसल्यानं शहराचा विकास झपाट्यानं झाला. त्या उद्योग- व्यवसायांत शहरातील भूमिपुत्र, शेतकरी, कामगार आणि सामान्य माणसांचाही वाटा आहे. याच सर्व घटकांना आर्थिक पाठबळ देऊन उभे करण्यात पवना बँक



अग्रेसर ठरली. त्यातूनच जनसामान्यांच्या विश्वासाचं मोठं भांडवल बँकेनं कमावलं आणि त्याच जोरावर आज मोठ्या दिमाखात सुवर्णमहोत्सवी वर्षांत झेप घेतली आहे.

पिंपरी, चिंचवड, भोसरी आणि निगडी-आकुर्डी या चार ग्रामपंचायतींचं एकत्रीकरण करून १९७० मध्ये पिंपरी-चिंचवड नगरपालिकेची स्थापना झाली. अण्णासाहेब मगर शहराचे शिल्पकार ठरले . ज्ञानेश्वरजी लांडगेसाहेब त्या काळी भोसरीचे सरपंच होते. नगरपालिकेच्या स्थापनेनंतर नामनिर्देशित समितीमध्ये अण्णासाहेब अध्यक्ष आणि लांडगेसाहेब उपाध्यक्ष होते. नगरपालिकेच्या विभागात प्रामुख्यानं शेतकरी राहत होता. कामगार आणि व्यावसायिकांचा त्यात काही प्रमाणात सहभाग होता. शहरात औद्योगिकीकरण होत असताना छोट्या-मोठ्या व्यवसायासाठी अनेकांना कर्जाची गरज भासत होती. शेतकरी, कामगारांना विविध कारणांसाठी आर्थिक पाठबळाची गरज होती. लांडगेसाहेब आणि त्यांच्या सहकाऱ्यांना गावांत वावरताना ही स्थिती दिसत होती. त्या काळात राष्ट्रीयीकृत बँकांचा उदय झाला होता. पण, या बँका सर्वसामान्यांना कर्जासाठी उभेही करत नव्हत्या. अशा काळात आपल्या शहरातील माणसांना मदत करण्यासाठी लांडगेसाहेब आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी अण्णासाहेबांकडे बँकेची कल्पना मांडली. तिथे पवना सहकारी बँकेच्या स्थापनेचं बीज रोवलं गेलं.

पन्नास रुपयांचा एक शेअर्सने पैसे जमवायला सुरुवात झाली. पुरेसं भागभांडवल जमलं, तरच बँकेला परवानगी मिळणार होती. अगदी घरोघरी जाऊन बँकेची माहिती देण्याबरोबरच भागभांडवल जमा करण्यात आलं. अखेर विविध परवानग्यांनंतर १९७३ मध्ये बँक सुरू झाली. १२ जुलै १९७३ ला सहकार खात्याची आणि २ ऑगस्ट १९७४ ला रिझर्व्ह बँकेची परवानगी मिळाली. चिंचवड स्टेशनला नालबंद चाळीत भाड्यानं घेतलेल्या पत्र्याच्या खोल्यांमध्ये बँकेची पहिली शाखा थाटली. अण्णासाहेब मगर यांच्या नेतृत्वाखाली ज्ञानेश्वरजी लांडगे, मामासाहेब पिंपळे, शंकरलाल मुथा, एकनाथजी नाणेकर, विष्णूपंत गावडे, दिगंबरशेठ काळभोर, रघुनाथजी गावडे, पांडुरंगजी काळभोर, सदाशिवराव फुगे, बाजीराव काळभोर, हरिभाऊ वाघेरे, नामदेवराव गायकवाड, बबनराव चिंचवडे, शिवरामजी नलावडे आदी बँकेच्या पहिल्या संचालक मंडळात होते.

बँकेचं दिवसभराचं काम संपलं, की त्याच जागी संचालक मंडळाची बैठक होत असे. या प्रवर्तकांनी बँकेच्या बैठकीत कधी चहाही घेतला नाही. बैठकांसाठी मिळणारा भत्ताही त्यांनी स्वीकारला नाही. पुढील संचालकांनीही हा पायंडा कायम ठेवला. आज ऑनलाइन पद्धतीनं बैठकांचा भत्ता संचालकांच्या खात्यात जमा होतो. पण, हा पैसा आजचे संचालक बँकेतच शेअर्सच्या रूपानं जमा करतात.

बँक सुरू करण्यासाठी लोकांच्या घरोघरी जाऊन पन्नास रुपयांचे शेअर्स जमा करण्यापासून निःस्वार्थपणे सुरू झालेलं हे काम आज विस्तारलं आहे. पन्नास वर्षांपूर्वी पत्र्याच्या खोल्यांत असणाऱ्या बँकेचा कारभार आज बावीस शाखांमध्ये विस्तारला आहे. चिंचवड, कासारवाडी, भोसरी, पिंपरी, काळेवाडी, आकुर्डी, वाकड, सोमाटणे फाटा, चिंबळी फाटा, रावेत, आळंदी, दापोडी, वाघोली, पाषाण, देहूगाव, वडगाव, स्पाइन रोड, कामशेत, शिक्रापूर, मारूंजी, इंदुरी, चिखली या शाखांच्या माध्यमातून बँक प्रत्येक माणसाला आर्थिक पाठबळ देण्यासाठी खंबीरपणे उभी आहे. पुढील काळात पुणे जिल्ह्यात आणि जिल्ह्याबाहेरही बँकेच्या शाखाविस्ताराचं नियोजन करण्यात आलं आहे. चिंचवडच्या ऑटो क्लस्टरजवळ रुबाबदार इमारतीत बँकेचं मुख्यालय आहे. पिंपरी-चिंचवड शहरात कोणत्याही सहकारी बँकेचं अशा स्वरूपाचं प्रशस्त आणि अत्याधुनिक मुख्यालय नाही. राष्ट्रीयीकृत बँकांच्या तोडीचं हे मुख्यालय सर्वसामान्य जनतेचा पवना बँकेवरील विश्वास आणि संचालक मंडळाच्या प्रामाणिक कामाची साक्षच देत आहे.

बँकेचं मुख्यालय किंवा शाखांची अंतर्बाह्य रचनाच नव्हे, तर कारभारही देखणा आणि अत्याधुनिक आहे. एटीएम केंद्रांसह इंटरनेट, मोबाइलच्या माध्यमातून देणात येणाऱ्या जवळपास सर्व सुविधा बँक ग्राहकांना पुरवते आहे. जनतेचा पैसा सुरक्षित ठेवण्यासाठी संगणकीय यंत्रणा अधिकाधिक सुदृढ आणि भक्कम करण्यावर सातत्यानं भर दिला जातो. सायबर सुरक्षेसाठी लागणाऱ्या खर्चात कोणतीही काटकसर केली जात नाही. बँकेकडे स्वतःचा आयएफएससी कोड आहे. डिजिटायजेशनमुळे एका क्लिकवर ग्राहकांना सुविधा मिळते. बँकेने स्वतःचे डेटा रिकव्हरी सेंटरही उभारण्याचं नियोजन केलं आहे. राष्ट्रीयीकृत बँका पुरवीत असलेल्या सुविधा पवना बँक आपल्या ग्राहकांना देते. सुरुवातीच्या २५ वर्षांमध्ये बँकेकडे केवळ आठ कोटी ४५ लाख रुपयांच्या

ठेवी आणि साडेतीन हजारांच्या आसपास सभासद होते. ठेवींचा हा आकडा आज ७०० कोटींपार गेला आहे. सभासदांची संख्याही १२ हजारांपर्यंत पोहोचली आहे. व्यवसायाचा एक हजार कोटींचा टप्पा बँकेने ओलांडला असून, पुढील पाच वर्षांत तो दोन हजार कोटींवर नेण्याचं उद्दिष्ट आहे. पवना बँकेनं आजवर 'अ' दर्जा सोडलेला नाही. पुढील काळात बँकेला 'शेड्युल्ड' दर्जासाठी प्रयत्न होत आहेत.

बँकेच्या प्रगतीचा हा आलेख उंचावण्याचं एकमेव कारण बँकेवर निर्माण झालेला लोकांचा विश्वास. याच विश्वासाच्या भांडवलावर बँकेनं आजवर यशाचे मोठमोठे टप्पे लीलया पार केले आहेत. बँकेत काम करणाऱ्या प्रत्येकाच्या निःस्वार्थ वृत्तीतूनच विश्वासाचं हे भांडवल उत्तरोत्तर वृद्धिंगत होत आहे. बँकेचा पाया घालणारे ज्ञानेश्वरजी लांडगेसाहेबांसारखा दीपस्तंभ आजही प्रत्येकाला या विश्वासाच्या मार्गानं पुढे नेतो आहे. बँकेच्या सुवर्णमहोत्सवी वर्षात लांडगेसाहेब संचालक मंडळात अध्यक्षपदाची धुरा समर्थपणे सांभाळत आहेत. त्यांचे सहकारी आणि ज्येष्ठ संचालक विठ्ठलशेठ काळभोरसाहेब, शांताराम गराडेसाहेब यांच्या अनुभवाचा भक्कम पाठिंबा बँकेला आहे. उपाध्यक्ष जयनाथ काटे, संचालक वसंत लोंढे, शामराव फुगे, शिवाजी वाघेरे, जितेंद्र लांडगे, सुनील गव्हाणे, शरद काळभोर, अमित गावडे, सचिन चिंचवडे, सचिन काळभोर, चेतन गावडे, बिपीन नाणेकर, दादू डोळस, जयश्री गावडे, ॲड. ऊर्मिला काळभोर, संभाजी दौंडकर, तज्ज्ञ संचालक ॲड. नितीन लांडगे, ॲड. गोरक्षनाथ काळे, व्यवस्थापन मंडळातील सदस्य ॲड. विठ्ठल ठाकुर, गणेश पिंजण, सीए. राजेंद्र पाटील आदी मंडळी एकोप्यानं आणि एक कुटुंब म्हणून लांडगेसाहेबांच्या मार्गदर्शनाखाली, त्यांनी घालून दिलेल्या निःस्वार्थ सेवेचं ब्रीद घेऊन काम करत आहेत. प्रशासकीय प्रमुख म्हणून बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनेश बोऱ्हाडे आणि सर्व अधिकारी-कर्मचारी, संचालक मंडळाच्या ध्येय-धोरणानुसार बँकेच्या विकासात हातभार लावत आहेत.

बँकेनं कर्ज देताना नातंगोतं, ओळख कधीच पाहिली नाही. कागदपत्रांची पूर्तता करणारा आणि परतफेडीची क्षमता असणारा कोणीही बँकेकडून कर्ज घेऊ शकतो. ही चाकोरी लांडगेसाहेबांनी घालून दिल्याचं सर्वच संचालक एकमुखानं सांगतात. त्यांनी बँकेत घालून दिलेले नियम त्यांनीही कधीच तोडले नाहीत. त्यासाठी जवळच्या लोकांचा रोषही पत्करला, पण नियमांशी तडजोड केली नाही. संचालक मंडळात आता नवी पिढी येत आहे. रत्नपारख्याची नजर असणारे लांडगेसाहेब योग्य, सक्षम माणसांनाच संचालक मंडळात संधी देत असल्याचं आजवर दिसून आलं. नव्यानं येणारा प्रत्येक माणूस साहेबांच्या धोरणानुसार चालतो. बाहेर ही मंडळी विविध राजकीय पक्षांची असतात, पण बँकेत पाय ठेवल्यावर राजकारण बाजूला ठेवत एकाच विचारानं कुटुंब म्हणून काम करतात. साहेबांनी घालून दिलेल्या चाकोरीत काम होत असल्यानं कधी मतभेदही होत नाहीत. बँक नागरिकांची आहे, आम्ही संचालक मालक नसून, केवळ विश्वस्त आहोत, अशी लांडगेसाहेबांची दृढ भावना आहे. बँकेच्या यशाचं श्रेयही ते कधी घेत नाहीत. मिळालेले चांगले सहकारी, सभासद आणि कर्मचाऱ्यांचा त्यात मोलाचा वाटा असल्याचं ते नेहमी सांगतात.

पिंपरी-चिंचवडकरांची 'जीवनवाहिनी' असलेल्या पवना नदीच्या नावावरून बँकेला पवना नाव देण्यात आलं. छत्रपती शिवाजीमहाराजांच्या पदस्पर्शानं आणि शूर मावळ्यांच्या वीर गाथेनं पावन झालेल्या मावळच्या कुशीतून जन्म घेणारी पवनामाई कित्येक पिढ्या प्रत्येकाला जीवन देत आहे. तिच्यासमोर कोणताही भेद नाही. तिचं काम निःस्वार्थ आणि अखंडपणे सुरूच आहे. केवळ नावच नव्हे, तर पवनामाईचा हाच वसा पवना बँकेनं जोपासला आहे. बँक धनरूपी संचयातून शहरातील जनसामान्यांचं आयुष्य फुलवण्यात अखंडपणे हातभार लावत आहे. बँकेनं आजपर्यंत अनेकांना उद्योग, व्यवसायात उभं केलं. रस्त्यावर असलेल्या माणसाला आर्थिक पाठबळातून व्यवसाय दिला. भूमिपुत्रांच्या जीवनाला पत दिली, उद्योजक म्हणून नावलौकिक दिला. ही जबाबदारीच नव्हे, तर एका साधनेप्रमाणं बँकेचं संचालक मंडळ, अधिकारी-कर्मचाऱ्यांनी काम केलं. ज्ञानेश्वरजी लांडगेसाहेब आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी मुळातच प्रामाणिक उद्देशावर बँकेचा पाया मजबूत रचला. बँकेच्या ब्रीदवाक्याप्रमाणं या पायावर अपार कष्टातून सचोटीनं एकेक वीट रचली गेली. त्यातून उभ्या राहिलेल्या विश्वासाच्या भक्कम भिंतींमुळेच आज यश आणि समृद्धीचा सुवर्णकळस पवना बँकेवर मोठ्या दिमाखात झळकतो आहे.




DOUBLETREE
पवना बँक
पवना सहकारी बँक लि.
मुख्य कार्यालय



# ॥ जोडोनिया धन उत्तम व्यवहारे ॥

**जोडोनिया धन उत्तम वेव्हारें।**
**उदास विचारें वेच करी ।।**
**उत्तमचि गती तो एक पावेल।**
**उत्तम भोगील जीवखाणी ।।**

जगद्‌गुरू संत तुकाराममहाराजांनी अभंगांतून एक उत्तम अर्थशास्त्र उलगडलं आहे. बरा किंवा चांगला नव्हे, तर उत्तमच व्यवहार तुकोबांना अपेक्षित आहे. या व्यवहारात नैतिकता, प्रामाणिकतेचा स्पर्श हवा. त्यातून जोडलेल्या धनाचा विनियोग निःस्वार्थपणे लोककल्याणासाठी झाला पाहिजे. तरच त्याला उत्तम गती प्राप्त होते. अभंगांत सांगितलेला हा व्यवहार पवना सहकारी बँकेचं ब्रीदवाक्यच आहे. बँकेचे संस्थापक अध्यक्ष ज्ञानेश्वरजी लांडगेसाहेब, त्यांचे सहकारी ज्येष्ठ संचालक विठ्ठल काळभोरसाहेब, शांताराम गराडेसाहेब आणि सर्वच संचालक मंडळांनी आजवर हाच उत्तम व्यवहार बँकेत केला आहे. प्रामाणिकपणाचं काम आणि निःस्वार्थ वृत्तीमुळे आज सुवर्णमहोत्सवी वर्षांत पवना बँक लोककल्याणात अग्रेसर ठरते आहे.

# ॥ जोडोनिया धन उत्तम व्यवहारे ॥



‘तुम्ही आहात म्हणून पवना बँक आहे, तुमच्यामुळंच सारं झालं’, असं लोक मला म्हणतात. पण तसं नाही. यात सर्वांचा वाटा आहे. नागरिकांची ही बँक आहे. बँकेतील शिपायाचाही या यशात वाटा आहे. हे सार्वजनिक काम प्रत्येकानं प्रामाणिकतेनं करायला हवं. तिथे स्वार्थ यायला नको. संस्थेत मी अध्यक्ष आहे, हे कधीच डोक्यात ठेवत नाही. सत्तेचा गर्व निर्माण होता कामा नये, असं माझं स्पष्ट मत आहे. सहकारी घेतानाही चांगली माणसं जोडली. अधिकार म्हणून नव्हे, तर सेवा म्हणून आजवर उत्तम व्यवहार, निःस्वार्थ काम केल्यानंच आम्ही सर्वोच्च स्थानावर आहोत.

# श्री. ज्ञानेश्वरजी पांडुरंग लांडगे
(संस्थापक अध्यक्ष)

घरात पहिलवानकीची परंपरा होती. वडील, चुलते आणि आजोबाही पहिलवान होते. कुस्ती आणि व्यायामासाठी वडिलांचा कायम आग्रह असायचा. भोसरीच्या शाळेत प्राथमिक शिक्षण झाल्यानंतर मला पुढील शिक्षणासाठी पुण्यात जावं लागलं. सरस्वती मंदिर शाळेत होतो. बुधवार पेठेतील गराडे तालमीत राहूनच आम्ही शाळा-कॉलेज केलं. कुस्तीमध्ये जरा जास्तच लक्ष असायचं. आंतरशालेय सामन्यांमध्ये अगदी दोनतीन वर्षांतच गटात पहिला यायला लागलो. त्यानंतर वेगवेगळ्या स्पर्धांत अनेक कुस्त्या मारल्या. १९६३ मध्ये थेट अखिल भारतीय विद्यापीठ स्तरावरील सामन्यात वैयक्तिक पातळीवर चॅम्पियनशिप जिंकली. माझ्याच कॅप्टनशिपखाली त्या वेळी पुणे विद्यापीठासाठी कुस्तीची जनरल चॅम्पियनशिप आणली. बनारसमध्ये ही स्पर्धा झाली होती. विशेष म्हणजे १९६३ पासून ऑल इंडियाची ही जनरल चॅम्पियनशिप त्यानंतर अजूनही आलेली नाही.

आपल्याकडची माणसं त्या वेळी खूप पुढारलेली नव्हती. बहुतांश लोक शेतकरीच होते. अगदीच साधी माणसं होती. मी पुण्यात असायचो. कलेक्टर ऑफिस किंवा मामलेदार कचेरीत काही कामं असतील, तर आपल्याकडची मंडळी पुण्यात यायची. आम्ही त्यांना मदत करायचो. त्यातून नकळतच सार्वजनिक क्षेत्रात कामाला सुरुवात झाली. गावात आणि इतर ठिकाणी लोकांना मदत करण्याची कामं पुढेही सुरूच राहिली. त्या काळी पंचायतराज नव्यानंच सुरू झालं होतं. ग्रामपंचायती होत्या. भोसरी गावचे आधीचे सरपंच रावसाहेब वाखारे होते. दुसरे गाववाले मामासाहेब पिंपळे पंचायतीमध्ये सभासद होते. ही दोन्ही मोठी माणसं. १९६७ मध्ये पंचायतीच्या निवडणुका आल्या आणि ही माणसं वरच्या स्तरावर गेली. त्यामुळे गावकऱ्यांनी ग्रामपंचायतीसाठी नवीन लोकं घ्यायचा विचार केला. त्यात मलाही घेतलं आणि थेट सरपंच केलं. त्या वेळी मी अवघा सत्तावीस वर्षांचा होतो. १९७० मध्ये पिंपरी, चिंचवड, भोसरी, निगडी-आकुर्डी ही चार गावं मिळून नगरपालिकेची स्थापना झाली. निगडी-आकुर्डी ही त्या वेळी एकच ग्रामपंचायत होती. नगरपालिकेच्या नामनिर्देशित समितीत अण्णासाहेब मगर यांना अध्यक्ष आणि मला उपाध्यक्ष केलं. आठ-दहा वर्षांतच शहराचा झपाट्यानं विकास झाला. १९८६ मध्ये नगरपालिकेची महापालिका झाली आणि या औद्योगिक शहराचा पहिला महापौर होण्याची संधी मिळाली. त्यानंतर १९९० मध्ये हवेली मतदार संघातून लोकांनी विधानसभेवरही पाठवलं. भोसरी भागातील बहुतांश लोक त्या वेळी खडकीच्या दारूगोळा कारखान्यात कामाला होती. पुणे-मुंबई महामार्गावरून ही सर्वच लोकं सायकल चालवत कामावर ये-जा करत होती. भोसरी ग्रामपंचायतीची हद्द फुगेवाडीपर्यंत होती. सरपंच झाल्याच्या काळात तेथून जवळच दापोडीत राहायला आलो. अगदी महामार्गालगत घर होतं. त्यामुळं या रस्त्यावरून नोकरीसाठी ये-जा करणाऱ्या प्रत्येक माणसाला भेटता येत होतं. अगदी आमदारकीपर्यंत याच घरात लोकांचा राबता होता.

राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात काम करत असताना, लोकांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्याला सातत्यानं प्राधान्य दिलं. पवना सहकारी बँकेच्या स्थापनेचं बीजही त्यातूनच रुजलं. त्या काळात राष्ट्रीयीकृत बँकांचा नुकताच उदय झाला होता. पण, तिथं सामान्य माणसाला कोणी विचारत नव्हतं. ठेवींसाठी सहकार्य मिळायचं, पण कर्ज म्हटलं, की उभंच करत नव्हते. अधिकाऱ्यांच्या मर्जीचं सर्व राज्य होतं. या काळात शिवाजीनगर सहकारी बँकेची स्थापना झाली. मला आणि इकडच्या कार्यकर्त्यांना स्थापनेच्या

कार्यक्रमाचं आमंत्रण आलं. त्यामुळं आम्ही कार्यक्रमाला गेलो. शिवाजीराव भोसले त्या भागातले नावाजलेले पुढारी होते. ते बँक काढू शकतात, तर आपणही आपल्या भागातील सर्वसामान्य लोकांसाठी काहीतरी करू शकतो, असा विचार आमच्या मनात पक्का झाला. त्यामुळे बँक काढण्याची कल्पना आम्ही अण्णासाहेबांसमोर मांडली. त्यांना वाटलं ही तरुण मंडळी भावनेच्या भरात बोलत आहेत. त्यामुळे सुरुवातीला त्यांनी फारसं लक्ष दिलं नाही. पण, आम्ही सलग सहा महिने या विषयाचा पिच्छा पुरवला. त्यांच्यापुढं बँकेचा विषय लावून धरला. ते ऐकून घ्यायचे, पण अपेक्षित प्रतिसाद देत नव्हते. माझ्यासह भिकू वाघेरे पाटील, एकनाथ नाणेकर, आकुर्डीतून पांडुरंग काळभोर, दिगंबर काळभोर असे लोक सुरुवातीला होते. आम्ही खूपच पिच्छा पुरवल्यानंतर, अखेर अण्णासाहेबांनी मान्य केलं आणि बँकेला मुहूर्त मिळाला. ते बँकेचे पहिले अध्यक्ष झाले.

बँकेला काय नाव द्यायचं, हा विषय आला. दुसरी कोणती नावं देण्यापेक्षा जिच्या सान्निध्यात आपण आहोत, त्याच नदीचं नाव असावं म्हणून पवना हे नाव पुढं आलं. त्यापूर्वी नव्यानं तयार झालेल्या या शहराच्याही नावाबाबतही सांगायचं झालं, तर आपल्या शहराला काय नाव द्यायचं, असा विषयही पूर्वी चर्चेला आला होता. काहींनी वेगवेगळी नावं सुचवली. पण, शहराच्या नावांत आपली गावेच असावीत, अशी इच्छा असल्यानं त्यातून पिंपरी-चिंचवड हे नाव पुढं आलं. आमच्या शिक्षण संस्थेला आणि नव्या युनिव्हर्सिटीलाही नाव देण्याचा विषय आला. तिथंही आम्ही 'पिंपरी-चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट' असंच नाव केलं. आम्ही उभारलं, पण त्यात 'मी किती', याचा विचार हवा. म्हणून पवना बँकेलाही कुणाचं नाव न देता आपल्या पवनामाईचं नाव दिलं.

बँक सुरू करण्याची तयारी झाल्यानंतर दोन-चार दिवसांतच निम्मं भांडवल उभं राहिलं. पन्नास रुपयांचा एक शेअर्स होता. ज्याच्या त्याच्या कुवतीनुसार शहराच्या वेगवेगळ्या भागांतून आवश्यक भांडवल जमा झालं. त्यातून नोंदणी झाली आणि बँक प्रत्यक्षात सुरू झाली. चिंचवड स्टेशनला भाड्याच्या जागेत बँकेची पहिली शाखा सुरू झाली. ही जागा नसताना आम्ही बाहेर कुठंही बसून बँकेबाबत बैठका घ्यायचो. एका शाखेचा आवश्यक कर्मचारी वर्ग भरल्यानंतर बँकेचं कामकाज सुरू झालं. अगदी सुरुवातीपासूनच लाभांश देण्यास प्रारंभ केला. संध्याकाळी बँकेचं काम संपलं, की त्याच जागेवर संचालक मंडळाच्या बैठका होत.

बँकेवर सुरुवातीची पाच वर्षे अण्णासाहेब अध्यक्ष आणि मामासाहेब पिंपळे उपाध्यक्ष होते. त्यानंतर मीच बँकेच्या प्रमुखपदाची धुरा सांभाळली. आम्ही सर्वच त्या वेळी तरुण होतो. सहकाराचा थेट संबंध आला नव्हता. पण, व्यवहारातूनच आलो होतो. मी सरपंच म्हणून गाव चालवत होतो. इतकं जर आम्हाला आलं नसतं, तर बँकेवर घेतलंच नसतं. माझी पार्श्वभूमी कुस्तीची आहे. कुस्तीतून आलेला माणूस लयं तयार असतो. प्रत्येक वेळेस मला अद्वितीय करण्याची संधी मिळत गेली आणि लोकांच्या मदतीनं त्या संधीचं सोनं झालं. लोकं विचारी होती, त्यातून सुरुवातीला एकमेकांच्या विचारांनीच बँकेत संचालकांची निवड झाली. लोकांच्या आर्थिक अडचणी सोडवण्यासाठीच बँकेची स्थापना केली. आम्ही कुणी नाही, ही बँक सर्वसामान्यांसाठी आणि त्यांचीच आहे. त्यांना नजरेसमोर ठेवूनच प्रत्येक वेळी आम्ही काम करत राहिलो. आज २२ शाखा झाल्या. करोनाच्या काळात शाखा विस्ताराला परवानगीचा अडथळा होता. तो आता दूर होत असल्याने बँक आणखी विस्तारणार आहे.

बँक सुरू झाली, तेव्हा शहरात उद्योगांचं जाळं फारसं विस्तारलं नव्हतं. कर्जासाठी प्रामुख्यानं शेतकरी यायचा. दुकानदार आणि कामगारांचाही काही प्रमाणात त्यात सहभाग असायचा. तेव्हापासून आजवर या प्रत्येक घटकाला आम्ही मदत केली. ही जनतेची बँक आहे, कोणत्या पक्षाची नाही. आमच्याकडे सर्व विचारांची माणसं आहेत. बाहेर वेगवेगळ्या राजकीय पक्षांत असणारी लोकं बँकेमध्ये मात्र एक विचारांनी आहेत. सामान्य माणूस बँकेचा हक्कदार आहे, हीच भावना आम्ही कायम ठेवली. हा नको, तो नको. हा समाज नको, तो नको, असे होत नाही. जो येईल, तो बँकेचा मालक आणि त्याला लाभ मिळवून देण्याचा प्रयत्न सातत्यानं राहिला आहे. बँक वाढवण्याच्या दृष्टीनं पवनेच्या या मदतीच्या प्रवाहात प्रत्येकाला सहभागी करून घेण्याचा आमचा प्रयत्न आहे. बँकेत नियमांची आमची एक चाकोरी ठरली आहे, ती सोडायची नाही, हे पक्के आहे. अगदी घरातला माणूस असला, तरी नियम महत्त्वाचा. कर्जासाठी जो आमच्या चाकोरीत बसेल आणि कागदपत्रांची पूर्तता करेल, त्याचंच काम इथे होणार. मी कुणीतरी आहे, हे



डोक्यात आलं, की मग संपलं. त्यामुळं चाकोरी आणि नियम सोडायचे नाहीत, हे पहिल्या दिवसापासूनचं धोरणं आजही पाळलं आहे.

नेता तशी जनता किंवा संस्थेतील कामगार असतात. आपण त्यांना जसं वळण लावू तसं ते घडतात. 'तुम्ही आहात म्हणून बँक आहे, तुमच्यामुळंच सारं झालं', असं लोक मला म्हणतात. पण तसं नाही. यात सर्वांचा वाटा आहे. सभासद आणि सर्व नागरिकांची ही बँक आहे. बँकेतील शिपायाचाही या यशात वाटा आहे. हे सार्वजनिक काम आहे, ते प्रत्येकानं प्रामाणिकतेनं करायला हवं. तिथे स्वार्थ यायला नको. संस्था आपण लोकांसाठी चालवतो. त्यात मी अध्यक्ष आहे, हे कधीच डोक्यात ठेवत नाही. सर्वांना चांगली वागणूक देतो. सत्तेचा गर्व निर्माण होता कामा नये, असं माझं स्पष्ट मत आहे. सहकारी घेतानाही सरळ माणसं जोडून घेतली. चांगल्याच माणसाची निवड करत गेलो. शांताराम गराडे, व्ही. एस. काळभोर यांच्याबरोबर अनेक वर्षे काम करतो आहे. बँकेतच नव्हे, शिक्षण संस्थेतही आम्ही एकमतानं काम करत आहोत.

आपण सेवा म्हणून केलं, अधिकार म्हणून नाही. त्याच नजरेने सर्व कामांकडे बघतो. म्हणून आजही आम्ही टॉपमध्ये आहोत. आम्ही करत गेलो, परमेश्वराची साथ मिळाली. त्यात अडचणी आल्याच नाहीत आणि त्यातून सारं विस्तारात राहिलं. पण, जे केलं ते नीट चालवता आणि टिकवता आलं पाहिजे. अनेकांनी बँका मोडून खाल्लेल्या आपण पाहिल्या आहेत. आपण लोकांच्या सोयीसाठी आहोत. कुठं अधिकार गाजवायचं कधीच डोक्यात ठेवलं नव्हतं. एक सेवाभाव म्हणूनच केलं, तोच विचार घेऊन इथपर्यंत आलोय. बँकेच्या शिपायालाही कमी लेखत नाही. चांगल्या लोकांची साथ मिळाली म्हणून हे झालं. त्यात मी काही केलं नाही. प्रत्येक सहकाऱ्याचा विचार घेऊनच आजवर सर्व चालवतो आहे. करण्यासारखं आणखी भरपूर आहे. इतकं झालं त्यातच समाधान मानलं, तर वाढ खुंटल्यासारखी होईल. त्यामुळे अजूनही बरचं काही करायची ऊर्मी कायम आहे.

# सुवर्णमहोत्सवी यश, विश्वासाचं फळ

पवना बँकेनं यशस्वीतेची पन्नास वर्षे पूर्ण केली आहेत. पारदर्शकता, ज्ञानेश्वरजी लांडगेसाहेबांचा स्वच्छ कारभार असलेली ही बँक आहे. कोणताही आडपडदा न ठेवता सर्वांसमोर निर्णय घेण्याची साहेबांची पद्धत आहे. कुठलंही चुकीचं काम होणार नाही, सरळ पद्धतीनं आपल्याला कर्ज मिळेल, असा विश्वास जनसामान्यांत निर्माण झाला आहे. त्यातून बँकेच्या सर्व शाखा फायद्यात आहेत. करोनाच्या पडझडीतही आम्ही बँकेला सावरलं. अधिकाधिक नागरिकांना बँकेशी जोडून व्यवसाय वाढीसाठी आता नवनवे प्रयोगही आम्ही राबवतो आहोत.

**विठ्ठल सोमाजी काळभोर**
(ज्येष्ठ संचालक)



# ||जोडोनिया धन उत्तम व्यवहारे||

स्थानिक माणसाला आर्थिक पाठबळ देण्यासाठी अण्णासाहेब मगर यांच्या पुढाकारानं ज्ञानेश्वरजी लांडगेसाहेबांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिकांनी पवना बँकेची स्थापना केली. अण्णासाहेबांनंतर लांडगेसाहेबांनी बँकेचं संपूर्ण नेतृत्व हाती घेतलं. बँकेतील माझा सहभाग वीस वर्षांपूर्वीचा. २००२-०३ च्या दरम्यान लांडगेसाहेबांच्या आग्रहामुळे बँकेच्या कारभारात सहभागी झालो. त्या वेळी बँकेत २५ कोटींच्या ठेवी झाल्या होत्या. मी सहभाग घेतल्यानंतर एक वर्षातच ३५ कोटींच्या ठेवी झाल्या. त्यानंतर प्रशासकीय चुकीमुळे बँकेपुढे अडचण आली. संचालक मंडळ बरखास्त करण्यात आलं. परंतु, त्यात आमचा काहीच दोष नव्हता, हे सिद्ध झाल्यानंतर एक-दीड वर्षांनी पुन्हा बँकेच्या निवडणुका झाल्या. कात टाकून बँक पुन्हा उभी राहिली. आम्ही परत तेच संचालक मंडळ घेऊन पुढे आलो आणि नव्या जोमानं बँक चालवण्यास सुरुवात केली. त्या वेळी ४५ कोटी रुपयांच्या ठेवी आणि केवळ पाच शाखा होत्या. याच शाखांच्या जोरावर चारपटींहून अधिक १९२ कोटींच्या ठेवींवर मुसंडी मारली. लोकांचा विश्वास संपादन केला. त्यातून स्थानिकांसह बाहेरची मंडळी बँकेचा लाभ घेऊ लागली.

बँकेनं आता यशस्वीतेची पन्नास वर्षे पूर्ण केली आहेत. पारदर्शकता, लांडगेसाहेबांचा स्वच्छ कारभार असलेली ही बँक आहे. कोणताही आडपडदा न ठेवता सर्वांसमोर निर्णय घेण्याची साहेबांची पद्धत आहे. कुठलंही चुकीचं काम होणार नाही, सरळ पद्धतीनं आपल्याला कर्ज मिळेल, असा विश्वास जनसामान्यांत निर्माण झाला आहे. आता ७०० कोटी रुपयांच्या ठेवी आहेत. बँकेच्या सर्व शाखा फायद्यात आहेत. करोनाच्या कालावधीत काही अडचणी आल्या, पण त्यात झालेल्या पडझडीतही आम्ही बँकेला सावरलं. इतकेच नव्हे, तर आता शेड्युल्ड बँकेचा दर्जा मिळवण्यासाठी संचालक मंडळाकडून प्रयत्न सुरू झाले आहेत. बँकेवर येताना लांडगेसाहेबांबरोबर शिक्षण संस्थेवर काम करत होतो आणि माझा व्यवसायही सुरू होता. बँकिंग क्षेत्रातील अनुभव होता. या सर्वांतून आता बँकेत काही प्रयोग सुरू केले आहेत. नव्या आणि जुन्यांची सांगड घालताना नव्या संचालकांचा सहभाग काहीसा कमी वाटायचा. मी, लांडगेसाहेब, गराडेसाहेब बैठकीत बसल्यावर संचालकांच्या मनातलं बाहेर येत नाही, हे लक्षात आलं. त्यांनी बँकिंग समजून घ्यायला हवी. संचालक मंडळाचा सहभाग प्रत्यक्ष कामकाजात वाढावा आणि त्यातून बँकेची प्रगती व्हावी, हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून प्रत्येकावर वैयक्तिक जबाबदारी देण्याचा प्रयोग केला आहे. त्यात बँकेच्या २२ शाखांचे पूर्व, पश्चिम, दक्षिण आणि उत्तर, असे चार भाग केले. त्या प्रत्येक भागावर चार-चार संचालकांचा एक गट, त्या गटांवर प्रत्येकी एक प्रमुख नेमला. त्यांना अडीचशे कोटींचा व्यवसाय तीनशे कोटींवर नेण्याचं उद्दिष्ट दिलं. प्रत्येक गटाकडे चारपाच शाखांची जबाबदारी दिली आहे. त्यांना शिकवण्याचं काम वैयक्तिक पातळीवर करतो. त्यातून बँकेचा आर्थिक विकास होण्यास कुठलीही अडचण येणार नाही, असा माझा विश्वास आहे. पाच वर्षांत ४५ कोटींवरून १९२ कोटींच्या ठेवी करू शकलो, ते प्रत्यक्षातील उदाहरण देऊन अडीचशे कोटींच्या ठेवी ७०० कोटी आणि त्याही पुढे १००० कोटींवर नेण्याचं उद्दिष्ट ठेवा, असे मी त्यांना सांगतो. (पान ३२ वर)

# निःस्वार्थ सेवेचा दीपस्तंभ

पवना बँकेत सगळे प्रामाणिक लोक आहेत. बैठकांतील चहा-पाणी सोडला, तर कोणत्याही अपेक्षेविना ते काम करतात. कुठंही गैरप्रकाराला जागाच ठेवायची नाही, हे ज्ञानेश्वरजी लांडगेसाहेबांचं धोरण असल्यानं, तशा गोष्टी कोणाच्या डोक्यातही आल्या नाहीत. बँकेचे पैसे खाणारे संचालक मी इतर ठिकाणी पाहिले आहेत. इथे मात्र संचालकांनी संकटाच्या काळात स्वतःचे पैसे भरलेत. भूमिपुत्रांवर विश्वास टाकला आणि त्यांच्या पाठीशी बँक ठामपणे उभी राहिली. बँकेच्या पाठबळातून आज अनेक जण उद्योग-व्यावसायांत यशाच्या शिखरावर आरूढ आहेत.

**शांताराम दगडू गराडे**
(ज्येष्ठ संचालक)



# ॥जोडोनिया धन उत्तम व्यवहारे॥

पिंपरी-चिंचवड महापालिकेतून शहर अभियंता म्हणून २००३ मध्ये सेवानिवृत्त झालो. त्यानंतर संत तुकाराम सहकारी साखर कारखान्यावर संचालकपदी काम केलं. त्यामुळे सहकाराचा चांगला अनुभव होता. कारखान्यात अनेक चांगल्या प्रथा सुरू केल्या. ज्ञानेश्वरजी लांडगेसाहेबांशी खूप जुने संबंध होते. त्यांच्यामुळेच पवना बँकेच्या संचालक मंडळात आलो. पिंपरी-चिंचवड महापालिकेत शहर अभियंता म्हणून कार्यरत असताना, शहरात मोठमोठ्या प्रकल्पांची उभारणी केली. मी पालिकेत आलो, तेव्हा शहरात नदीवर कुठंही पालिकेचा पूल नव्हता. पिंपरीतील पहिला रेल्वे उड्डाणपूल, पुणे-मुंबई महामार्गावर निगडीचा पहिला उड्डाणपूल, या प्रकल्पांपासून सुरुवात झाली आणि नंतर अनेक मोठमोठे प्रकल्प उभारले. चौकातील वाहतूक सुरळीत होण्यासाठी आज सर्वमान्य झालेला समतल विलगक अर्थात ग्रेड सेपरेटर हा प्रकार मी पहिल्यांदा आणला. पालिकेत शहर विकासाचा मोठा अनुभव होता. त्यासह सहकार क्षेत्रातील अनुभवही पाठीशी होता. या दोन्ही क्षेत्रांतील अनुभवाचा फायदा पवना बँकेला करून देता आला, याचा आनंद वाटतो.

मी बँकेत येण्यापूर्वी सहा ते सात शाखा होत्या. त्यानंतर दरवर्षी किमान तीन शाखा सुरू केल्या. आता एकूण २२ शाखा झाल्या. त्यातल्या पाच शाखा मावळात सुरू केल्या. त्यातील सोमाटणे शाखा आज टॉपवर आहे. इंटिरियरमध्ये मला पहिल्यापासून रस. त्यामुळे बँकेच्या शाखांच्या अंतर्गत आणि बाह्यरचनेवर जाणीवपूर्वक काम केलं. बँकांच्या शाखांचा चेहरा-मोहरा बदलून टाकला. राष्ट्रीयीकृत बँकांच्या शाखांपेक्षाही उत्तम रचना केली. बँकेत पूर्वी पे स्केलची पद्धत अगदीच विचित्र होती. त्यात बदल करून शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे पे स्केल करून घेतलं. कोणतीही गोष्ट घेताना निविदा प्रक्रिया आणि वाटाघाटी करण्याची पद्धतही बँकेत सुरू करू शकलो. बँकेच्या पाच ते सात शाखा होत्या, तेव्हा व्यवसाय कमी होता. आता ठेवी आणि कर्जे मिळून एक हजार कोटींवर बँकेचा व्यवसाय गेला आहे. अवघ्या दोन कोटी रुपयांवर सुरुवातीला वीस वर्षे बँक चालली होती.

आपल्याला मिळालेल्या प्रदीर्घ अनुभवाच्या जोरावर बँकेत काही करता येईल का, हा विचार सातत्यानं असतो. कारभारात एक पद्धती आखून दिली. प्रोसिडिंग कसं लिहायचं, ऑडिटचा रिपोर्ट कसा द्यायचा, याचा मला चांगलाच अनुभव होता. एकदा सहकार खात्यानं बँकेचं ऑडिट केलं. आमच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना म्हटलं, मी त्याची उत्तरं देतो. त्यानुसार सर्व उत्तरं मी तयार केली आणि मांडली. त्यानंतर त्यावर सहकार खात्याचा एकही आक्षेप आला नाही. चिंचवड येथे आता बँकेचं प्रशस्त मुख्यालय आहे. पिंपरी-चिंचवड शहरामध्ये अशा प्रकारचं अत्याधुनिक आणि प्रशस्त कार्यालय सध्या कोणत्याही बँकेकडे नाही. हे कार्यालय उभारताना एमआयडीसीतील जागेच्या परवानगीबाबत अनेक अडचणी उभ्या झाल्या. औद्योगिक विभागातील ही जागा व्यावसायिक कारणाला घेण्यासाठी प्रशासकीय अडथळे होते. पण, आजवर तयार झालेल्या अनेक चांगल्या संबंधांच्या माध्यमातून सर्व अडचणी आणि अडथळे दूर करू शकलो.

बँकेत सगळे प्रामाणिक लोक आहेत. बैठकांतील

(पान ३२ वर)

# निःस्वार्थ सेवेचा दीपस्तंभ

(पान ३१ वरून)

चहा-पाणी सोडला, तर कोणत्याही अपेक्षेविना ते काम करतात. कुठंही गैरप्रकाराला जागाच ठेवायची नाही, हे लांडगेसाहेबांचं धोरण असल्यानं, तशा गोष्टी कोणाच्या डोक्यातही आल्या नाहीत. बँकेचे पैसे खाणारे संचालक मी इतर ठिकाणी पाहिले आहेत. इथे मात्र संचालकांनी संकटाच्या काळात स्वतःचे पैसे भरलेत. महापालिकेत काही गडबड झाली, की अधिकारी निलंबित होतो. सहकारामध्ये मात्र सर्व जबाबदारी संचालकांची असते. हा सहकार क्षेत्र आणि पालिकेतील फरक आहे. म्हणून काही वेळेला भोगावंही लागतं.

पवना बँकेनं आजपर्यंत अनेकांना मदत केली. परिसरातील बहुतांश क्रशरला बँकेचंच अर्थसाहाय्य आहे. शेतकऱ्यांनाही उद्योगात पाऊल ठेवण्यासाठी बँकेनं मदत दिली. भूमिपुत्रांवर विश्वास टाकला आणि त्यांच्या पाठीशी बँक ठामपणे उभी राहिली. अनेकांना शून्यात असताना मदत केली, त्यातून आज बहुतांश मंडळी उद्योग-व्यवसायांत यशच्या शिखरावर आरूढ झाली आहेत. विश्वासाला तडा जाणार नाही, ही खात्री होती, त्यामुळेच सर्वांसाठी मदतीचा हात पुढे केला. पुढील काळात जिल्ह्यातच नव्हे, तर राज्यातही रायगड, सातारा, सोलापूर, नगर आदी जिल्ह्यांत झेप घ्यायची आहे. त्यानंतर मल्टिस्टेट पातळीवरही बँकेची प्रगती साधायची आहे. त्या दृष्टीनं सर्व जण कामाला लागले आहेत. खरंतर बँकेवर काम करायचं माझ्या डोक्यातही नव्हतं. पण, साहेबांनी विश्वास टाकला म्हणून आलो. या संस्थेची विश्वासार्हता कायम राखायची, प्रामाणिकपणा कायम ठेवायचा, संस्थेकडून कुठलीही अपेक्षा ठेवायची नाही, तरच ही संस्था चालणार, हाच नव्या मंडळींना संदेश.

# सुवर्णमहोत्सवी यश, विश्वासाचं फळ

(पान २९ वरून)

करोनानंतर आता बाजारामध्ये पुन्हा उठाव आला आहे. त्याचा लाभ बँकेलाही व्हावा, या उद्देशाने हा प्रयोग सुरू आहे. लांडगेसाहेबांचा त्याला पूर्ण पाठिंबा आहे. संचालक उच्चशिक्षित आहेत. विषय मोठ्या आत्मीयतेनं समजावून घेत ते कामालाही लागले आहेत. प्रत्येक आठवड्याला ठरलेल्या शाखांत जाऊन, तेथील अडचणी समजून घेत व्यवसाय वाढीसाठी ते प्रयत्न करीत आहेत. लोकसेवा करण्याबरोबरच बँकेचा व्यवसाय कसा वाढवता येईल, हे मी नव्या लोकांना शिकवतो. नव्यानं विकसित होणाऱ्या भागांत बँकेच्या शाखा वाढवण्यावर माझा भर असतो. नव्या भागातही बँकेच्या माध्यमातून लोकांच्या गरजा पूर्ण होतात. त्याचा व्यवसायावरही चांगला परिणाम होतो. त्यामुळे लवकरच बँकेच्या नव्या शाखा सुरू केल्या जातील. आधुनिक यंत्रणांच्या माध्यमातून बँकिंगच्या सुविधांबाबत आमचं वेगळे पथक काम करत आहे. बँकेचं स्वतःचं डेटा सेंटर तयार करण्याबाबतही आमचं नियोजन आहे. सध्या संगणकीय यंत्रणेतील सर्व सुविधा आपण देतो. नवीन तंत्रज्ञान आपल्या मंडळींनी आत्मसात करायला हवं, असा आमचा आग्रह असतो. आता रस्त्यावरचा भाजीविक्रेताही मोबाइलवर पेमेंट स्वीकारतो. बँकिंग क्षेत्रात तंत्रज्ञानाचा वापर आणि त्याची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत आहे. त्यानुसार येणाऱ्या नवनवीन गोष्टींची अंमलबजावणी आम्ही तातडीनं करत असतो.

लहानपणापासूनच मी विश्वासाच्या जगात वागत आलो. या विश्वासाचं हे फळ आम्हाला आहे. या विश्वासावरच आमच्या संस्था वाढतात. काम करणाऱ्यांवर आम्ही विश्वास ठेवतो. आमच्याकडे येणाऱ्या लोकांवर आम्ही विश्वास ठेवतो. कर्ज प्रकरणात काही अडचणी असतील, तर त्याचं मार्गदर्शनही वेळोवेळी करत असतो. बँकेचं काम हे टीम वर्क आहे. पण, भक्कम पाया लांडगेसाहेब आहेत. स्वच्छ कारभार करण्याचा त्यांचा उद्देश सरळ आहे. त्यामुळे माझ्यासारखा माणूस त्यांना चिकटून आहे. त्यांच्यामुळेच आम्हालाही कामात उत्साह येतो.

# ॥ एकमेकां साहाय्य करू अवघे धरू सुपंथ ॥

**एकमेकां साह्य करू। अवघे धरू सुपंथ।।**
**कोण जाणे कैसी परी। पुढें उरी ठेवितां।।**
**अवघे धन्य होऊं आता। स्मरविता स्मरण।।**

जगद्गुरू संत तुकाराममहाराजांनी सन्मार्गाच्या उत्तम व्यवहाराचा निःस्वार्थ मार्ग सांगितला. त्याबरोबरच एकमेकांना साहाय्य करून सत्कार्याचा सुपंथ जोपासण्याचं आवाहनही केलं आहे. तुकोबांचा हा अभंग जणू सहकार क्षेत्राचा मंत्रच म्हणावा लागेल. एका विचारानं आणि ध्येयानं एकत्र येऊन प्रामाणिक भावनेनं सर्वांचा उत्कर्ष साधायचा, हा तुकोबांचा संदेश पवना सहकारी बँकेनं स्थापनेपासूनच अंगीकारला आहे. संचालक मंडळातील प्रत्येक घटक साहाय्याच्या एका विचारानं गुंफला आहे. प्रत्येक जण एका निःस्वार्थ ध्येयानं काम करत असून, बँकेच्या माध्यमातून जनसामान्यांना आर्थिक पाठबळ देण्याचा सुपंथ जोपासत आहे. त्यातून बँकेचे ग्राहक, सभासद व्यवसाय आणि उद्योगांत प्रगतीची नवनवी शिखरं गाठत आहेत. हाच सुपंथ गेल्या पन्नास वर्षांपासून पवना बँकेलाही प्रगतीच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर घेऊन जात आहे.

# ॥ एकमेकां साहाय्य करू अवघे धरू सुपंथ ॥

**पवना बँकेच्या संचालक मंडळात वेगवेगळ्या राजकीय पक्षांतील लोक आहेत. पण, बँकेच्या आवारात पाऊल टाकलं, की प्रत्येक जण पक्ष विसरतो आणि केवळ बँकेचा विचार करतो. ज्ञानेश्वरजी लांडगेसाहेबांच्या मार्गदर्शनाखाली, विश्वासावर आजवर बँकेची प्रगती झाली. बँकेनं अनेकांना कर्जरूपानं मदतीचा हात दिला आहे. त्यातून अनेक जण मोठे व्यावसायिकही झाले. रस्त्यावरच्या माणसालाही उभं करण्यासाठी बँकेनं हातभार लावला. एकमेकांच्या साहाय्याने प्रगतीचा हा आलेख सदैव उंचावण्यासाठी आम्ही सर्व संचालक कटिबद्ध आहोत.**



**जयनाथ नारायण काटे** (उपाध्यक्ष)

आदरणीय ज्ञानेश्वरजी लांडगेसाहेबांचा मी १९८६ पासूनच कार्यकर्ता. दापोडीत कॉलेजात असताना साहेबांच्या संपर्कात आलो. तेव्हापासून पवना बँकेचं नाव ऐकून होतो. बँकेचा कारभार ते अत्यंत उत्कृष्टपणे सांभाळत. २०१० साली माझा बँकेशी प्रत्यक्ष संबंध आला. साहेबांनी मला संचालक म्हणून काम करण्याची संधी दिली. पाच वर्षे यशस्वीपणे जबाबदारी पार पडल्यानंतर २०१५ मध्ये पुन्हा बँकेची निवडणूक आली. या कालावधीत साहेबांच्या वयाला ७५ वर्षे पूर्ण होत होती. या महत्त्वाच्या आणि ऐतिहासिक कालावधीत साहेबांनी बँकेच्या अध्यक्षपदी विराजमान व्हावं, असा आग्रह सर्व संचालक मंडळानं धरला. स्वतः पदावर न जाता दुसऱ्यांना संधी द्यायची, हे पहिल्यापासूनच साहेबांचं धोरण. त्यापूर्वी ते एकदाच अध्यक्षपदी होते. पण, संचालकांचा आग्रह मान्य करत त्यांनी अध्यक्षपद स्वीकारलं आणि मलाही नव्या संचालक मंडळात उपाध्यक्ष होण्याची संधी दिली. तेव्हापासून आजवर मी साहेबांसोबत या पदावर आहे, याचा मनस्वी आनंद वाटतो.

विश्वासाच्या बळावर बँकेनं पन्नास वर्षांचा यशस्वी टप्पा पूर्ण केला. याचीही इतिहासात

नोंद होणार आहे. अशा या देदीप्यमान कालावधीत साहेबांनी पुन्हा एकदा अध्यक्षपदाची धुरा सांभाळावी, अशी सर्वांची इच्छा होती. तसा आग्रह आम्ही त्यांच्यासमोर धरला. तुम्ही लावलेल्या या छोट्याशा रोपट्याचा आज वटवृक्ष झालाय, या सुवर्ण महोत्सवात आपणच अध्यक्ष असावं, अशी भावना व्यक्त केली. त्याचा त्यांनी स्वीकार केला. लांडगेसाहेब पवना बँकेचे संस्थापकच नव्हे, बँकेच्या कुटुंबाचे पालक आहेत. त्यांनी ठरवलं असतं, तर तेच सातत्यानं अध्यक्षपदी आरूढ राहू शकत होते. आपण अनेक ठिकाणी पाहतोही, की संस्थापक सातत्यानं अध्यक्ष असतात. पण, साहेबांचं समाजकारण मुळातच बेरजेचं असतं. आपणच नव्हे, तर इतरांनाही मोठं करायला हवं, या उद्देशातून त्यांनी प्रत्येक वेळी संचालक मंडळातील अनेकांना अध्यक्षपदी विराजमान केलं. प्रत्येक निवडणुकीत संचालक मंडळात जुन्या आणि नव्यांचा मेळ साधला. नव्यांना संधी दिली. त्यातून उत्कृष्टपणे बँकेचा कारभार चालवला.

संचालकपदासाठी उमेदवारांची निवड करताना साहेब सर्वांचा आणि सर्वांगानं विचार करतात. माणूस कोणत्या पक्षाचा, हे कधीच ते पाहत नाहीत. तो माणूस बँकेसाठी काय करू शकतो, इतकंच ते पाहतात. तुमचा पक्ष कोणताही असो, तो बँकेच्या बाहेर ठेवा, हा सल्ला साहेब नेहमी देतात. बँकेवर असलेल्या संचालक मंडळात वेगवेगळ्या राजकीय पक्षांतील लोक आहेत. पण, बँकेच्या आवारात पाऊल टाकलं की प्रत्येक जण आपला पक्ष विसरतो आणि केवळ बँकेचा विचार करतो. साहेबांच्या मार्गदर्शनाखाली आणि विश्वासावर आजवर बँकेची प्रगती झाली. प्रगतीचा हा आलेख असाच सदैव उंचावत ठेवण्यासाठी आम्ही सर्व संचालक कटिबद्ध आहोत. बँकेच्या शाखा विस्तारासाठी करोनाच्या काळात रिझर्व्ह बँकेची परवानगी मिळाली नव्हती. पण, आता विविध भागांत शाखा विस्ताराचा प्रयत्न सुरू केला आहे. त्याबाबत नव्यानं रिझर्व्ह बँकेला प्रस्ताव पाठवणार आहोत. जांबे, पुनावळे, चिंचवडगाव, दिघी, तळवडे आदी भागांत शाखांची मागणी करण्यात येणार आहे. शहर आणखी विस्तारत असताना या नव्या भागातही सर्वसामान्यांपर्यंत बँकेचा लाभ पोहोचवण्याचा मानस आहे.

सभासदांच्या विश्वासाचं मोठं भांडवल बँकेनं आजवर कमावलं आहे. त्याबाबतचं एक उदाहरण माझ्या कायम स्मरणात आहे. काही वर्षांपूर्वी संचालकांचा कोणताही दोष नसताना पहिल्यांदाच बँकेवर संकट आलं होतं. या संकटावर संचालक मंडळानं एकजुटीनं आणि मोठ्या आत्मविश्वासानं मात केली. त्यात सभासदांच्या विश्वासाचं बळही होतं. त्या संकटातून बँकेला बाहेर काढण्यासाठी संचालकांनी स्वतःचे पैसे भरले. त्यातून व्यवहार पूर्वस्थितीत आले आणि काही कालावधीनंतर बँकेच्या निवडणुकाही झाल्या. त्या काळात मी संचालक नव्हतो, पण आपली बँक म्हणून घडामोडींवर लक्ष होते. तेव्हा सभासदांचा बँकेवरील अतूट विश्वास मी पाहिला. बँकेबाबत संकटाची माहिती मिळाली असतानाही काळेवाडीच्या शाखेत बँकेत ठेवी जमा करण्यासाठी लोकांच्या रांगा होत्या. त्याचा मी साक्षीदार होतो. हा केवळ साहेबांनी कमावलेला विश्वास आहे. त्यांच्याच नावावर ही बँक चालते. पैसा कोणा संचालकाचा नाही, तो लोकांनी विश्वासानं आपल्याकडे सोपवला आहे. फक्त त्याचं वाटप आणि वसुली सुयोग्य करायची, हेच साहेबांचं सांगणं असतं. बँकेनं आजवर अनेकांना कर्जरूपानं मदतीचा हात दिला आहे. त्यातून अनेक जण मोठे व्यावसायिकही झाले आहेत. अगदी रस्त्यावरच्या माणसालाही उभं करण्यासाठी बँकेनं हातभार लावला आहे. हे काम यापुढेही अखंड सुरूच राहील.

स्पर्धेच्या आणि अत्याधुनिकतेच्या युगात बँक सातत्यानं नव्या योजना आणि संकल्पना राबवत आहे. मोबाइल आणि इंटरनेटवर आधारित विविध सुविधाही सभासदांना दिल्या जात आहेत. जवळपास प्रत्येक शाखेत एटीएम केंद्राची सुविधा उपलब्ध आहे. पुढील काळातही नवनव्या संकल्पना नियोजित आहेत. 'बँक आपलं कुटुंब', या आपुलकीच्या भावनेतूनच आम्ही संचालक बँकेत काम करतो. एखाद्या वेळेस कुटुंबात हेवे-दावे होत असतील, पण बँकेत कोणतेही हेवे-दावे होत नाहीत. कोणतेही निर्णय सर्वांच्या विचारानेच घेतले जातात, हेच त्याचं मुख्य कारण म्हणता येईल. कर्मचारीही नियमांवर बोट ठेवून काम करतात. त्यामुळे त्यांच्याशी संचालक मंडळाचे वाद होण्याचे प्रसंगही कधी येत नाहीत. कर्मचारी हा कोणत्याही संस्थेचा कणा असतो, ही साहेबांची भूमिका आहे. त्या भूमिकेतूनच कर्मचारी अधिकारी आणि संचालक मंडळ बँकेच्या प्रगतीसाठी अखंड कार्यरत आहेत

# मदतीची कर्तव्यभावना

**पवना बँकेच्या कामकाजाला शिस्त आहे. कोणीही बँकेचं वाहन वापरत नाही. बैठकांचा भत्ताही अनेक वर्ष घेतला नाही. कर्ज देताना नातं-गोतं किंवा ओळख पाहिली जात नाही. कागदपत्रांची पूर्तता नसेल, तर अजिबात कर्ज दिलं जात नाही. नियमात बसणाऱ्या होतकरूंना सहज कर्ज मिळतं. बँकेनं विश्वास कमावला आणि मोठ्या सचोटीनं तो टिकवून ठेवला. माणूस गरज म्हणून भांडवलासाठी बँकेत येतो, आम्ही त्याचं चारित्र्यही पाहतो. संकटात त्याला उभं करतो. रंजल्या गांजलेल्यांना मदतीच्या कर्तव्य भावनेतूनच बँकेत काम होतं.**

**वसंत आनंदराव लोंढे** (संचालक)



पन्नास वर्षांपूर्वी चिंचवड स्टेशनला नालबंद चाळीत पत्र्याच्या दोन खोल्यांमध्ये पवना बँकेची पहिली शाखा सुरू झाली. आज भव्य, सुसज्ज आणि अत्याधुनिक इमारतीत बँकेचं प्रशासकीय कार्यालय मोठ्या दिमाखात उभे आहे. यावरून बँकेच्या प्रगतीचा चढता आलेख लक्षात येईल. पिंपरी- चिंचवड शहरात सहकारी बँका नव्हत्या. अण्णासाहेब मगर यांनी या भागात लक्ष घातल्यानंतर प्रथमतः नगरपालिका स्थापन केली. इतर अनेक प्रकल्पांसह पवना बँकेची मुहूर्तमेढही त्यांनी रोवली. सुरुवातीला ते अध्यक्ष आणि माझे गुरू ज्ञानेश्वरजी लांडगेसाहेब उपाध्यक्ष होते. बँकेचं प्रमुख कामकाज लांडगेसाहेबच सांभाळत. पाच गावं मिळून झालेल्या नगरपालिका क्षेत्रात प्रामुख्यानं शेतकरी वर्ग राहत होता. एखादा व्यवसाय करायचा झाल्यास त्याला पुरेशी माहिती नव्हती. व्यवसायाचं कुणी डोक्यात घेतलं, तर राष्ट्रीयीकृत बँका कर्जासाठी उभेच करत नव्हत्या. अशा साध्या आणि सामान्य माणसांच्या मागे पवना बँक ठामपणे उभी राहिली.

बँकेला घडवण्यासाठी मोठे कष्ट घेण्यात आले. त्याचा मीही साक्षीदार होतो. लांडगे साहेबांसह एकनाथ नाणेकर, शिवराम नलावडे, पांडुरंग काळभोर, दिगंबर काळभोर,

# ॥ एकमेकां साहाय्य करू अवघे धरू सुपंथ ॥

मामासाहेब पिंपळे, विष्णुपंत गावडे आदी मंडळी पहिल्या संचालक मंडळात होती. बँक सुरू करण्यासाठी शेअर्स गोळा करण्याच्या कामात मीही होतो. पन्नास रुपयांचा शेअर होता. आम्ही घरोघरी जाऊन लोकांना बँकेची माहिती दिली. शेअर्ससाठी त्या काळी ५० रुपयेही लोकांकडे नव्हते. काहींनी पावत्या घेतल्या, पण ५० रुपयांसाठी घरी तीन-तीन चकरा माराव्या लागल्या. अखेरीस बँक सुरू झाली आणि लांडगेसाहेबांच्या नेतृत्वाखाली हळूहळू तिने प्रगती केली.  आमच्यासारखे अनेक वर्ष बँकेत काम करणारे आणि नव्यानं येणाऱ्या संचालकांवरही लांडगेसाहेबांचे संस्कार आहेत. लांडगेसाहेब म्हणजे स्वच्छ आणि गैरव्यवहारापासून सातत्यानं दूर राहिलेलं व्यक्तिमत्त्व. १९८६ पासून मी त्यांच्यासोबत आहे. पाच वेळा नगरसेवक झालो. त्यांच्या नेतृत्वाखालीच काम केलं. ते महापौर, आमदार असतानाही मी बरोबर होतो. साहेबांच्या सान्निध्यात असल्यानं कुठे गैरव्यवहार करण्याची आमची इच्छाही झाली नाही. कोणतंही काम करताना साहेब आणि त्यांचा आदर्श डोळ्यासमोर दिसतो. त्यामुळे कदाचित आम्ही पैसेवाले झालो नाही, पण समाजात नावलौकिकाची मोठी संपत्ती कमावली. हाच नावलौकिक आणि सन्मान चिरकाल टिकणार आहे.

१९९७ पासून आता चौथ्यांदा मी बँकेच्या संचालक मंडळावर आहे. लांडगेसाहेबांच्या नेतृत्वानं बँकेच्या कामकाजाला एक शिस्त लावली. कोणीही बँकेचं वाहन वापरत नाही. बैठकांसाठी मिळणारा भत्ताही अनेक वर्ष घेतला नाही. कर्ज देताना कोणतंही नातं-गोतं किंवा ओळख पाहिली जात नाही. कागदपत्रांची पूर्तता नसेल, तर अजिबात कर्ज दिलं जात नाही. नियमात बसणाऱ्या होतकरूंना सहज कर्ज मिळतं. आजवर बँकेने अनेकांना हातभार लावला आहे. त्याची अनेक उदाहरणं सांगता येतील. भोसरीतील विजयराव फुगे हे बांधकाम क्षेत्रातलं मोठं नाव, त्यांच्या व्यवसायाची सुरुवात पवना बँकेच्या कर्जातूनच झाली. भोसरीतीलच चंद्रकांत रासकर हे क्रशिंग आणि खाणीच्या व्यवसायात अग्रेसर आहेत. भोसरी एमआयडीसीतील श्री. मुटके हे अवाढव्य क्रेनच्या व्यवसायात मोठ्या उंचीवर आहेत. या सर्वांच्या व्यवसायाचा पाया बँकेच्या माध्यमातूनच घातला गेला. गरजवंताला सहकार्य करून त्याची प्रगती साधण्याचं ध्येय आम्ही ठेवलं. अगदी फूटपाथवर व्यवसाय करणारे हातगाडीवाले, भाजीपाला विक्रेते यांचीही प्रगती व्हायला हवी. त्यांनीही बँकेकडे आलं पाहिजे, त्यांच्या गरजा बँकेला भागवता यायला हव्यात, हा आमचा उद्देश आहे.

सध्या स्पर्धेचं युग आहे. टिकून राहण्यासाठी नवनवीन तंत्रज्ञान स्वीकारणं काळाची गरज आहे. त्या दृष्टीने बँक नवनवीन पावलं उचलत असून, आम्ही त्याला नेहमीच प्रोत्साहन देतो. बँकेचं प्रशासन आणि संचालक मंडळ ही रथाची दोन चाकं, ती एकसंध चालली तरच रथ प्रगतिपथावर धावेल. बँकेचा विस्तार हळूहळू का होईना, पण भक्कम करायचा. केवळ भरमसाठ शाखा वाढवण्यापेक्षा प्रत्यक्षात असलेल्या शाखा सुस्थितीत चालवण्यावर आमचा भर आहे. टिकून राहण्यासाठी विश्वास महत्त्वाचा आहे, तो बँकेने कमावला आणि मोठ्या सचोटीनं तो टिकवून ठेवला. माणूस गरज म्हणून भांडवलासाठी बँकेत येतो, आम्ही त्याचं चारित्र्यही पाहतो. संकटात त्याला उभे करतो. रंजल्या गांजलेल्यांना मदतीच्या कर्तव्य भावनेतूनच इथे काम केले जाते. 'आपली बँक', ही आस्था आणि विश्वास लांडगेसाहेबांच्या नेतृत्वाखाली आम्ही सर्वसामान्यांत निर्माण केला आहे.

# गरजवंताला आर्थिक पाठबळ

**‘एक कुटुंब’ या भावनेनं आम्ही पवना बँकेत काम करतो. त्याच बळावर बँकेला ५० वर्षे पूर्ण झाली. या कालावधीत अनेक बँका सुरू झाल्या आणि हातघाईलाही आल्या. आपलं कामच बोलतं, असं म्हणतात, त्यानुसार पवना बँकेनं सहकाराच्या क्षेत्रात आदर्श घालून दिला. कागदपत्रांची पूर्तता आणि परतफेडीची क्षमता या दोनच गोष्टी कर्ज देण्यासाठी महत्त्वाच्या ठरतात. त्यात संचालकांची शिफारस नसली तरीही कर्ज मंजूर होतं. याच चाकोरीत आजवर काम झालं. व्यवसायाला हातभार देत बँकेनं अनेकांना आपापल्या क्षेत्रात भरारी घेण्याचं बळ दिलं.**

**जितेंद्र मुरलीधर लांडगे** (संचालक)

कासारवाडीत पवना बँकेची जुनी शाखा होती. छोट्याशा हॉटेल व्यवसायासाठी त्या वेळी बँकेनं मला कर्ज दिलं. त्यातून हॉटेलचा व्यवसाय उभा केला. त्या व्यवसायातूनच बांधलेल्या इमारतीत पवना बँक यावी, अशी माझी आणि वडिलांची मनोमन इच्छा होती. तसं अगदी लहानपणापासूनच पवना बँकेचं नाव ऐकत होतो. ज्ञानेश्वरजी लांडगेसाहेबांचा परिचयही होता. गावातच बँकेची शाखा असल्यानं आणि व्यवहाराच्या निमित्तानं संचालक मंडळाचं कामही माझ्या परिचयाचं होतं. काही कालावधीनंतर आमच्याच इमारतीत बँकेच्या कासारवाडी शाखेचं स्थलांतर झालं. कधीकाळी बँकेच्या संचालक मंडळात काम करण्याचं स्वप्न मी पाहिलं होतं. शाखेचं आमच्या जागेत स्थलांतर झाल्यानंतर त्याबाबतचा मानस पक्का झाला. लांडगेसाहेबांचा राजकीय, सामाजिक आणि सहकार क्षेत्रातला प्रवास अगदी लहानपणापासूनच ऐकला होता. माझ्यासाठी ती एक प्रेरणाच ठरली. आपणही त्यांच्याबरोबर काम करायचं, हे मनोमन नक्की होतं. २०१० मध्ये संचालक मंडळात येण्याचं स्वप्न पूर्ण झालं. तेव्हापासूनच लांडगेसाहेबांच्या तत्त्वानुसार कामाला प्रारंभ केला. तीच तत्त्वे जोपासून आजवर साहेबांच्या मार्गदर्शनाखाली संचालक मंडळात काम करतो आहे.

यंदा मी तिसऱ्यांदा संचालक मंडळात आहे. १४-१५ वर्षे प्रत्यक्ष कारभारात सहभाग घेतोय. त्यातून आलेल्या अनुभवातून एक गोष्ट नक्की सांगू शकेन, बँकेत कोणत्याही हेव्या-दाव्यांना स्थान नाही. कुणाशी मतभेदही होत नाहीत. बँकेच्या कारभारात साहेबांनी एक चाकोरी घालून दिली आहे. कोणतही कर्ज प्रकरण असो, त्यासाठी तुमची बँकेत ओळख किंवा संचालकाशी जवळीक महत्त्वाची ठरत नाही. कर्ज प्रकरणासाठी तुमची कागदपत्रंच बोलतात. त्याला कुणाच्याही शिफारशीची गरज भासत नाही. अगदी कुणाच्या नात्यागोत्यातील, ओळखीतील प्रकरण आलं तरीही मतभेदांना जागा नसते. कागदपत्रांची पूर्तता आणि परतफेडीची क्षमता या दोनच गोष्टी कर्ज देण्यासाठी महत्त्वाच्या ठरतात. त्यात संचालकांची शिफारस नसली तरीही कर्ज मंजूर होतं. याच चाकोरीत आजवर काम झालं. व्यवसायाला हातभार देत बँकेनं अनेकांना आपापल्या क्षेत्रात भरारी घेण्याचं बळ दिलं. त्याची अनेक उदाहरणे देता येतील. आमच्याच कासारवाडीमधील राजेंद्र चेडे यांची माउली ऑटो गॅरेज ही छोटीशी टपरी होती. बँकेनं केलेल्या मदतीतून त्यांनी ‘माउली ट्रॅव्हल्स’ या नावानं

# ॥ एकमेकां साहाय्य करू अवघे धरू सुपंथ ॥

मोठा व्यवसाय उभा केला. व्यवसायातील यशाचं शिखर सर करण्यासाठी बँकेनं त्यांना बळ दिलं. नियमात बसत असेल, तर रस्त्यावरच्या हातगाडीवाल्यापासून मोठमोठ्या उद्योजकांसाठीही बँक मदतीचा हात सदैव पुढे करते.

तुमचा पक्ष बाजूला ठेवून इथे काम करा, ही साहेबांची शिकवण. त्यामुळंच एक कुटुंब या भावनेनं आम्ही बँकेत काम करतो. त्याच बळावर आज बँकेला ५० वर्षे पूर्ण झाली. या कालावधीत शहरात तसेच जिल्ह्यात अनेक बँका सुरू झाल्या आणि हातघाईलाही आल्या. आपलं कामच बोलतं, असं म्हणतात, त्यानुसार पवना बँकेनं सहकाराच्या क्षेत्रात आदर्श घालून दिला. इथला कर्मचारीही आपलं कुटुंब असल्याप्रमाणे काम करतो. बँकेच्या यशात त्याचाही वाट मोलाचा ठरतो. सर्वांच्या प्रयत्नातून साहेबांच्या विश्वासावर या पुढील काळातही बँकेची वाटचाल अशीच यशाकडे अग्रेसर राहणार, यात किंचितही शंका नाही.



# बँक नव्हे, सर्वांचं कुटुंबच

पवना बँकेत आजपर्यंत गटबाजी, राजकारण झालं नाही. एका कुटुंबाप्रमाणं सर्व चाललं पाहिजे, हे ज्ञानेश्वरजी लांडगेसाहेब आणि आमच्या ज्येष्ठांनी सांगितलं. त्यानुसारच आजही काम सुरू आहे. मतभेद आणि गटबाजी नाही, हे बँकेच्या यशस्वी वाटचालीचं एक गमक आहे. लांडगेसाहेबांच्या नेतृत्वाखाली आम्ही संचालक आणि अधिकारीही एका कुटुंबाप्रमाणे काम करतो. त्यामुळे सभासदांचा विश्वासही सातत्याने बँकेच्या कामावर वाढत राहिला. त्यातून गेली ५० वर्षे बँकेनं 'अ' दर्जा सोडलेला नाही. एक 'टीम वर्क' इथे होतं.

**शरद दिगंबर काळभोर** (संचालक)



समाजाच्या सर्वच स्तरातील होतकरू मंडळींना मदत करण्याच्या उद्देशाने स्थापन झालेल्या पवना बँकेशी माझा परिचय अगदी बालपणापासूनचा. बँकेची स्थापना झाली, तेव्हा ज्ञानेश्वरजी लांडगेसाहेबांच्या नेतृत्वाखाली माझे वडील दिगंबर काळभोर, तसेच पांडुरंगरावजी काळभोर, मामासाहेब पिंपळे, शंकरलाल मुथा, भिकू वाघेरे पाटील आदी या शहरातील ज्येष्ठ मंडळी काम करत होती. शेतीमधून व्यवसायाकडे वळत असलेल्यांना बँकेनं पाठबळ दिलं आणि अनेक युवकांना उद्योजक म्हणून उभं केलं. आम्हालाही व्यवसाय उभारण्यासाठी बँकेनं मोठी मदत केली. त्यातून निगडीला ट्रान्सपोर्टेशनचा व्यवसाय आम्ही उभारू शकलो. बँकेचं निःस्वार्थी काम आम्ही तेव्हापासूनच पाहत होतो. एखादा युवक होतकरू वाटला, तर त्याला संचालकांनी नक्कीच संधी दिली आहे.

व्यवसायाच्या सुरुवातीला बँकेनं कर्जाच्या रूपानं हात दिला आणि त्या जोरावर उद्योग व्यवसायात मोठी भरारी घेतलेली अनेक उदाहरणं आज शहरात आहेत. भूमिपुत्रांना बँकेनं सहकार्य केलं. त्यातून बँकेतील मंडळींमागे आम्ही

# ॥ एकमेकां साहाय्य करू अवघे धरू सुपंथ ॥

सातत्यानं ठामपणे उभ राहत होतो. सांगितलेलं प्रत्येक काम करायचो. त्याची मला आवडही होती. त्यातूनच लांडगेसाहेबांनी मला २०१५-१६ मध्ये प्रथमच संचालक पदावर संधी दिली. त्या वेळची निवडणूक बिनविरोध झाली. करोनाच्या काळामुळे या टर्ममध्ये आम्हाला पावणेआठ वर्षांचा कालावधी मिळाला. त्यानंतर यंदाही मला संचालक मंडळावर संधी देण्यात आली. बँकेच्या स्थापनेपासून आजवर अनेक निवडणुका बिनविरोधच झाल्या. आजपर्यंत गटबाजी, राजकारण झालं नाही. एका कुटुंबाप्रमाणं सर्व चाललं पाहिजे, हे लांडगेसाहेब आणि आमच्या ज्येष्ठांनी सांगितलं. त्यानुसारच आजही काम सुरू आहे. मतभेद आणि गटबाजी नाही, हे बँकेच्या यशस्वी वाटचालीचं एक गमक आहे.

रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार बँक चालवली जाते. सातत्यानं सर्व सूचना आणि रिझर्व्ह बँकेनं घालून दिलेले निकष पूर्ण करत पवना बँक वाटचाल करत आहे. अजून अनेक लोकांपर्यंत आम्हाला पोहोचायचं आहे. शेड्युल्ड बँकेच्या दृष्टीनं प्रयत्न सुरू आहेत. अटी आणि नियमांत राहूनच बँकेच्या योजना तयार केल्या जातात. त्यातून बँक विकासाच्या मार्गावर अग्रेसर आहे. एखादं कर्ज प्रकरण करताना बँक कुठंही अडचणीत येणार नाही, याची प्रत्येक जण ‘माझी बँक’ या भावनेनंच काळजी घेतो आणि काम करतो. कर्जाची प्रत्येक फाइल काटेकोरपणे तपासली जाते. निःस्वार्थीपणे काम ही आज काळाची गरज झाली आहे.

आमचं आणि बँकेचं नशीब चांगलं आहे. त्याचं कारण येथील कर्मचारी आणि अधिकारी उत्तम आहेत. लांडगेसाहेबांच्या नेतृत्वाखाली ही मंडळी एका कुटुंबाप्रमाणे काम करतात. गेली ५० वर्षे बँकेनं ‘अ ‘ दर्जा सोडलेला नाही. एक ‘टीम वर्क’ इथे होतं. त्यातूनच बँकेची कारकीर्द यशस्वी होऊ शकली. मागच्या पिढीनं आम्हाला निःस्वार्थी कारभाराची शिदोरी दिली आहे. हेच काम घेऊन आम्ही पुढं जाणार आहोत. ज्येष्ठांनी दिलेली शिदोरी बँकेत येणाऱ्या पुढच्या पिढीला देणार आहोत. जुन्या मंडळींचं काम आम्ही प्रत्यक्ष पाहिलंय, त्यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही घडलो. त्याच संस्काराच्या बळावर आम्ही पुढच्या पिढीलाही घडवणार आहोत.

# भूमिपुत्रांना भक्कम आधार

**पिंपरी-चिंचवड शहरामध्ये मराठी माणूस आणि विशेषतः भूमिपुत्र फारसा व्यवसायात नव्हता. पवना बँकेनं याच भूमिपुत्राला भांडवलाचं बळ देऊन उभं केलं. आजच्या घडीला शहरात जे मोठमोठे व्यावसायिक, उद्योजक आपल्याला दिसतात, त्यातील जवळपास ८० टक्के लोकांना पहिलं कर्ज पवना बँकेनं दिल्याचा इतिहास आहे. बँकेचा हा मदतीचा हात त्यांच्याही कायम लक्षात राहिला. ज्येष्ठांनी लावलेलं पवना बँकेचं हे रोपटं आज बहरलं आहे. त्याचा निःस्वार्थ भावनेनं सांभाळ करतानाच, उत्तरोत्तर विस्तार करण्याची जबाबदारी आमच्या खांद्यावर आहे.**

**अमित राजेंद्र गावडे** (संचालक)

चिंचवड स्टेशनला आम्ही ज्या भागात राहायचो, त्याच्या अगदी समोरच पवना बँकेची पहिली शाखा सुरू झाली. त्यामुळे बालपणापासूनच पवना बँक माहीत होती. तिच्याबद्दल ऐकत आलो होतो. छोट्या दुकानाइतक्या जागेत बँकेचा कारभार मी पाहिला आहे. मोठा होत गेलो तसतसं बँकेबद्दल अनेक गोष्टी अनुभवत गेलो आणि त्याविषयी मनात कुतूहलही निर्माण झालं. आम्हा गावडे कुटुंबीयांनाही त्या काळी व्यवसायासाठी पवना बँकेनं मदतीचा हात दिला. बँकेनं दिलेल्या कर्जातून व्यवसायाची वृद्धी झाली. पिंपरी-चिंचवड शहरामध्ये मराठी माणूस आणि विशेषतः इथला भूमिपुत्र फारसा व्यवसायात नव्हता. बँकेनं या भूमिपुत्राला भांडवलाचं बळ देऊन उभं केलं. आजच्या घडीला शहरात जे मोठमोठे व्यावसायिक, उद्योजक आपल्याला दिसतात, त्यातील जवळपास ८० टक्के लोकांना पहिलं कर्ज पवना बँकेनं दिल्याचा इतिहास आहे. बँकेचा हा मदतीचा हात त्यांच्याही कायम लक्षात राहिला. ते अभिमानानं ही गोष्ट सांगतात. त्याचाच एक भाग आमचं गावडे कुटुंबही आहे.

गावडे कुटुंबाचे बँकेशी ऋणानुबंध असल्यानं, मी कधीतरी एक स्वप्न पाहिलं. पवना बँकेच्या कुटुंबात संचालक मंडळात कामाची संधी मिळावी, अशी इच्छा होती. परिसरात राजकीय, सामाजिक क्षेत्रांत काम करतच होतो. पण, पवना बँकेच्या माध्यमातून सहकार क्षेत्रातही कामाचं माझं स्वप्न होतं, ते ज्ञानेश्वरजी लांडगेसाहेबांनी अगदी अलगद माझ्या कुशीत आणून ठेवलं, असं म्हटलं तरी वावगं ठरणार नाही. २०१६ मध्ये साहेबांनी मला पहिल्यांदा बँकेवर संचालक म्हणून कामाची संधी दिली. त्या वेळी निवडणुका झाल्या नाहीत, आम्ही बिनविरोध संचालक मंडळात आलो. त्यानंतर २०२३ मध्येही साहेबांच्या पॅनेलमधून दुसऱ्यांदा संचालक मंडळावर आलो.

शहरातील भूमिपुत्रांनी एकत्र येऊन ही बँक उभारली. साहेबांचा त्यात पुढाकार होता. त्यांनी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी लावलेलं हे रोपटं आज बहरलं आहे. त्याचा निःस्वार्थ भावनेनं सांभाळ करतानाच, उत्तरोत्तर विस्तार करण्याची जबाबदारी आता आमच्या खांद्यावर आहे. आमच्या परीनं आणि साहेबांनी घालून दिलेल्या आदर्शाच्या मार्गावर आम्ही काम करतो आहोत. त्यात थोड्याफार प्रमाणात यश मिळतेय, असं आम्हाला वाटतं. बँक आज आधुनिकतेकडे वाटचाल करत आहे. बँकेकडे आता स्वतःचा 'आयएफएससी' कोडही आहे. संचालक मंडळाच्या बैठकीत सतत नवनव्या गोष्टी आणि खातेदारांच्या सुविधांवर चर्चा होते. त्यासाठी इतर बँकांच्या सुविधांचा आणि तेथील रचनेचाही अभ्यास केला जातो. त्यातून आपल्या बँकेतील सुविधा वाढवण्यावर भर दिला जातो.

# ॥ एकमेकां साहाय्य करू अवघे धरू सुपंथ ॥

संचालक मंडळातील आमचे सर्व सहकारी बँकेच्या प्रगतीसाठी निःस्वार्थ भावनेनं काम करतात. पूर्वी तर बैठकांसाठी मिळणारं मानधनही संचालक घेत नव्हते. आता ते थेट खात्यात जमा होत असल्यानं घ्यावं लागतं. त्यातही महिन्याला केवळ दोनच बैठका आम्ही घेतो. महिन्याला चार बैठकाही घेतल्या जाऊ शकतात, पण साहेबांच्या सूचनेनुसार खर्च आणि बैठकांची संख्या कमी ठेवण्यात आली. बैठकांसाठी मिळणारे पैसेही साहेबांच्याच सूचनेनुसार सर्व संचालक बँकेच्या शेअर्समध्ये गुंतवतात. त्यानुसार वर्षाला प्रत्येकानं किमान ५० हजारांचे शेअर्स घेण्याचं ठरलं आहे. त्यातून बँकेला फायदा होऊ शकणार आहे.

विकासाच्या या प्रवाहात पुढील काळात बँकेला शेड्युल्डची मान्यता मिळवण्याचा संचालकांचा प्रयत्न आहे. त्यासाठीच्या नियम, अटींच्या पूर्ततेचे प्रयत्न सातत्यानं सुरू आहेत. बँकेकडे एखादं कर्ज प्रकरण आल्यास संबंधित व्यक्ती ओळखीची असो किंवा नसो, त्यानं आवश्यक सर्व कागदपत्रांची पूर्तता केली असेल, तर त्याला कोणत्याही संचालकाला भेटण्याची गरज इथे पडत नाही. कर्जासाठी कोणत्याही संचालकाच्या शिफारशीची आवश्यकता लागत नाही. हीच पवना बँकेची विश्वासार्हता आहे.



# जुन्या-नव्या पिढीचा मेळ

**पवना बँकेतील संचालक मंडळात जुन्या-नव्यांचा मेळ साधून समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला जात आहे. प्राध्यापक म्हणून काम करत असताना शिक्षणासाठी लागणाऱ्या कर्जाची मागणी वाढत असल्याचं दिसतं. आमच्या शब्दांत सांगायचं झालं, तर लक्ष्मी आणि सरस्वती बहुदा एकत्र नांदत नाहीत, असं म्हटलं जातं. पण, त्यात बँकेच्या धोरणानं निश्चितच बदल अपेक्षित आहे. गरीब घरातील विद्यार्थी उच्चशिक्षित होण्याच्या मार्गावर केवळ आर्थिक अडचणीच्या कारणानं मागं राहू नये, या दृष्टीने बँकेनं अनेक विद्यार्थ्यांना मदतीचा हात दिला.**

**प्रा. सचिन ज्ञानेश्वर काळभोर** (संचालक)



पवना बँकेच्या सुवर्णमहोत्सवी वाटचालीत अनेक दिग्गज मंडळी आणि अनुभवी लोकांचा सिंहाचा वाटा आहे. ज्ञानेश्वरजी लांडगेसाहेब, व्ही. एस. काळभोरसाहेब, शांतारामजी गराडेसाहेब ही मंडळी बँकेचा कणा आहेत. मोठा अनुभव पाठीशी घेऊन ते बँकेची धुरा सक्षमपणे सांभाळत आहेत. माझ्यासारख्या अनेक नव्या मंडळींनाही ते वेळोवेळी बरोबर घेतात. यंदा बँकेच्या सभासदांनी निवडणुकीच्या माध्यमातून लांडगेसाहेबांच्या निवडीवर शिक्कामोर्तब केलं. साहेबांनी यंदाच्या संचालक मंडळात जुन्या आणि नव्याचा ताळमेळ साधला, तो अभूतपूर्व आहे.

लांडगेसाहेबांचा राजकीय क्षेत्रात मोठा अनुभव आहे. काळभोरसाहेबांची उद्योग क्षेत्रात मोठी ख्याती, तर निवृत्त शहर अभियंता म्हणून गराडेसाहेबांचा या शहराच्या जडणघडणीत मोठा वाटा आहे. या ज्येष्ठ आणि अनुभवी व्यक्तींसोबत यंदा मी संचालक मंडळात आहे. माझ्यासह अमित गावडे, सचिन चिंचवडे, चेतन गावडे या तरुणांना

# ॥ एकमेकां साहाय्य करू अवघे धरू सुपंथ ॥

संधी देऊन जुन्या नव्यांचा अनोखा संगम घातला आहे. अनुभवी आणि सुशिक्षितांचा मेळ त्यातून साधला गेला. हा मेळ बँकेच्या प्रगतीला पोषकच ठरतो आहे.

नव्या-जुन्यांचा, अनुभवी आणि सुशिक्षितांचा हा मेळ बँकिंग क्षेत्रातील नवनवे तंत्रज्ञान आत्मसात करण्यातही उपयोगाचा ठरतोय. नव्या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून विविध सेवा आज बँकेने उपलब्ध करून दिल्या आहेत. रिझर्व्ह बँकेच्या माध्यमातून सहकार आणि बँकिंग क्षेत्रात जे काही बदल सुचवले जातील, ते पवना बँकेत राबवले जाणार आहेत. नवीन पिढी जुन्या संकल्पना लक्षात घेऊनच हे बदल आत्मसात करत आहे.

सध्या विविध क्षेत्रांत घोडदौड होत असताना, बँकेकडे कर्जाला मागणी आहे. प्राध्यापक म्हणून काम करत असताना शिक्षणासाठी लागणाऱ्या कर्जाची मागणी वाढत असल्याचं दिसतं. आमच्या शब्दांत सांगायचं झालं, तर लक्ष्मी आणि सरस्वती बहुदा एकत्र नांदत नाहीत, असं म्हटलं जातं. पण, त्यात बँकेच्या धोरणानं निश्चितच बदल अपेक्षित आहे. गरीब घरातील विद्यार्थी उच्चशिक्षित होण्याच्या मार्गावर केवळ आर्थिक अडचणीच्या कारणानं मागं राहू नये, या दृष्टीने बँकेचा विचार सकारात्मक आहे. हुशार आणि होतकरू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी बँक कर्ज उपलब्ध करून देते. रिझर्व्ह बँकेचे नियम आणि आवश्यक कागदपत्रांची पूर्तता झाली, तर देशातीलच नव्हे, तर परदेशातही उच्च शिक्षणासाठी बँक मदत करते.

बँकेच्या कारभारात जुन्या लोकांनी घालून दिलेले आदर्श, त्यांनी पाडलेले सकारात्मक पायंडे आम्ही पुढे नेणार आहोत. नियमावर बोट ठेवूनच इथे कारभार चालतो आणि तीच परंपरा आम्ही पुढे घेऊन जात आहोत. नियमबाह्य कोणतंही काम बँकेत होत नाही, होणारही नाही, हाच विश्वासाचा वारसा आम्ही पुढे सुरू ठेवणार आहोत.

# समाजातील प्रत्येक घटकाला मदत

**‘पवना बँक ही पाहुण्या-रावळ्यांची बँक’, असा शिक्का काही जण लावतात. पण, त्यात जराही तथ्य नाही. मी बँकेत वसुली अधिकारी असताना सातशे ते आठशे नगरपालिका चतुर्थ श्रेणी कामगार, क्लार्क, मजूर आदी सर्व स्तरातील कामगारांची खाती पवना बँकेत उघडली. त्यांना बँकेनं विविध कारणांसाठी सातत्यानं कर्जवाटपही केलं. इतकंच नव्हे, तर इतर कोणत्याही बँकांपेक्षा अधिकचे कर्ज त्यांना दिलं. पवना बँक एक कुटुंबच आहे. त्यात प्रत्येक जण एका विचारानं काम करतो. समाजातील प्रत्येक घटकासाठी बँक मदतीचा हात सदैव पुढे करते.**

**दादू लक्ष्मण डोळस** (संचालक)

पवना बँकेमध्ये एक लिपिक म्हणून मी रुजू झालो. ऑगस्ट १९८७ ला कामाला सुरुवात केली. कर्जाची थकबाकी काही प्रमाणात वाढल्याच्या काळात मला वसुलीची जबाबदारी देण्यात आली. तेथून थेट २०१४ पर्यंत मी वसुली अधिकारी म्हणूनच कार्यरत होतो. या काळात बँकेची बुडीत कर्जे वाढू दिली नाहीत. २०१४ मध्ये सेवानिवृत्त झालो. पण, अगदी दुसऱ्याच दिवशी बँकेचं पत्र आलं. तुम्ही कामावर हजर राहा, असं त्यात म्हटलं होतं. त्यामुळे पुन्हा तीन वर्षे २०१७ पर्यंत वसुलीची कामं केली. थकबाकीची वसुली करताना मला कोणीही अडथळा केला नाही. याच्यावरच कारवाई का? हा आमचा नातलग, हा जवळचा, हा संचालकांचा ओळखीचा, असा दबाव माझ्यावर कधीच आला नाही. संचालकांच्या अगदी जवळच्या माणसांवरही मी बेधडक जप्तीच्या कारवाया केल्या. पुणे आणि पिंपरी- चिंचवड शहरांमध्येच, नव्हे तर बाहेरच्या जिल्ह्यात जाऊनही पोलीस संरक्षणाशिवाय कारवाया केल्या. सरपंचाच्या गावात जाऊन पारावर त्याच्याच जमिनीचा लिलाव मी केला आहे. हे सर्व करताना माझ्यामागे भक्कम माणूस उभा होता. तो म्हणजे देवमाणूस ज्ञानेश्वरजी लांडगेसाहेब!

माझे वडील अण्णासाहेब मगर यांचे कार्यकर्ते होते. मगरसाहेब, लांडगेसाहेबांचे संस्कार आमच्यावर झाले. त्यामुळे हातून कधीच वाईट काम, चुकीच्या गोष्टी घडल्या नाहीत. बँकेचा वसुली अधिकारी म्हणून मला सरकारी अधिकार होते. वसुलीचे सर्व निर्णय मी माझ्या पद्धतीनं घ्यायचो. पण, एकही निर्णय चुकला नाही. त्यातूनच मला आज साहेबांनी थेट संचालक मंडळात संधी दिली. बँकेत पूर्वीचं माझं काम छोटं होतं, असं मला वाटतंय. संचालक पदावरची जबाबदारी खूप मोठी आहे. सभासद, कर्मचारी सर्वांना सांभाळून घेत काम करावं लागतं. पण, बँकेचं हित लक्षात घेऊन जसं पूर्वी वसुलीचं काम केलं, तीच भावना आजही या पदावर बसल्यानंतर ठेवली आहे. माझा

## ॥ एकमेकां साहाय्य करू अवघे धरू सुपंथ ॥

३२ वर्षांचा अनुभव आता बँकेच्या हितासाठी खर्च करणार आहे. 'पाहुण्या-रावळ्यांची बँक', असा शिक्का काही जण बँकेवर लावतात. त्यात तथ्य नाही. मी असताना सातशे ते आठशे नगरपालिका चतुर्थ श्रेणी कामगार, क्लार्क, मजूर आदी सर्व स्तरातील कामगारांची खाती या बँकेत उघडली. त्यांना बँकेनं कर्जवाटपही केलं. इतर बँकांपेक्षा अधिक कर्ज त्यांना दिलं. पवना बँक एक कुटुंबच आहे. मला बँकेनं खूप काही दिलं, त्याची चांगल्या प्रकारे परतफेड करण्याची संधी संचालक मंडळातील निवडीमुळे आली आहे. चांगली कर्ज आणणे, ती थकबाकीत जाणार नाहीत, याची काळजी घेणं आणि थकबाकी झालीच, तर अधिकाऱ्यांना मी वसुलीसाठी उत्तमपणे मार्गदर्शन करू शकतो. हे काम सातत्यानं करणार आहे. साहेबांच्या विश्वासाला कधीच तडा जाऊ देणार नाही.



# नात्यागोत्यांची नव्हे, सक्षमांची बँक

**‘नात्यागोत्यांची बँक’, असा आरोप नेहमीच पवना बँकेवर होत असतो. पण, नातंगोतं नव्हे, तर जे सक्षम आहेत त्यांनाच घेऊन येथे काम केलं जातं. एखाद्या संचालकानं कर्जदाराची जबाबदारी घेतली असेल आणि त्या प्रकरणात काही थकबाकी राहिली, तर ती त्या संचालकानं भरल्याची अनेक उदाहरणं पवना बँकेत देता येतील. इतर बँकेत ही स्थिती दिसणार नाही. निःस्वार्थ भावनेनं काम होतं. भविष्यात बँकेपुढे अडचण आली, तर संचालक पुन्हा बँक उभी करू शकतात. या विश्वासानंच जनसामान्यांना आर्थिक बळ देण्यासाठी आम्ही बँकेत कुटुंब म्हणून काम करतो.**

**जयश्री वसंत गावडे** (संचालिका)



पिंपरी-चिंचवड महापालिकेत १५ वर्षे नगरसेविका आणि गेल्या २७ वर्षांपासून पवना बँकेत संचालिका म्हणून काम सांभाळत आहे. या दोन्ही वेगवेगळ्या गोष्टी आहेत. एक समाजसेवा, तर दुसरं प्रात्यक्षिक. त्यातून आयुष्यात भरपूर शिकायला मिळालं. ज्ञानेश्वरजी लांडगेसाहेबांना आदर्श ठेवूनच राजकारणात आले. आपल्या कामावर डाग लागणार नाही, आपल्या हातून कुठेही गैरव्यवहार घडणार नाही, हाच आदर्श साहेबांकडून घेतला. बँकेच्या ५० वर्षांच्या इतिहासात दोनतीन वेळेसच निवडणुका झाल्या, नव्हे त्या लादल्या गेल्या, असंच मी म्हणेन. काहींना वाटत होतं, हीच लोकं का? इतक्या वर्ष हेच का काम करतात? पण, याच लोकांनी सर्वसामान्यांत विश्वास निर्माण केला आणि बँकेनं यशाची झेप घेतली.

आपण अनेक बँकांत पाहत असाल, संचालक मंडळ किंवा व्यवस्थापनाच्या ओळखीनं कर्ज प्रकरणं होतात. पण, पवना बँकेत असं कधीच झालेलं नाही, होणारही नाही. कागदपत्रांची पूर्तता करा, कोणत्याही शिफारशीशिवाय तुमचं काम होईल, हा विश्वास बँकेनं जनमानसांत निर्माण केला. निःस्वार्थ भावनेनं कामाचा वसा सुरुवातीपासून घेतला. अनेक वर्षे संचालकांनी मानधनही घेतलं नाही. बैठकांमध्ये केवळ चहाच. बँकेच्या खर्चानं कधी जेवणही

# ॥ एकमेकां साहाय्य करू अवघे धरू सुपंथ ॥

केलं नाही. त्यातून बँकेवरचा विश्वास वाढत राहिला. लांडगेसाहेब, व्ही. एस. काळभोरसाहेब, गराडेसाहेब हे बुद्धिवंत बँकेत एकत्र येऊन काम करतात. ते जणू त्रिदेवच आहेत. त्यांच्याकडून सातत्यानं शिकायला मिळतं. बँकेवरील विश्वास टिकण्याला आणि उत्तरोत्तर वृद्धिंगत करण्यास हीच मंडळी कारणीभूत आहेत. त्यांच्यानंतर आलेली मंडळीही हाच विश्वास कायम राखण्यात यशस्वी होत आहेत.

बँकेच्या योजना उत्तमपणे राबवण्यात संचालकांसह प्रशासनाचाही वाटा मोठा असतो. अवघ्या ५० हजारांपासून तब्बल आठ कोटींपर्यंतची मोठी कर्जे आम्ही दिली आहेत. अनेकांच्या व्यवसायाला हातभार लावत, त्यांना उभारी दिली. छोट्या-मोठ्या स्वयंपाकाची किंवा केटरिंगची कामं करणाऱ्या अनेक महिलांना बँकेच्या माध्यमातून कर्जपुरवठा झाला. त्याची वसुलीही वेळेत होते. थकीत कर्जाच्या वसुलीबाबत वर्तमानपत्रांतून इतर बँकेच्या अनेक जाहिराती आपणाला दिसतील. पण, पवना बँकेची अशा पद्धतीची जाहिरात वर्षातून एखाद्या वेळेसच असेल, हाच पवना आणि इतर बँकांमध्ये मोठा फरक आहे. आम्ही संचालक मंडळात सगळे सक्षम आणि भक्कम मंडळी बसलो आहोत. भविष्यात बँकेपुढे कोणती अडचण आली, तर संचालक पुन्हा बँक उभी करू शकतात. या विश्वासानंच आम्ही बँकेत एक कुटुंब म्हणून काम करतो. कर्मचाऱ्यांसाठीही छोट्या-मोठ्या योजना वेळोवेळी राबवण्यात येतात. या सर्वांतून खातेदार आणि कर्मचारी बँकेच्या कामाबाबत नेहमीच समाधान व्यक्त करतात.

'नात्यागोत्यांची बँक', असा आरोप नेहमीच आमच्यावर होत असतो. पण, नातेगोते नव्हे, तर जे सक्षम आहेत त्यांनाच घेऊन येथे काम केलं जातं. एखाद्या संचालकानं कर्जदाराची जबाबदारी घेतली असेल आणि त्या प्रकरणात काही थकबाकी राहिली, तर ती त्या संचालकानं भरल्याची अनेक उदाहरणं पवना बँकेत देता येतील. इतर बँकेत ही स्थिती दिसणार नाही. निःस्वार्थ भावनेनं काम होतं, काही मिळत नसेल तर संचालक होण्यासाठी इतकी धडपड का? असा प्रश्न काहींना पडतो. समाजकारण, राजकारणात काम करताना पवना बँक हे लोकांना मदत करण्याचे एक उत्तम माध्यम आहे. त्यातूनच आम्ही या बँकेत काम करण्यास सदैव उत्सुक असतो.

# उद्योजकतेसाठी महिलांना प्रोत्साहन

**पन्नासाव्या वर्षांत पवना बँकेनं महिलांसाठी 'गृहलक्ष्मी'सारखी योजना आणली. सवलतीच्या व्याजदरात २५ लाखांपर्यंत कर्ज आपण महिलांना देतो. त्यातून महिलांच्या नावे स्वतःची घर होतील, त्यांचे अस्तित्व समाजात निर्माण होईल, ही भूमिका आहे. योजनेचा लाभ घेण्यासाठी अनेक महिला आपल्याकडे येत आहेत, ही आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे. पुरुषांप्रमाणेच महिला उद्योजकही समाजात निर्माण व्हाव्यात, या दृष्टीनंही आजवर बँकेनं विविध योजना राबविल्या आहेत. प्रत्येक महिला संचालकाने नव्या महिला उद्योजकाला बँकेशी जोडलं आहे.**

**ॲड. उर्मिला तुळशीराम काळभोर** (संचालिका)

पिंपरी-चिंचवड नगरपालिकेच्या स्थापनेनंतर शहराचा झपाट्यानं विकास झाला. शेतकरी, कामगार वर्ग मोठ्या प्रमाणात होता. सावकारी पाशात सर्वसामान्य माणसाला वेठीस धरण्याचं काम केलं जात होतं. या माणसाची कर्जाची गरज लक्षात घेऊन त्याला मदत करण्यासाठी पवना बँकेची स्थापना झाली. अण्णासाहेब मगर यांनी लावलेलं हे रोपटे वाढवण्याचं आणि जोपासण्याचं काम ज्ञानेश्वरजी लांडगेसाहेबांनी केलं. मी वीस वर्षांपूर्वीही बँकेवर काम केलं होतं, तेव्हा उपाध्यक्ष म्हणून लांडगेसाहेबांनी कामाचे संधी दिली. सर्वसामान्य माणसाला ताठ मानेनं उभे करण्यासाठी उपयुक्त ठरणाऱ्या आणि प्रामाणिकपणे काम करणाऱ्यांना लांडगेसाहेब संचालक मंडळात संधी देतात. राजकीय जीवनातही साहेबांच्या पावलावर पाऊल ठेवून आम्ही आलोय. १९९२ ला माझ्यासारखी तरुण मुलगी नगरसेविका झाली. ३२ वर्षे राजकारणात काम केलं आणि बँकेच्या रूपानं सहकार क्षेत्रात कामाची संधी मिळाली.

देशभरातील बँकिंग क्षेत्रात आज रिझर्व्ह बँकेची बदललेली धोरणं अवघड आहेत. त्यात नागरी बँका टिकवून ठेवणं खूप कठीण झालं आहे, असं असतानाही पवना बँकेचं अस्तित्व, विकास केवळ आणि केवळ चांगल्या कामामुळेच टिकून आहे. अनेक बँका आल्या आणि संपल्या, हे आपण पाहिलं. पण पवना बँकेवर जनतेचा विश्वास आहे. जनतेचा पैसा ठेवींच्या रूपानं येतो, कर्जदारांना आपण त्याचा पुरवठा करतो. जनतेचा हा पैसा सन्मार्गाला लावणं आणि त्याची चांगल्या पद्धतीने वसुली करणं, हे साहेबांचं धोरण. त्यातून शहरातील अनेक तरुण उद्योजकांना बँकेने मदतीचा हात दिला. आज त्यांनी स्वतःचा आणि व्यवसायाचा नावलौकिक वाढवला. व्ही. एस. काळभोरसाहेब, शांताराम गराडेसाहेबांचं यात नेतृत्व आहे. या विभूतींच्या मागे मोठा अनुभव आहे. त्यांच्याच भूमिकेतून आज बँक उत्तमरीत्या कारभार करते आहे.

पन्नासाव्या वर्षांत बँकेनं महिलांसाठी 'गृहलक्ष्मी'सारखी योजना आणली. त्यात सवलतीच्या व्याजदरात २५ लाखांपर्यंत कर्ज आपण महिलांना देतो. या माध्यमातून अनेक महिलांच्या नावे स्वतःची घर होतील आणि त्यांचे अस्तित्व समाजात निर्माण होईल, ही भूमिका आहे. योजनेचा लाभ घेण्यासाठी अनेक महिला आपल्याकडे येत आहेत आणि बँक त्यांना पतपुरवठा करते, ही आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे. पुरुषांप्रमाणेच महिला उद्योजकही समाजात निर्माण व्हाव्यात, या दृष्टीनंही योजना आखण्यात आल्या. सध्या आम्ही दोन महिला संचालक मंडळात

# ॥ एकमेकां साहाय्य करू अवघे धरू सुपंथ ॥

आहोत. यापूर्वीही अनेक महिलांनी काम केलं. प्रत्येकीनं नव्या महिला उद्योजकाला बँकेशी जोडण्याचा प्रयत्न केला. स्वतः वकील असल्यानं कायदेशीर बाबतीत आपण बँकेसाठी काय चांगलं करू शकतो, हा माझा सातत्यानं प्रयत्न असतो. वकील, प्राध्यापक, उद्योजक, लेखा परीक्षक, बांधकाम व्यावसायिक आदी विविध क्षेत्रांतील लोक संचालक मंडळात आहेत. प्रत्येकानं आपापलं क्षेत्र, आपापलं कार्य वाटून घेतलं आहे. बँकेचं काम आणि विश्वासार्हता आम्ही आपापल्या क्षेत्रांत घेऊन जात आहोत. बँकेनं अनेकांना पाठबळ दिलं. त्यांच्या क्षेत्रात मोठे करण्यात हातभार लावला. एखादं उदाहरणच द्यायचं झालं तर लक्ष्मणराव काचोळे, हे नाव घेता येईल. त्यांचा छोटा व्यवसाय होता. शून्यातून विश्व निर्माण करत आज त्यांनी महाराष्ट्रासह गुजरात, कर्नाटक राज्यांत उद्योग विस्तारले. सुरुवातीच्या व्यवसायाला बँकेनेच त्यांना मदत केली. मी जो काही आहे, तो केवळ पवना बँकेमुळे आहे, असं ते नेहमी सांगतात.

निःस्वार्थी भूमिकेतून समाजसेवेचा वसा आम्हाला मिळाला. तो जोपण्याचं काम ५० वर्षांत सर्वांनी केलं. सर्वसामान्य माणसांसाठी काम करताना कोणत्याही प्रकारचा गैरकारभार होणार नाही, ही शिकवण आम्हाला मगरसाहेब, लांडगेसाहेबांपासून मिळाली. त्याच शिकवणुकीनुसार आजही काम सुरू आहे. संचालक मंडळात येणारी नवीन पिढीही त्याच मार्गावर चालतेय. माझे पैसे सुरक्षित राहतील का? ही भीती अनेकांमध्ये असते. अनेक बँका पत्त्याच्या बंगल्याप्रमाणं कोसळतात, हे चित्रही लोक पाहतात. असुरक्षिततेच्या वातावरणात आपला पैसा कुठे ठेवायचा, या प्रश्नाचं उत्तर शोधताना पवना बँकेचा आदर्श अनेकांना दिसतो. पन्नास वर्षे प्रामाणिक, निःस्वार्थीपणे जपणूक केली, त्याच पद्धतीनं पुढील शेकडो वर्षे बँकेचे संचालक त्याचा सांभाळ करतील, हा विश्वास निश्चितच आहे.



# पारदर्शकतेतून प्रगतीची भरारी

**अण्णासाहेब मगर यांच्यासारख्या निःस्पृह व्यक्तीच्या नेतृत्वाखाली ज्ञानेश्वरजी लांडगेसाहेबांनी काम केलं. हीच निःस्पृहता लांडगेसाहेबांनी आयुष्यभर जोपासली. त्यातूनच पवना बँकेच्या कारभारात अनियमितता येईल, असं कोणतंही काम संचालक करीत नाहीत. अनेक बँका दिवाळखोरीत गेल्याचं आपण पाहिलं आहे. पण, पवना बँकेबाबत असा प्रकार कधीच होणार नाही. बँकेच्या कारभारात पारदर्शकता कशी राहील, हे लांडगेसाहेबांच्या नेतृत्वानं शिकवलं. त्यामुळे आजपर्यंतचे सर्व संचालक, अधिकारी आणि कामगारांनी बँकेत एकोप्यानं काम केलं. त्यामुळेच बँकेची प्रगती होऊ शकली. प्रगतीची ही भरारी भविष्यातही कायम राहणार आहे.**

**ॲड. गोरक्षनाथ नथू काळे**
(तज्ज्ञ संचालक)

ज्ञानेश्वरजी लांडगेसाहेबांच्या नेतृत्वाखाली मी एक कार्यकर्ता म्हणून पूर्वीपासूनच काम करीत होतो. १९७८ साली मी वकील झालो. त्यानंतरच्या काळात लांडगेसाहेब पिंपरी-चिंचवड महापालिकेचे महापौर झाले. त्या वेळी त्यांच्यासोबत कायदेशीर गोष्टींसाठी काम केलं. पवना बँकेच्या निवडणुकांमध्येही मी कार्यकर्ता म्हणून भाग घेत होतो. २००२-०३ साली बँकेच्या निवडणुकीत लांडगेसाहेब आणि रामकृष्ण मोरेसाहेबांचा पॅनेल होतं. या निवडणुकीत लांडगेसाहेबांचे संपूर्ण पॅनेल विजयी झालं. त्या वेळीही मी साहेबांसोबत होतो. मला पवना बँकेवर तज्ज्ञ संचालक म्हणून घ्यायचं ठरल्यानंतर साहेबांनी संस्थापक-संचालक दिगंबरशेठ काळभोर यांना त्याबाबत सांगितलं. काळेंना घेतलं, तर आपल्याला त्यांचा फायदा होईल. आपला माणूस सोबत राहील, असं त्यांनी सुचवलं. त्यानुसार दिगंबरशेठ यांनी मला निरोप दिला. तुम्ही तज्ज्ञ संचालक म्हणून पवना बँकेवर येता का, असं ते म्हणाले. पण, त्या काळात अनेक कामं सुरू होती. मी बँकेला वेळ देईन की नाही, याबाबत शंका होती. म्हणून मी माझ्या सहकाऱ्यांनी नावं सुचवली. मात्र, आम्हाला तुम्हीच हवे आहात, असं दिगंबरशेठ म्हणाले. त्यामुळे माझा २००८ मध्ये तज्ज्ञ संचालक म्हणून बँकेच्या कारभारात प्रवेश झाला.

लांडगेसाहेबांनी मला बँकेवर घेतलं, त्या काळात बँकेच्या चारपाच शाखा होत्या. बँकेचा कायदेशीर गोष्टींवर होणारा खर्च कमी करण्याबाबत मी सुरुवातीपासूनच प्रयत्न केला. लांडगेसाहेबांनीही माझ्या या प्रयत्नांना भक्कम साथ दिली. २००८ पासून आजपर्यंत साहेबांच्या नेतृत्वाखाली काम करीत असताना बँकेचा पारदर्शक कारभार पाहिला. कुठंही गैरप्रकाराला वाव नाही. मीही बँकेच्या कारभारात सहभागी झाल्यापासून कोणत्याही प्रकारचा लाभ घेतला नाही. बँकांच्या बैठकींचा भत्ताही न घेण्याचा पायंडा लांडगेसाहेबांनी निर्माण केला होता. त्यानुसार संचालक मंडळानं अनेक वर्षे भत्ताही घेतला नाही. बँकेची प्रगती हेच लांडगेसाहेबांचं ध्येय आणि उद्दिष्ट आहे. कारभारात पारदर्शकता आणि कोणताही गैरप्रकार न होता कशा प्रकारे काम करायचं, याचा मोठा अनुभव मला पवना बँकेच्या कामातून मिळाला. लांडगेसाहेबांच्या याच

# ॥ एकमेकां साहाय्य करू अवघे धरू सुपंथ ॥

विचारांवर मी वकिलांच्या दी पूना लॉयर्स कन्झुमर्स को-ऑप सोसायटीचं नेतृत्व करतो. पवना बँकेनुसार, लांडगेसाहेबांच्या विचारांवरच आम्ही त्या ठिकाणीही कारभारात पारदर्शकता आणली.

अण्णासाहेब मगर यांच्यासारख्या निःस्पृह व्यक्तीच्या नेतृत्वाखाली लांडगेसाहेबांनी काम केलं. हीच निःस्पृहता लांडगेसाहेबांनी आयुष्यभर जोपासली आहे. अशा व्यक्ती समाजात आता कमी आहेत. साहेबांनी अनेकांना वेगवेगळ्या ठिकाणी नोकरीला लावलं. कॉलेजच्या माध्यमातून गरीब घरातील मुलांना मदत केली. मदतीतून अनेकांना मोठं केलं. याची अनेक उदाहरणं देता येतील. ही सर्व कामे कोणतीही अपेक्षा न ठेवता त्यांनी केली. कुणीही भ्रष्टाचारात पडू नका, हाच प्रत्येकाला लांडगेसाहेबांचा सल्ला असतो. आज बँकेच्या बावीस शाखा आहेत. त्यात कोणताही संचालक अनियमितता येईल, असं काम करीत नाहीत. अनेक बँका दिवाळखोरीत गेल्याचं आपण पाहिलं आहे. पण, पवना बँकेबाबत असा प्रकार कधीच होणार नाही. आज संचालक मंडळात नवीन पिढीही येते आहे. जुन्या मंडळींसोबत ते काम करतात. जुन्या आणि नव्यांचा संगम करून बँकेच्या कारभारात पारदर्शकता कशी राहील, हे लांडगेसाहेबांच्या नेतृत्वानं शिकवलं. त्यामुळे आजपर्यंतचे सर्व संचालक, अधिकारी आणि कामगारांनी बँकेत एकोप्यानं काम केलं. त्यामुळेच बँकेची प्रगती होऊ शकली. चांगल्या विचारांची माणसं बँकेत असल्यानं प्रगतीची ही भरारी भविष्यातही कायम राहणार आहे. पुढील काळात बँकेच्या प्रगतीच्या दृष्टीनं पुण्याबाहेरही, प्रामुख्यानं औद्योगिक विभागांत बँकेच्या शाखा विस्ताराव्यात, यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त बँकेची आणि सभासदांची भरभराट होवो, हीच माझी सदिच्छा.



# सामान्यांच्या विश्वासाचं भांडवल

**बँक सभासदांची आहे, आपण संचालक मालक नव्हे, केवळ विश्वस्त आहोत, ही वडिलांची (ज्ञानेश्वरजी लांडगेसाहेब) शिकवण. त्यामुळेच बँकेचा कर्जदार, संचालक किवा साधा शिपाईही असो प्रत्येकाला समान वागणूक मिळते. बँकेच्या कामकाजाला त्यांनी एक शिस्त लावून दिली. जवळचा नातेवाईक किंवा अनोळखी व्यक्ती असो, कोणतंही कर्ज प्रकरण नियमानुसारच व्हावं, अशी त्यांची शिस्त आहे. त्यामुळे नियमांत बसत असेल, तर कुणाचंही कर्जप्रकरण होते. याच प्रामाणिक, निःस्वार्थ कामातून पवना बँकेनं सर्वसामान्यांच्या विश्वासाचं भांडवल कमावलं.**

**ॲड. नितीन ज्ञानेश्वरजी लांडगे** (तज्ज्ञ संचालक)



लहानपणापासूनच पवना बँकेच्या कामकाजाबाबत उत्सुकता होती. कधीतरी चिंचवड स्टेशन येथील त्या वेळच्या शाखेत जाण्याचा प्रसंग येत होता. बँकेत केवळ चार ते पाच कर्मचारी होते, १९८०-८१ ची ही गोष्ट. अवघ्या २०० चौरस फुटांत असलेली बँक आज १८० पेक्षा अधिक कर्मचारी, स्वतःची सुसज्ज, दिमाखदार इमारत आणि २२ शाखांनी विस्तारली आहे. ही प्रगती पाहताना अभिमानच नाही, तर गर्वही वाटतो. पिंपरी-चिंचवड नगरपालिका स्थापन झाल्याच्या काळात स्थानिक नागरिकांना कोणत्याही आर्थिक सुविधा नव्हत्या. राष्ट्रीयीकृत बँका सामान्यांना कर्ज देत नव्हत्या, अशा काळात भूमिपुत्रांना मदत करून त्यांची आर्थिक पत निर्माण करण्यात बँकेने मोठा वाटा उचलला, याचा आनंद वाटतो.

जुन्या लोकांनी सचोटीनं बँकेचा पाया रचला. लोकांचा विश्वास मिळवला. माझे वडील (ज्ञानेश्वरजी लांडगेसाहेब) सक्रिय राजकारणात असताना अण्णासाहेब मगर यांच्या नेतृत्वाखाली बँक सुरू झाली. ज्यांच्या शब्दांवर गावं चालत होती, अशी मंडळी वेगवेगळ्या भागातून वडिलांनी एकत्र आणली आणि पवना बँक उभी केली. वडिलांवर या लोकांचा विश्वास होता, तो त्यांनी सार्थ ठरवला.

स्थापनेच्या वर्षात - १९७३ मध्ये बँकेचा नफा अवघा ६४० रुपये होता. आज बँक कोट्यवधीची उड्डाणं घेत आहे. पवना बँक पाहुण्या-रावळ्यांची बँक, अशी खोचक टीका काही जण करतात, त्यांच्या बुद्धीची कीव वाटते. कारण बँकेची स्थापना झाल्याच्या काळात पिंपरी-चिंचवडची लोकसंख्याच ६० ते ७० हजार असेल. चार ग्रामपंचायती एकत्र येऊन निर्माण झालेल्या शहरात गाववाल्यांची संख्या साहजिकच जास्त होती. त्यातीलच प्रत्येक गावातील कारभारी मंडळी एकमेकांच्या नात्यातील होती. अशाच मंडळींनी एकत्र येऊन स्थानिक लोकांच्या आर्थिक उन्नतीचं निःस्वार्थी, प्रामाणिक उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून बँकेची स्थापना केली.

स्थापनेपासून बँकेवर कार्यरत असताना वडिलांनी एकाधिकारशाही, मनमानी कधीच केली नाही  सामाजिक, राजकीय, शैक्षणिक आणि सहकाराच्या क्षेत्रांत वडिलांचा अनुभव मोठा आहे. अनेक मोठ्या राजकीय व्यक्तींचा संपर्क आहे. माझ्या राजकीय कारकीर्दीतही त्यांनी कधी त्या ओळखीचा, संपर्काचा वापर केला नाही, या गोष्टीचा मला निश्चितच अभिमान आहे. वडिलांनी एक पायंडा घालून दिला. त्यानुसारच आम्हाला वाटचाल करायची आहे.

बँक सभासदांची आहे. आपण संचालक मालक नव्हे, केवळ विश्वस्त आहोत, ही वडिलांची शिकवण. त्यामुळेच बँकेचा कर्जदार, संचालक किवा साधा शिपाईही असो प्रत्येकाला समान वागणूक मिळते. बँकेच्या कामकाजाला त्यांनी एक शिस्त लावून दिली. जवळचा नातेवाईक असो किंवा अनोळखी व्यक्ती असो कोणतंही कर्ज प्रकरण नियमानुसारच झालं पाहिजे, अशी त्यांची शिस्त आहे. नियमांत बसत असेल, तरच कर्ज प्रकरण करा, असे ते प्रशासनाला नेहमी सांगतात. त्यातूनच बँकेनं विश्वास कमावला आहे. संचालक मंडळाची कोणतीही चूक नसताना सुमारे पंधरा वर्षांपूर्वी बँकेवर प्रशासक आले होते. आता बँक संपली, अशी भावना सामान्यांमध्ये साहजिकच निर्माण होते. त्याची वर्तमानपत्रांत बातमीही आली. पण, लोकांचा बँकेवर विश्वास होता. त्यानंतर काही दिवसांतच बँकेत तब्बल अडीच कोटींच्या ठेवी जमा करत लोकांनीच हा विश्वास सार्थ ठरवला. नियमांमध्ये कुणालाही सूट नाही. कर्मचाऱ्यानंही नियम तोडला, तर त्यावर योग्य कारवाई होते. वडिलांनी घालून दिलेल्या नियमांमध्ये त्यांनी स्वतःही कधी तडजोड केली नाही.

कोणत्याही प्रकारची मार्केटिंग किंवा जाहिरातीचा मारा न करता बँकेनं लोकांचा विश्वास कमावला. हाच विश्वास आमची जाहिरात आहे. पण, आजच्या स्पर्धेच्या काळात मार्केटिंगचं महत्त्व आहे. त्यामुळे संचालक मंडळातील नव्या लोकांकडून त्यावर काहीसा भर दिला जात आहे. कर्ज वितरणाच्या नवनवीन योजना लोकांपर्यंत आम्ही घेऊन जातोय. बँकिंगशी संबंधित नवनवीन तंत्रज्ञान स्वीकारतो आहोत. ज्येष्ठ संचालकही जुन्या पद्धतींना नव्या तंत्रज्ञानाची जोड देत आहेत. २००० कोटी रुपयांच्या व्यवसायाचं ध्येय पुढील पाच वर्षांसाठी ठेवलं आहे. बँकेच्या विस्ताराचा प्रयत्न सातत्यानं राहणार आहे. संचालक म्हणून नेहमीच वेगवेगळ्या शाखांना भेटी देतो. व्यवसायात वाढ करण्याच्या दृष्टीने खातेदारांच्या अपेक्षाही जाणून घेतो. समर्पणाच्या भावनेतून काम केलं, तर आपली प्रगती कोणीही रोखू शकत नाही, असे वडील सातत्यानं सांगतात.

वडिलांचा राजकीय, सामाजिक, सहकार आणि शैक्षणिक क्षेत्रातील प्रवास पाहतच मी मोठा झालो आहे. बँकेत त्यांनी कधीच राजकारण आणलं नाही. चिंचवडला सध्याच्या प्रशस्त मुख्यालयाच्या उद्घाटनाला मंत्री किंवा मोठ्या राजकीय व्यक्तीला आणू, असं अनेकांचं मत होतं. पण, केवळ नारळ फोडू आणि काम सुरू करू, असं वडिलांनी सांगितलं आणि झालंही तसंच. त्यांच्यात काडीमात्र अहंकार नाही. पवना ही बँक नाही, खरोखरच एक कुटुंब आहे. या बँकेसाठी काम केलेल्या सर्व ज्येष्ठांनी लोकांनी खूप मोठा विश्वास कमावला आहे. हे शिवधनुष्य आहे. कधी-कधी दडपण येतं, आपल्याकडून ते पेलवलं जाईल का? निःस्वार्थ भावनेनं, प्रामाणिकपणे बँकेच्या स्थापनेपासून काम करणाऱ्या या वटवृक्षाच्या सावलीखाली आम्ही आज काम करतो, याचा मनस्वी अभिमान वाटतो. त्यांचा हा वारसा आम्ही नवी पिढी समर्थपणानं पुढं घेऊन जाऊ.



# ।। जे कां रंजले गांजले त्यांसि म्हणे जो आपुले ।।

**जे कां रंजले गांजले। त्यांसि म्हणे जो आपुले।।**
**तोचि साधू ओळखावा। देव तेथेंचि जाणावा।।**
**मृदु सबाह्य नवनीत। तैसे सज्जनांचे चित्त।।**
**ज्यासि आपंगिता नाही। त्यासि धरी जो हृदयीं।।**

'उत्तम व्यवहारा'बरोबरच 'एकमेका साहाय्य करू'पर्यंतच्या सुपंथाचा संदेश जगद्‌गुरू संत तुकाराममहाराजांनी दिला. त्याच धर्तीवर रंजल्या-गांजलेल्यांचा म्हणजे व्यापक अर्थानं अडचणीत असलेल्या, कोणाचाही आधार नसलेल्यांचा आधार होणाऱ्यांचं देवपण तुकोबांनी या अभंगातून उलगडलं आहे. संकटात सापडलेल्यांना आपलं म्हणणारा, पक्षपात न करता त्यांना मायेनं हृदयाशी धरणाराच खरा संत-साधू असतो. त्याच्या पायीच भगवंताचा वास असतो. तुकोबांच्या अभंगातील हा परामर्श पवना सहकारी बँकेनं एका वेगळ्या अर्थानं आपल्या कारभारात सातत्यानं जोपासला आहे. आर्थिक अडचणीत असलेल्या अनेकांना आजवर बँकेनं मदत केली. कोणताही पक्षपात न करता बँक प्रत्येक गरजवंतासाठी आधार ठरली. मदतीच्या अपेक्षेनं बँकेकडे येणारा सर्वसामान्य प्रत्येक माणूस आपलाच, या भावनेनं बँकेनं त्याकडे पाहिलं. त्यामुळेच सर्वांसाठी आज पवना बँक 'आपली बँक' झाली.

# ॥ जे कां रंजले गांजले त्यांसि म्हणे जो आपुले ॥

**बहुजन समाजाला आर्थिक पाठबळ देऊन त्याच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याचं ध्येय आणि उद्दिष्टानं पवना सहकारी बँकेची स्थापना झाली. याच ध्येयानं बँक आजपर्यंत अनेकांचा आधार ठरली. बड्या लोकांना, व्यापाऱ्यांना कोणतीही बँक कर्ज देते, पण पवना बँक खऱ्या अर्थानं बहुजनांचा आधार झाली. बँकेच्या ध्येयाप्रमाणेच तळागळातील मंडळींसाठी काम करण्याची इच्छा असल्यानं तीस वर्षांपासून ज्ञानेश्वरजी लांडगेसाहेबांच्या नेतृत्वाखाली संचालक मंडळात काम करतो आहे. लांडगेसाहेबांच्या नावाला कोणतेही गालबोट न लागता पारदर्शकपणे बँकेचं काम पुढील पिढीनंही करावं, हीच अपेक्षा आहे.**

**शामराव हिरामण फुगे**
(संचालक)



खडकीतील दारूगोळा कारखाना, शेती आणि दुग्ध व्यवसाय हा पूर्वीचा पिंपरी-चिंचवड परिसरातील व्यवसाय, नोकरीचा मूळ गाभा. पिंपरी-चिंचवड नगरपालिका स्थापनेच्या काळात परिसरात औद्योगिक वसाहत विकसित होत होती. परिसरातील नागरिकांचं शिक्षण फारसं नव्हतं. त्यामुळे काही शिक्षित लोकं सोडली, तर अनेकांना लेबर, हेल्पर या पदावरच नोकऱ्या लागत होत्या. अशा काळात अण्णासाहेब मगर, ज्ञानेश्वरजी लांडगेसाहेबांसह त्यांच्या सहकाऱ्यांनी बहुजन समाजाला आर्थिक पाठबळ देऊन त्याच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याचं ध्येय आणि उद्दिष्टानं पवना सहकारी बँकेची स्थापना केली. पवना बँकेशी आमच्या कुटुंबाचा उभारणीपासूनच संबंध राहिला आहे. माझे वडील हिरामण रामभाऊ फुगे, भाऊ दामोदर हिरामण फुगे, आनंद हिरामण फुगे हे संस्थापक सदस्य होते. आमचे चुलते सदाशिवराव रामभाऊ फुगे हे बँकेचे संस्थापक संचालक होते. पन्नास रुपयांचा शेअर्स घेण्यासाठी त्या काळी लोकांकडे पैसे उपलब्ध नव्हते. संस्थापकांनी सुरुवातीला त्यांच्याजवळील पैसे भरून बँक उभी केली. मोठ्या लोकांना, व्यापाऱ्यांना

कोणतीही बँक कर्ज उपलब्ध करून देते, पण पवना बँक खऱ्या अर्थानं बहुजनांचा आधार झाली.

बँकेची पहिली शाखा चिंचवड स्टेशन येथे स्थापन झाली. त्यानंतर बँकेची दुसरी शाखा कासारवाडी येथे मकर संक्रांतीच्या दिवशी सुरू झाली. त्या वेळी इतरही बँका शहरात होत्या. पण, बहुजन समाजाची बँक म्हणून पवना बँकेला ओळख मिळाली. राष्ट्रीयीकृत बँकेत आपला माणूस गेला, की त्याला कर्ज मिळवण्यासाठी अनेक अडचणी येत होत्या. पवना बँक सुरू झाल्यानंतर या मंडळींना छोट्या-मोठ्या अडीअडचणीसाठी बँकेकडून आर्थिक मदत मिळू लागली. १९७५-७६ च्या काळामध्ये घरातील लग्नसोहळ्यासाठी पाच ते दहा हजार रुपयांचं कर्ज लोकांना लागत होतं. ही रक्कमही त्या काळात मोठी होती. कासारवाडीत नाशिक फाट्यावर माझा बांधकाम साहित्य पुरवण्याचा व्यवसाय होता. कासारवाडीत पवना बँकेची शाखा सुरू झाल्यानंतर मी दुसऱ्या बँकेतील खातं बंद करून ते पवना बँकेत उघडलं. १९८८-८९ च्या दरम्यान व्यवसायासाठी महेंद्र कंपनीची जीप घेण्यासाठी बँकेत कर्जाची मागणी केली. पहिल्याच बैठकीत माझं कर्ज मंजूर झालं आणि मी जीप घेऊ शकलो. व्यवसाय वाढीसाठी बँकेच्या कर्जातून मिळालेल्या जीपचा मोठा उपयोग झाला. व्यवसाय वाढत असताना जुन्या संचालक मंडळाच्या संपर्कातून बँकेशी जवळीक वाढली.

बँकेच्या ध्येयाप्रमाणेच तळागळातील मंडळींसाठी काम करण्याची इच्छा असल्यानं १९९०-९१ मध्ये बँकेच्या संचालक मंडळात काम करण्याचा विचार केला. पहिल्यापासूनच फुगे कुटुंबाला सामाजिक कार्याचा वसा होता. त्याच परंपरेत समाजासाठी काहीतरी करण्याची इच्छा असल्यानं १९९२ मध्ये ज्ञानेश्वरजी लांडगेसाहेबांनी बँकेच्या संचालक मंडळात काम करण्याची संधी दिली. बँकेच्या निवडणुकीत साहेबांच्या पॅनेलमधून निवडून आलो. त्या वेळी रामकृष्ण मोरेसाहेबांचं पॅनेल विरोधात होतं. पण, लांडगेसाहेबांच्या नेतृत्वाखाली आमचं पॅनेल लोकांनी निवडून दिलं. त्यानंतर काही दिवसांतच पिंपरी-चिंचवड नगरपालिकेनं त्यांच्या ६० लाखांच्या ठेवी बँकेतून अचानक काढून घेतल्या. त्या वेळी बँकेत दोन-तीन कोटींच्याच ठेवी होत्या. अशा काळात रघुनाथ गावडे, एकनाथ नाणेकर आदी ज्येष्ठ मंडळीसह आम्ही लोकांच्या घरोघरी जाऊन ठेवी वाढवण्यासाठी काम केलं. लांडगेसाहेबांच्या नेतृत्वाखाली सातत्यानं बँकेच्या प्रगतीचा आलेख उंचावत ठेवला.

गेल्या सलग तीस वर्षांपासून मी बँकेच्या संचालक मंडळात कार्यरत आहे. अध्यक्ष आणि उपाध्यक्षपदी काम करण्याची संधीही मला मिळाली. मी अध्यक्ष असल्याच्या काळात पिंपरी गाव आणि काळेवाडी शाखा सुरू झाल्या. लांडगेसाहेब आमचा आधारस्तंभ आहेत. त्यांच्या नेतृत्वावर आमचा दृढ विश्वास आहे. त्यांच्या नावाला कोणतेही गालबोट न लागता पारदर्शकपणे बँकेचं काम पुढील पिढीनं करावं, हीच अपेक्षा आहे. बँकेवर सभासद, ठेवीदारांनी विश्वास टाकला. त्याला पात्र राहण्याचा प्रयत्न आम्ही करतो आहोत. बँकेच्या वाढीमध्ये कर्मचाऱ्यांचा वाटाही मोठा आहे. लांडगेसाहेबांच्या नेतृत्वाखाली बँकेच्या छोट्या रोपट्याचा आज वटवृक्ष झाला. तो कायम फुलवत ठेवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

# तळागळातल्या माणसांच्या हक्काची बँक

गेली वीस वर्षे पवना सहकारी बँकेच्या संचालक मंडळात आहे. ज्ञानेश्वरजी लांडगेसाहेब आणि सर्व मंडळींनी मला अध्यक्ष आणि उपाध्यक्ष होण्याची संधी दिली. वडील हरिभाऊ दिनाजी वाघेरे पवना सहकारी बँकेचे संस्थापक संचालक होते. वडिलांच्या या कामातूनच मला बँकेबाबत पूर्वीपासूनच आवड निर्माण झाली होती. बँकेच्या प्रगतीच्या दृष्टीनं सभासद वाढीसाठी, तळागळातील माणसांना व्यवसायासाठी कर्ज मिळवून देणे तसेच बँकेच्या योजनांची माहिती देण्यासाठी सातत्यानं प्रयत्न केला. अनेकांना आर्थिक मदतीतून बँकेनं पत दिली. मला बँकेच्या कामातून समाजात वेगळी ओळख मिळाली.

**शिवाजी हरिभाऊ वाघेरे**
(संचालक)

माझे वडील हरिभाऊ दिनाजी वाघेरे पवना सहकारी बँकेचे संस्थापक संचालक होते. बँक उभी करताना वडिलांनी गावात पन्नास रुपयांचे शेअर जमा करून समाजातील सर्वच घटकातील लोकांना सभासद करून घेतलं. वडील बँकेबाबत गावात सर्वांना समजून सांगत होते. अडचणीच्या काळात त्यांना बँकेकडून कर्ज मिळवून देण्यासाठी प्रयत्न करीत होते. लोकांना स्वतःच्या खर्चानं बँकेत आणायचं, परत घेऊन जायचं, हे त्यांनी अनेक दिवस केलं. पूर्वी येण्या-जाण्यासाठी प्रवासाच्या सुविधा नव्हत्या. आमच्याकडे जीपगाडी होती. त्यातच बसवून वडील लोकांना बँकेत घेऊन येत असत. वडिलांच्या कामातूनच मला बँकेबाबत पूर्वीपासून आवड निर्माण झाली.

सुरुवातीला मी बांधकाम व्यवसायात होतो. १९८६ मध्ये लांडगेसाहेब पिंपरी-चिंचवड महापालिकेत महापौरपदी होते. या काळात पिंपरी गावात बांधकाम व्यवसायातील माझ्या पहिल्या प्रकल्पाचा आराखडा मंजूर झाला. त्यानंतर काही काळ बांधकाम व्यवसायात राहिलो. पण, नंतर शेतीकडे लक्ष दिलं. गेली वीस वर्षे पवना सहकारी बँकेच्या संचालक मंडळात आहे. मला १९९८ मध्ये लांडगेसाहेबांनी स्वीकृत सदस्य म्हणून संधी दिली. त्यानंतर संचालक मंडळात मी पॅनेलमध्ये बिनविरोध निवडून आलो. दुसऱ्यांदाही बिनविरोध निवडणूक झाली. या कालावधीत दामोदर गव्हाणेसाहेब अध्यक्ष होते. त्या वेळी मला उपाध्यक्ष म्हणून काम करण्याची संधी मिळाली. काही कालावधीनंतर लांडगेसाहेबांनी मला बँकेच्या अध्यक्षपदी विराजमान केलं. बँकेत नोकरभरती असताना साहेब गरजू आणि प्रामाणिक लोकांना प्राधान्य देत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही आपल्या परिसरातून अशा लोकांचा शोध घेऊन त्यांना बँकेशी जोडले. बँक वाढीच्या दृष्टीनं प्रामाणिकपणे काम करणारा व्यक्ती कोणत्याही जाती-धर्माची असो, त्याला साहेबांनी बँकेत नोकरीच्या माध्यमातून कामाची संधी दिली.

बँकेच्या प्रगतीच्या दृष्टीनं सभासदवाढीसाठी सातत्यानं प्रयत्न केला. तळागळातील माणसांना व्यवसायासाठी कर्ज मिळवून देणे तसेच बँकेच्या योजनांची माहिती देण्यासाठी सातत्यानं काम केलं. एक आठवणीतील उदाहरण आवर्जून सांगता येईल, राजेंद्र वाघेरे यांचं नेहरूनगरला  किराणामालाचं छोटे दुकान होतं. बँकेनं

# ॥ जे कां रंजले गांजले त्यांसि म्हणे जो आपुले ॥

त्यांना व्यवसायासाठी वेळोवेळी मदत केली. आज त्याच मदतीच्या बळावर त्यांनी दुचाकी वितरकाच्या व्यवसायात मोठी भरारी घेतली आहे. अशा प्रकारे अनेकांना बँकेनं मदत केली. अण्णासाहेब मगर, ज्ञानेश्वरजी लांडगेसाहेब आणि आमच्या वडीलधाऱ्या मंडळींनी अत्यंत प्रामाणिक उद्देशानं बँकेची स्थापना केली. विश्वास जपण्यासाठी मोठी मेहनत घेतली. छोट्या जागेतून सुरू झालेल्या बँकेच्या आज २२ शाखा झाल्या. ठेवी आणि कर्ज वितरण वाढलं, तरच बँकेची प्रगती होणार आहे. त्या दृष्टीनं आम्ही सातत्यानं कर्ज वितरण आणि ठेवीवाढीसाठी प्रयत्न करीत असतो. बँकिंगच्या क्षेत्रात सध्या अत्याधुनिक गोष्टींना प्राधान्य आहे. ग्राहकांना अधिकाधिक चांगल्या सुविधा देण्यासाठी आम्ही सातत्यानं नवनवीन तंत्रज्ञान बँकेत आणण्यासाठी प्रयत्नशील आहोत.

लांडगेसाहेब आणि सर्व मंडळींनी मला अध्यक्ष आणि उपाध्यक्ष होण्याची संधी दिली. त्यातून माझी समाजात ओळख निर्माण झाली. व्यवसायातून निर्माण होणारी ओळख अपुरी होती, पण बँकेच्या माध्यमातून ती परिपूर्ण होऊ शकली. बँकेची भरभराट आणि वाढ कशी होईल, याकडेच आमचं लक्ष राहणार आहे. लांडगेसाहेबांच्या कामात प्रामाणिकता आहे. या प्रामाणिकतेवर लांडगेसाहेबांची बँक म्हणूनच पवना बँकेची ओळख निर्माण झाली आहे. भविष्यात बँकेच्या पन्नास शाखा व्हाव्यात, ही इच्छा आणि साहेबांच्या नेतृत्वाखाली त्या होतील, अशी आशा आहे.



# अडचणीतील प्रत्येकाला मदतीचा हात

**पवना बँक स्थापनेसाठी पन्नास रुपयांचा शेअर्स घेणाऱ्यांत आमचं कटुंब होतं. तेव्हापासून प्रत्येक वेळी गरजेच्या काळात बँकेनं मदतीचा हात दिला. अडचणीत असलेल्या गरजवंतांना मदतीच्या माध्यमातून उभं करण्याचं बँकेचं काम लहाणपणापासून पाहत आलो होतो. २०१५ पासून मी बँकेच्या संचालक मंडळात कार्यरत आहे. बँकेच्या स्थापनेपासून आजपर्यंत बँकेवर आलेल्या संचालकांनी प्रामाणिक कामाचा आदर्श समाजापुढे ठेवला आहे. गरीब कुटुंबातील व्यक्तींना आर्थिक मदतीतून न्याय देण्याचं ध्येय ज्ञानेश्वरजी लांडगेसाहेबांनी ठेवलं आहे. त्यांच्याच पावलावर पाऊल ठेवून आम्ही काम करतो आहोत.**

**सुनील शंकर गव्हाणे**
(संचालक)



पवना बँकेशी आमचे जुने संबंध आहेत. माझे वडील शंकर गव्हाणे बँकेचे संस्थापक सदस्य होते. बँक सुरू करताना पन्नास रुपयांचे शेअर्स जमा केले जात होते. तेव्हा बँकेचे संस्थापक संचालक सदाशिवराव फुगे पन्नास रुपयांचा शेअर्स घेण्यासाठी आमच्या घरी आले होते. तेव्हापासून आमच्या कुटुंबाचं पवना बँकेशी घट्ट नातं आहे. बँक उभारणीच्या पहिल्या शेअर्समध्ये आमच्या कुटुंबाचा सहभाग नोंदवला गेल्यापासून बँक आमच्या पाठीशी उभी राहिली. प्रत्येक वेळी बँकेनं मदतीचा हात दिला. त्या जुन्या आठवणी आजही कायम आमच्या स्मरणात आहेत. १९७६-७७ मधील गोष्ट असेल. बहिणीचा विवाह होता. त्यासाठी आम्हाला तीन हजारांचं कर्ज मिळालं होतं. त्यानंतर १९८० मध्ये आम्हाला घर बांधायचं होतं, तेव्हाही बँकेने कर्जाच्या रूपानं मदत केली. घरासाठी बँकेनं पाच हजार रुपयांचं कर्ज दिलं.

अडचणीत असलेल्या गरजवंतांना मदतीच्या माध्यमातून उभं करण्याचं बँकेचं काम मी लहाणपणापासून पाहत आलो होतो. मोठा झाल्यानंतर व्यवसाय करू

# ॥ जे कां रंजले गांजले त्यांसि म्हणे जो आपुले ॥

लागलो. सुरुवातीला वीटभट्टीचा व्यवसाय करताना त्यासाठी ट्रक घेण्याची आवश्यकता होती. वीटभट्टीवरील माल ग्राहकांपर्यंत पोहोचवण्यात अनेक अडचणी येत होत्या. अधिकाधिक ग्राहकांना जोडण्यासाठी ट्रकची गरज होती. वडिलांच्या सूचनेनुसार पवना बँकेकडे कर्जाची मागणी केली. सदाशिव फुगेसाहेबांना भेटून कर्जाचा अर्ज आणला. काही दिवसांतच कर्जाची मंजुरी होऊन ट्रक मिळाला. त्या ट्रकच्या माध्यमातून व्यवसायाला बळ मिळालं. त्यातून मी पुढं बांधकाम व्यवसायात मजल मारली. पहिल्या प्रकल्पाला २००८-०९ मध्ये बँकेनं ७५ लाखांचं कर्ज दिलं. त्यातून या व्यवसायात भरभराट आली.

आमचे चुलते दामुअण्णा गव्हाणे हे बँकेचे संचालक होते. ते काही काळ अध्यक्षही राहिले. त्यांच्यानंतर माझे बंधू, पिंपरी-चिंचवड महापालिकेतील माजी नगरसेवक अजित गव्हाणे हेही संचालक मंडळात होते. बँकेशी माझा लहानपणापासूनच संबंध होता. पण, बंधू अजित गव्हाणे यांनी मला बँकेच्या संचालक मंडळात काम करण्याची प्रेरणा दिली. तेच मला ज्ञानेश्वरजी लांडगेसाहेबांकडे घेऊन गेले. साहेबांनी मला संधी दिली आणि २०१५ पासून आजपर्यंत मी पवना बँकेच्या संचालक मंडळात कार्यरत आहे. बँकेच्या स्थापनेपासून आजपर्यंत बँकेवर आलेल्या संचालकांनी प्रामाणिक कामाचा आदर्श समाजापुढे ठेवला आहे. कर्मचारी आणि अधिकाऱ्यांनीही ग्राहकांशी आपुलकीचे संबंध ठेवत उत्तम सेवा दिली आहे. गरीब कुटुंबातील व्यक्तींना मदतीतून न्याय देण्याचं ध्येय ज्ञानेश्वर लांडगेसाहेबांनी ठेवलं आहे. त्यांच्याच पावलावर पाऊल ठेवून आजवरच्या संचालक मंडळानं काम केलं आहे. त्यातून बँकेची प्रगती साधली आहे.

बँकेच्या मदतीतून व्यवसाय, उद्योगांत मोठी भरारी घेतलेले अनेक लोक आपल्या शहरात आहेत. त्याची अनेक उदाहरणं देता येतील. बँकेची माहिती नागरिकांपर्यंत घेऊन जाण्यासाठी आम्ही सतत प्रयत्नशील असतो. मित्रमंडळी, नातलगांपर्यंत बँकेच्या योजना पोहोचवत असतो. नागरिकांमध्ये विश्वासाचं नातं निर्माण केलेल्या पवना बँकेनं चारचौघांत ओळख निर्माण करून दिली.

# बँकेच्या माध्यमातून जनसामान्यांची सेवा

**पवना सहकारी बँकेत संचालक म्हणून काम करणारी व्यक्ती नगरसेवकापेक्षा कमी नसते, असं आपल्या शहरात मानलं जातं. त्याचाच प्रत्यय मलाही आला. नगरसेवक आणि बँकेत संचालक म्हणून काम करीत असताना अनेक लोकांना बँकेच्या माध्यमातून मदत करू शकलो. अनेक गरजवंतांना त्यातून फायदा मिळाला आहे. नियमांच्या बाहेर जाऊन बँकेत कोणतंही काम होत नाही. हे नियम लक्षात घेऊनच नागरिकांना मदत करण्याची भूमिका घेतली. रस्त्यावरच्या छोट्या व्यावसायिकांना ५० हजारांचं छोटं कर्ज देण्यापासून लोकांच्या घराचं स्वप्न पूर्ण करण्यापर्यंतचं कर्ज उपलब्ध करून दिलं.**

**सचिन बाजीराव चिंचवडे**
(संचालक)

माझ्या आयुष्यात पहिलं वाहन घेताना पवना बँकेशी संबंध आला. २०१०-११ मध्ये नवी मोटार घेण्याचा संकल्प केला होता. तेव्हा बँकेत येणं झालं. आपली हक्काची बँक म्हणून होंडा सीटी मोटारीसाठी बँकेकडून कर्ज घेतलं. योग्य त्या कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर कर्जासाठी कोणतीही अडचण येणार नाही, असं बँकेबाबत ऐकलं होतं. कर्जासाठी बँकेत गेल्यानंतर तसाच अनुभव आला. कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर तातडीनं कर्ज मंजूर झालं. त्यातून आम्ही मोटार घेतली, त्याचा आनंद काही निराळाच होता. पण, त्या माध्यमातून मी बँकेशी जोडला गेलो. २०१२ मध्ये बँकेत संचालक मंडळाची निवडणूक झाली होती. तेव्हा मतदार म्हणून बँकेत आलो होतो. मतदान केलं, पण त्यातून बँकेतील संचालक मंडळाच्या कामाबाबत एक सुप्त कुतूहल निर्माण झालं.

संचालकाच्या कामाबाबत मला काही माहिती नव्हती. गणेश पिंजण हे त्या वेळी बँकेत संचालक होते. मलाही बँकेत संचालक व्हायचंय, अशी इच्छा मी त्यांच्याकडे व्यक्त केली. त्यांच्याकडून कामकाजाची माहिती घेतली. संचालक होण्यासाठी लागणारी पात्रता किंवा नियमांची त्यांनी मला माहिती दिली. विशेष म्हणजे ज्ञानेश्वरजी लांडगेसाहेबांच्या विचारांच्या पॅनेलमध्ये असाल, तर तुम्हाला काम करण्याची संधी मिळू शकते, हे त्यांनी आवर्जून सांगतलं होतं. त्यानुसार आम्ही लांडगेसाहेबांच्या भेटीला गेलो आणि त्याबाबतची विनंती केली. साहेबांनी सर्व गोष्टींची चौकशी करून माहिती घेतली. त्यानंतर साहेबांनी मला त्यांच्या पॅनेलमध्ये घेतलं. २०१४-१५ मधील संचालक मंडळात मला पहिल्यांदा काम करण्याची संधी मिळाली. तेथून माझ्या राजकीय कारकीर्दीला खऱ्या अर्थानं सुरुवात झाली. त्याआधी माझं राजकीय किंवा इतर गोष्टींमध्ये स्थान, नाव नव्हतं.

पवना सहकारी बँकेत संचालक म्हणून काम करणारी व्यक्ती नगरसेवकापेक्षा कमी नसते, असं आपल्या शहरात मानलं जातं. त्याचाच प्रत्यय मला २०१७ च्या महापालिकेच्या निवडणुकीत आला. मी नगरसेवक म्हणून निवडून आलो. २०१९ मध्ये उपमहापौर म्हणूनही शहरात काम करण्याची संधी मिळाली. पवना बँकेचं संचालकपद हे या सर्वांचा पाया ठरला. नगरसेवक आणि बँकेत संचालक म्हणून काम करीत असताना अनेक लोकांना बँकेच्या माध्यमातून मदत करू शकलो. अनेक गरजवंतांना त्यातून फायदा मिळाला आहे. नियमांच्या बाहेर

# ॥ जे कां रंजले गांजले त्यांसि म्हणे जो आपुले ॥

जाऊन बँकेत कोणतंही काम होत नाही. हे नियम लक्षात घेऊनच नागरिकांना मदत करण्याची भूमिका घेतली. रस्त्यावरच्या छोट्या व्यावसायिकांना ५० हजारांचं कर्ज देण्यापासून लोकांचं घराचं स्वप्न पूर्ण करण्यापर्यंतचं कर्ज उपलब्ध करून दिलं. माझ्या परिसरातील नागरिकांना बँकेशी जोडून त्यांना २० ते ३० लाखांपर्यंतची कर्ज बँकेच्या माध्यमातून उपलब्ध करू देऊ शकलो.

बँकेत कोणतीही गोष्ट राबवताना रिझर्व्ह बँकेचे नियम आणि दूरगामी विचार करूनच लांडगेसाहेब निर्णय घेतात. पुढच्या पन्नास वर्षांचा विचार त्यांच्या निर्णयात असतो. बँकेसाठी प्रत्येक आधुनिक तंत्रज्ञान स्वीकारतानाही त्यांचा हाच विचार कायम असतो. आज बँकिंग क्षेत्राची देशभरातील स्थिती पाहिली, तर अनेक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचं आपल्याला दिसतं. अशा काळात पवना बँक आजही थाटात उभी आहे. कोणत्याही सहकारी बँकेचं शहरात इतकं मोठ आणि प्रशस्त प्रशासकीय कार्यालय नाही. जमिनीवरचा पाय कायम ठेवूनच प्रत्येक जण बँकेत काम करतो आहे. लांडगेसाहेबांच्या नेतृत्वात काम करण्याची संधी मला दुसऱ्यांदा मिळाली आहे. महापालिकेत उद्या असो अथवा नसो, पण लांडगेसाहेबांसोबत आम्ही कायम राहणार आहोत. साहेबांची विचारधारा दीपस्तंभासारखी माणून आम्ही सातत्यानं काम करत राहणार आहोत. पुढील मंडळींनाही आमचा तोच संदेश असेल.



# रस्त्यावरील माणसाच्या व्यवसायालाही हातभार

**यंदा पहिल्यांदाच मी पवना बँकेच्या संचालक मंडळात आलो आहे. सहकार क्षेत्रात काम करण्याची अनेक दिवसांची इच्छा होती. ती पारदर्शक कामाचा पायंडा असलेल्या पवना बँकेच्या माध्यमातून पूर्ण झाली. आता ज्येष्ठ मंडळींबरोबर मी काम करतो आहे. त्यांच्याकडील अनुभवांचा अभ्यास मी करतो आहे. समाजातील विविध घटकांना बँकेशी जोडता येईल. रस्त्यावरील भाजीपाला, पानटपरीवाला असो, अशा लोकांना बँकेतून कर्ज देऊन त्यांच्या व्यवसायाला हातभार लावू शकतो. कर्जवाटप कायद्यानुसारच होणार, ही लांडगेसाहेबांची आम्हाला शिकवण आहे. त्यातून बँकेचाही फायदा होईल, याचा विचार सातत्यानं केला जातो.**

**चेतन बाळासाहेब गावडे**
(संचालक)



माझे आजोबा विष्णुपंतअप्पा गावडे, हे पवना बँकेचे संस्थापक संचालक होते. १९९२-९३ पर्यंत ते संचालक म्हणून कार्यरत होते. मी लहान होतो. पण, ज्ञानेश्वरजी लांडगेसाहेब, व्ही. एस. काळभोरसाहेब, शांताराम गराडेसाहेबांना पाहत होतो. बँकेतील त्यांच्या कामाची पद्धत माहीत होती. चुलते पांडुरंग विष्णू गावडे यांच्या माध्यमातून या मोठ्या मंडळींच्या संपर्कात आलो. बँकेशी पूर्वीपासून कुटुंबाची नाळ होतीच. खातेही पूर्वीपासून होतं. मोठा होत गेलो तसं बँकेच्या व्यवहारांशी प्रत्यक्षात संबंध येत गेला. २००५-०६ साली घर बांधणीसाठी बँकेकडून कर्ज घेतलं. त्या वेळी आमच्या कुटुंबातील कुणी संचालक मंडळात नव्हतं. आमचं कर्ज मंजूर झालं. पण, हे कर्जाचं प्रकरण करत असताना बँकेच्या व्यवहारात असलेला नियमांतील काटेकोरपणा आणि पारदर्शकता लक्षात आली.

माझे आजोबा संस्थापक संचालक होते. संचालक मंडळातील अनेक जण ओळखीचे होते. असं असतानाही योग्य कागदपत्रांशिवाय बँक कुणालाही कर्ज देत नाही, ही बाब तेव्हापासून मी अनुभवली. कितीही जवळचा

# ॥ जे का रंजले गांजले त्यांसि म्हणे जो आपुले ॥

माणूस असला, तरी नियमात बसल्याशिवाय कुणालाही कर्ज न देण्याची चाकोरी लांडगेसाहेबांनी घालून दिली आहे. लांडगेसाहेब आणि बँकेचं पारदर्शक काम पाहत असतानाच दुसरीकडे सामाजिक क्षेत्रात कामाला सुरुवात झाली. सामाजिक कामाबरोबरच प्रत्यक्षात सहकार क्षेत्रातही काम करावं, अशी माझी इच्छा होती. पवना बँकेतील पारदर्शक कारभार पाहूनच ही इच्छा मनात जागृत झाली होती. त्यामुळे सहकार क्षेत्रातील कामासाठी पवना बँकेचीच मी निवड केली.

बँकेच्या माध्यमातून लोकांसाठी चांगलं काम करू शकतो, असं मला पहिल्यापासून वाटत होतं. त्यातून २०१५ साली मी संचालक मंडळात येण्यासाठी इच्छा व्यक्त केली. त्यासाठी लांडगेसाहेबांची भेट घेतली. तेव्हा ते म्हणाले, ‘तू अजून या क्षेत्रात काम करण्यासाठी परिपक्व नाहीस. त्यामुळे काही दिवस तू थांब आणि माहिती घे’. मला त्यांच्या बोलण्याचं वाईट वाटलं नाही. मी कुठंतरी कमी पडतोय, हे मला कळलं. त्यामुळे सहकार क्षेत्राचा अभ्यास केला. त्याची योग्य माहिती घेतली. त्यानंतर साहेबांनी यंदा २०२३ मध्ये संचालक मंडळाच्या निवडणुकीसाठी मला संधी दिली. त्यातून मी संचालक मंडळात आलो. आता ज्येष्ठ मंडळींबरोबर मी काम करतो आहे. सुरुवातीला त्यांच्याकडील अनुभवांचा अभ्यास मी करतो आहे. त्या अनुषंगाने मला माहिती झाल्यानंतर तो अभ्यास मी इतर सभासदांपुढे मांडू शकतो.

गेल्या १५ वर्षांपासून मी सामाजिक कामांमध्ये कार्यरत होतोच. आता बँकेचा संचालक म्हणून सामाजिक कार्यात त्याचा नक्कीच फायदा होईल. समाजातील गरजवंतांना मी कर्ज उपलब्धतेसाठी मार्गदर्शन करू शकतो. त्यानुसार विविध व्यवसायांसाठी कर्ज उपलब्ध करून देऊ शकतो. अनेकांचं स्वतःच्या वाहनाचं स्वप्नही या माध्यमातून पूर्ण करू शकतो. समाजातील विविध घटकांना बँकेशी जोडता येईल. रस्त्यावरील साधा भाजीपाला, पानटपरीवाला असो, अशा लोकांना बँकेतून कर्ज देऊन त्यांच्या व्यवसायाला हातभार लावू शकतो. कर्जवाटप कायद्यानुसारच होणार, ही लांडगेसाहेबांची आम्हाला शिकवण आहे. आता संचालक मंडळात असताना अनेक मित्र, ओळखीच्या व्यक्ती कर्जासाठी येतात. पण, कागदपत्रं असतील, तरच संबंधितांच्या योग्यतेनुसार कर्ज दिलं जातं. कर्ज देताना बँकेचाही त्यात फायदा होईल, याचा विचार सातत्यानं केला जातो. बँकेमुळे समाजात माझी एक वेगळी ओळख निर्माण होत आहे. प्रत्येक माणसापर्यंत आपली पवना बँक गेली पाहिजे. अधिकाधिक लोकांना बँकेशी जोडण्याचं काम करायचे आहे. बांधकाम क्षेत्रासह सामाजिक क्षेत्रात काम करीत असताना बँक आणि सर्वसामान्यांतील दुवा म्हणून पुढील काळातही काम करण्याची इच्छा आहे.

# आर्थिक पाठबळातून तरुणांना व्यवसायाची संधी

**पिंपरी-चिंचवड शहरात यापूर्वी अनेक बँका निर्माण झाल्या आणि त्यातील बहुतांश बँका बुडाल्याही. ज्ञानेश्वरजी लांडगेसाहेबांच्या नेतृत्वावर लोकांचा विश्वास आहे. पन्नास वर्षांच्या कालावधीत पवना बँकेनं अनेक लोकांना कर्ज दिलं. बँकेनं दिलेल्या मदतीच्या माध्यमातून अनेकांनी व्यवसाय, उद्योगात प्रगती केली. तरुणांना संधी देण्याचं महत्त्वाचं काम बँकेनं जाणीवपूर्वक केलं. अनेक तरुणांनी स्वतःच्या व्यवसायात बँकेच्या आर्थिक पाठबळातूनच प्रगती साधली. शहरात अशी अनेक उदाहरण आहेत. पारदर्शक कामामुळेच बँकेत कोणत्याही प्रकारचे गैरप्रकार होत नाहीत.**

**बिपीन निवृत्ती नाणेकर**
(संचालक)

पवना बँकेची स्थापना झाली, तेव्हा माझे चुलते एकनाथ नाणेकर हे ज्ञानेश्वर लांडगेसाहेबांसोबत होते. त्यांनी संस्थापक संचालक म्हणून काम केलं. चिंचवडला नालबंद चाळीतील एका छोट्या जागेत बँकेची पहिली शाखा सुरू झाली. त्या जागेत सर्व संचालक मंडळी बसून बँकेचा कारभार करीत होती. तिथून सुरू झालेल्या छोट्याशा प्रवासापासून आज बँकेच्या कारभाराला तब्बल पन्नास वर्षे पूर्ण झाली. या पन्नास वर्षांत बँकेच्या कारभाराला कोणताही डाग लागला नाही. बँकेचं नाव कधीही खराब झालं नाही. पिंपरी-चिंचवड शहरात यापूर्वी अनेक बँका निर्माण झाल्या आणि त्यातील बहुतांश बँका बुडाल्याही. लोकांचा लांडगेसाहेबांवर विश्वास आहे. साहेबांचे नेतृत्वगुण आणि काम करून घेण्याची हातोटी उल्लेखनीय आहे. बँकेत पहिल्यापासून लांडगेसाहेबांनी शेतकरी, व्यावसायिक आणि प्रत्येक गावातील, विभागातील माणसांना प्रतिनिधित्व दिलं. साहेबांनी त्यांच्या नेतृत्वाखाली बँकेचाच नव्हे, तर शहराचाही नावलौकिक वाढवला.

माझ्या चुलत्यांनंतर बंधू रवींद्र नाणेकर, नितीन नाणेकर आदी मंडळींनी बँकेवर संचालक म्हणून काम केलं आहे. बंधू नितीन नाणेकर दहा वर्षे संचालक मंडळात होते. त्यांचे काही दिवसांपूर्वी निधन झालं. त्यानंतर लांडगेसाहेबांनी मला संचालक मंडळावर संधी दिली. माझा संचालक मंडळात पहिल्यांदाच प्रवेश होत असला, तरी मला आधीच्या लोकांकडून बँकेबाबत आणि सहकारातील कामाविषयी माहिती होती. माझे चुलते आणि बंधूंनी बँकेत अनेक वर्ष काम केलं आहे. त्यांचा अनुभव पाहून मी आज बँकेच्या संचालक मंडळात मोठ्या आत्मविश्वासानं काम करीत आहे. बँकेत असलेल्या ज्येष्ठ मंडळींचं मार्गदर्शनही वेळोवेळी मिळतं.

पन्नास वर्षांच्या कालावधीत पवना बँकेनं अनेक लोकांना कर्ज दिलं. बँकेनं दिलेल्या मदतीच्या माध्यमातून अनेकांनी व्यवसाय, उद्योगात प्रगती केली. तरुणांना संधी देण्याचं महत्त्वाचं काम बँकेनं जाणीवपूर्वक केलं. अनेक तरुणांनी स्वतःच्या व्यवसायात बँकेच्या आर्थिक पाठबळातूनच प्रगती साधली. शहरात अशी अनेक उदाहरण आहेत. माझा पुतण्या राहुल वाघेरे याला बांधकाम व्यवसायासाठी पवना बँकेनंच सुरुवातीला मदत केली. त्यातून त्यानं दोन-तीन प्रकल्प पूर्ण केले. आज बांधकामाच्या व्यवसायात त्यानं मोठी भरारी घेतली

# ॥ जे कां रंजले गांजले त्यांसि म्हणे जो आपुले ॥

आहे. मीही बांधकाम व्यावसायात आहे. चिंचवडला बँकेची पहिली शाखा असतानाच मी पहिली मोटार बँकेच्या कर्जातूनच घेतली होती. मारुती मोटार तेव्हा नवीनच बाजारात आली होती. ती घेण्याची इच्छा होती. १९८९ साली एक लाखाला ही गाडी होती. त्यासाठी पवना बँकेकडे कर्जाची मागणी केली. कर्जाची मंजुरी करून बँकेनं आमचं गाडी घेण्याचं स्वप्न पूर्ण केलं. पुढील काळात माझ्या बांधकाम व्यवसायालाही वेळेवेळी बँकेनं कर्जाच्या रूपानं आधार दिला.

पवना बँकेच्या संचालक मंडळात काम सुरू केल्यापासून बँकेतील पारदर्शी कारभाराचा प्रत्यक्ष अनुभव घेतला आहे. पारदर्शक कामामुळेच बँकेत कोणत्याही प्रकारचे गैरप्रकार होत नाहीत. योग्य माणसांनाच कर्ज दिलं जातं. त्यातून बँक आज भक्कमपणे उभी आहे. शहरामध्ये बँकेच्या शाखांचा आणखी विस्तार होऊन अधिकाधिक नागरिकांना लाभ व्हावा. बँकेनं पन्नास वर्षांत मोठी प्रगती केली. पुढील आणखी पन्नास वर्षांतही बँकेची अशीच भरभराट होत राहो, ही माझी इच्छा आहे.



# सामान्यांचं कुटुंब उभं करण्यात मोलाचा वाटा

**पवना बँक ही सर्वसामान्यांची आणि आपली बँक आहे. त्या दृष्टीनेच बँकेची धोरणं आखली जातात. गरजू लोकांच्या समस्या सोडवण्यासाठी सातत्यानं बँक उभी राहिली. हातगाडीवर भाजी विक्रीचा व्यवसाय करण्यासाठीही बँकेनं मदत केली आहे. कोणतेही काम करण्याची इच्छा आणि तळमळ असणाऱ्या प्रत्येक माणसाच्या मागे आर्थिक मदतीच्या रूपानं बँक उभी राहिली. त्याचं कुटुंब बँकेनं उभं केलं. बँकेच्या मदतीतून अनेक लघुउद्योगही तयार झाले. उद्योजकाची भरभराट झालीच, पण त्यात सर्वसामान्यांना काम मिळालं. त्यातून कामगारांच्या अनेक कुटुंबांना हातभार लागतो, याचाच मनस्वी आनंद आहे.**

**संभाजी धोंडिबा दौंडकर**
(संचालक)



चिंचवड स्टेशनला पवना बँकेची जुनी शाखा होती. त्याच्यासमोर लहानपणी आम्ही खेळायचो. तेव्हापासून पवना बँक पाहिली होती. याच बँकेवर आपण संचालक म्हणून काम करू, असं कधी वाटलं नव्हतं. सर्वसामान्य नागरिक, कामगार आणि इथल्या मातीतल्या माणसांना आधार देण्यासाठी ज्ञानेश्वरजी लांडगेसाहेबांच्या पुढाकारानं या बँकेची स्थापना झाली. मी महापालिकेच्या माध्यमातून ठेकेदारीची कामं करीत होतो. शांताराम गराडेसाहेबांच्या माध्यमातून माझा पवना बँकेशी प्रत्यक्ष संबंध आला. गराडेसाहेबांसोबत बँकेत येत होतो. त्यातून बँकेशी माझी ओळख वाढली. नितीनशेठ नाणेकर संचालक होते. त्यांच्या माध्यमातूनही बँकेशी प्रत्यक्ष संबंध आला. सर्वसाधारण सभेच्या निमित्तानं बँकेत अनेकदा येत होतो. या काळात गरजवंतांसाठी बँकेच्या माध्यमातून कर्जाची कामंही केली. त्यातून बँकेशी माझा संपर्क वाढीस लागला. त्यानंतर २०१५ पासून मला संचालक मंडळात काम करण्याची संधी मिळाली.

संचालक मंडळात येऊनच काम करावं, असं कधी वाटलं नव्हतं. संचालक नसतानाही माझं काम सुरूच होतं. संचालक मंडळाच्या निवडणुकांमध्ये प्रचारांच्या

# ॥ जे कां रंजले गांजले त्यांसि म्हणे जो आपुले ॥

बैठकीत मी भाग घेत होतो. माझा कधीच सहकार क्षेत्रातील कामाशी प्रत्यक्षात संबंध आला नव्हता. पण, या बैठकांच्या माध्यमातून मला सहकारातील कामाची ओळख होत गेली. २०१५ मध्ये लांडगेसाहेब, गराडेसाहेबांच्या सूचनेनुसार संचालक मंडळाच्या कामात सहभागी झालो. बँकेत संचालक नसतानाही बँकेच्या हिताचं काम करीत होतो. आज संचालक मंडळात आल्यानंतरही तेच काम पुढंही सुरू ठेवलं आहे. बँक ठेवीदारांची आहे. ठेवीदारांनी त्यांचे पैसे गुंतवल्यानंतर बँक चालते. कर्मचारी बँकेच्या कारभारातील मोठा कणा असतो. तो चांगला असेल, तर बँक चांगली चालते. त्यावर लक्ष ठेवण्याचं काम संचालक मंडळ करतं. बँकेला लांडगेसाहेबांचं नेतृत्व आहे. सर्वांना बरोबर घेऊन काम करण्याची साहेबांची शैली आहे. लांडगेसाहेबांसह गराडेसाहेब, व्ही. एस. काळभोरसाहेब यांच्या मार्गदर्शनाखाली एका विचारानं बँकेत काम चालतं. त्यातूनच गेल्या पन्नास वर्षांत कोणताही गैरप्रकार बँकेत घडला नाही.

पाहुण्या-रावळ्यांची बँक म्हणून काही जण पवना बँकेवर शिक्का मारतात. पण, हा आरोप अत्यंत चुकीचा आहे. माझा बँकेशी अनेक वर्षांचा संबंध आहे. सात-आठ वर्षांपासून बँकेच्या संचालक मंडळात काम करतो आहे. मला कधी तसं वाटलं नाही. मी पाहुणा-रावळा आहे काय? तरीही मी बँकेत आहे. इतर मंडळी त्यांच्या कर्तृत्वानं, लांडगेसाहेबांच्या विचारानं बँकेवर आली आहेत. बँक सुस्थितीत चालण्यासाठी योग्य माणसांचीच निवड केली जाते. आरोप करणाऱ्यांनीही बँकेत पदभार सांभाळला आहे. कर्ज वितरणाचाही विचार केल्यास आजवर पाहुण्या-रावळ्यांनाच कर्ज दिली असती, तर बँक इतकी मोठी झाली नसती. ही सर्वसामान्यांची आणि प्रत्येकाची बँक आहे. त्या दृष्टीनेच बँकेची धोरणं आखली जातात.

गरजू लोकांच्या समस्या सोडवण्यासाठी सातत्यानं बँक उभी राहिली. हातगाडीवर भाजी विक्रीचा व्यवसाय करण्यासाठीही बँकेनं मदत केली आहे. कोणतेही काम करण्याची इच्छा आणि तळमळ असणाऱ्या प्रत्येक माणसाच्या मागे आर्थिक मदतीच्या रूपानं बँक उभी राहिली. त्याचं कुटुंब बँकेनं उभं केलं. बँकेच्या मदतीतून अनेक लघुउद्योगही तयार झाले. उद्योजकाची भरभराट झाली, पण त्यात सर्वसामान्यांना काम मिळालं. त्यातून कामगारांच्या अनेक कुटुंबांना हातभार लागतो, याचाच मनस्वी आनंद आहे. बँकेची पुढील वाटचाल उज्ज्वल आहे. दोन हजार कोटींच्या व्यवसायाचं लक्ष्य ठेवून आम्ही सर्व जण काम करतो आहोत. पन्नास वर्षांत बँकेनं प्रगतीचे अनेक टप्पे पार केले आहेत. प्रगतीचा हा आलेख असाच सातत्यानं उंचावत राहणार आहे.

# निष्ठा आणि प्रामाणिक कामाचा आदर्श

**आजवर मी अनेक क्षेत्रांमध्ये कामे केली. त्या दृष्टीनं पवना बँकेतील कारभार पाहिला असता, इथं ज्ञानेश्वरजी लांडगेसाहेबांच्या नेतृत्वाखाली प्रत्येक जण निःस्वार्थ भावनेनं काम करत असल्याचं दिसलं. त्यांच्या पारदर्शक नेतृत्वाचं अनुकरण प्रत्येक जण करतो आहे. कुठलाही संचालक कोणत्याही प्रकारचं बेकायदेशीर काम करेल, असं कधीही मला दिसलं नाही. प्रत्येक कर्मचारीही अत्यंत निष्ठेनं आणि प्रामाणिकपणानं काम करतो. त्यांच्या कामात कुठंही कमतरता किंवा व्यवहारात कधीच कोणती गडबड झाल्याचं दिसलं नाही. वाद किंवा मतभेदही होताना दिसत नाहीत. लांडगेसाहेबांच्या नेतृत्वात उत्तमपणे बँकेचा कारभार सुरू आहे.**

**ॲड. विठ्ठल तात्याबा ठाकुर**
(व्यवस्थापन मंडळ सदस्य)

सेंट्रल बँक ऑफ इंडियामध्ये मी ३५ वर्षे सेवा केली. बँकिंगच्या वेगवेगळ्या विभागांमध्ये काम करून २००७ मध्ये सेवानिवृत्त झालो. १९७१-७२ या कालावधीत थेऊर येथील यशवंत सहकारी साखर कारखान्यावर मी ॲग्रीकल्चर ऑफिसर म्हणून कार्यरत होतो. ज्ञानेश्वरजी लांडगेसाहेब त्या काळात अण्णासाहेब मगर यांच्यासोबत कारखान्यावर येत होते. या दोन मोठ्या व्यक्तींशी माझा तेथे चांगला परिचय झाला. अण्णासाहेब कारखान्याचे चेअरमन होते. याच काळात नव्यानं स्थापन झालेल्या पिंपरी-चिंचवड नगरपालिकेत अण्णासाहेब अध्यक्ष आणि लांडगेसाहेब उपाध्यक्ष होते. त्यामुळे कारखान्यावर दोघं नेहमी येत. ही दोन माणसं माझ्या आयुष्यात आली. त्यांच्या सहवासातून माझ्या जीवनाला एक वेगळं वळण लागलं. अत्यंत निःस्वार्थी, पारदर्शक आणि लोकहिताची कामं करणाऱ्या या मंडळींच्या मी संपर्कात आलो. त्यांच्यासोबत काम करण्याची संधी मिळाली, हे माझे भाग्य समजतो.

सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या सेवेत १९७२ मध्ये रुजू झाल्यानंतरही लांडगेसाहेबांशी माझा संपर्क कायम होता. मी आणि माझे सहकारी झेंडेसाहेब आणि लांडगेसाहेब असा तिघांचा एक ग्रुपच होता. कुठंही कार्यक्रम असला, तर साहेब आम्हाला कार्यक्रमाला घेऊन जात होते. २००७ मध्ये मी सेवानिवृत्त होईपर्यंत आम्हाला ते वेगवेगळ्या ठिकाणी कार्यक्रमांना घेऊन जात होते. त्या काळातही अत्यंत सन्मानाची वागणूक त्यांच्याकडून मिळाली. २००७ ते २०१० या कालावधीत मी विधी कायद्याची पदवी संपादन केली. त्याचप्रमाणे महाराष्ट्र शासनाकडून माझी अभ्यासदौऱ्यांसाठी विविध ठिकाणी निवडही करण्यात आली होती. या सर्व घडामोडी साहेबांना माहीत होत्या. त्यानंतर २०१० मध्ये लांडगेसाहेबांनी मला बोलावून घेतलं. तज्ज्ञ संचालक म्हणून तुम्ही आमच्याकडे या, असा निरोप साहेबांनी दिला. त्यानुसार २०१० पासून मी पवना बँकेवर तज्ज्ञ संचालक म्हणून रुजू झालो. २०१० पासून आता २०२३ पर्यंत साहेबांनी मला बँकेवर तज्ज्ञ संचालक म्हणून काम करण्याची संधी दिली आहे.

आजवर मी अनेक क्षेत्रांमध्ये कामे केली. ऑडिट, कर्ज वितरण आदी विभागांचा मला मोठा अनुभव होता. त्या दृष्टीनं पवना बँकेतील कारभार पाहिला असता, इथं साहेबांच्या नेतृत्वाखाली प्रत्येक जण निःस्वार्थ भावनेनं

# ॥ जे कां रंजले गांजले त्यांसि म्हणे जो आपुले ॥

काम करत असल्याचं दिसलं. साहेबांच्या पारदर्शक नेतृत्वाचं अनुकरण प्रत्येक जण करतो. कुठलाही संचालक कोणत्याही प्रकारचं बेकायदेशीर काम करेल, असं कधीही मला दिसलं नाही. प्रत्येक कर्मचारीही अत्यंत निष्ठेनं आणि प्रामाणिकपणानं त्याचं कर्तव्य करतो. त्यांच्या कामात कुठंही कमतरता दिसून येत नाही. कामात किंवा व्यवहारात कधीच कोणती गडबड झाल्याचं दिसलं नाही. प्रत्येक वेळी चांगलं काम होतं. कधी वाद किंवा मतभेदही होताना दिसत नाहीत. लांडगेसाहेबांच्या नेतृत्वाखाली अत्यंत उत्तमपणे बँकेचा कारभार सुरू आहे. या भागात अनेक सहकारी बँका आहेत. त्यांच्या तुलनेत या बँकेचा कारभार उत्कृष्ट असल्याचं दिसतं.

साहेबांचं नेतृत्व आणि त्यांच्या कामातील पारदर्शकताच बँकेच्या विकासाला पोषक ठरली आहे. यापुढेही त्याच जोरावर बँकेची प्रगती होत राहील, यात किंचितही शंका नाही. ही बँक सर्वांची आहे, आम्ही मालक नाही, असं सभासदांशी बोलताना साहेब नेहमी सांगत असतात. ही त्यांची भावनाच लोकांना खूप भावते. त्यातून बँकेनं विश्वास संपादन केला आहे. त्यामुळे बँकेचं भवितव्य उज्ज्वल आहे. वेगवेगळ्या क्षेत्रांत काम करीत असताना मला भरपूर काही मिळालं. अनेक संधीही मिळाल्या. पण, पवना बँकेनं दिलेल्या संधीतून माझा सन्मान झाला. सेंट्रल बँकेतील ३५ वर्षांच्या सेवेतही जे मला मिळालं नाही, तो आदर मला पवना बँकेनं दिला. त्यामुळे मी पवना बँकेचा आयुष्यभर आभारी राहीन.



# अनेकांचं आयुष्य घडवणारी बँक

**पवना बँकेनं मला जे दिलं ते आयुष्यभर विसरू शकणार नाही. पवना बँकेनं सुरुवातीला दिलेल्या आर्थिक पाठबळातूनच माझे आयुष्य घडलं.  संचालक मंडळात आल्यानंतर मीही त्याच दृष्टीनं काम केलं. बँकेनं अनेकांना शून्यातून उभं केलं. उद्योजक, व्यावसायिक म्हणून नावलौकिक दिला. त्याला माझाही हातभार लागला. सध्या बँकिंग क्षेत्रातील आव्हानात्मक परिस्थितीत बँकेच्या प्रगतीचा वेग कायम ठेवायचा आहे. मला काय वाटतं, यापेक्षाही लोकांना बँकेकडून काय अपेक्षा आहेत, त्याची आपण पूर्तता करू शकतो का, हे पाहणं गरजेचं आहे. त्या दृष्टीनं आम्ही राष्ट्रीयीकृत बँकेच्या तोडीसतोड सुविधा ग्राहकांना देत आहोत.**

**गणेश बबनराव पिंजण**
(व्यवस्थापन मंडळ सदस्य)



पवना सहकारी बँकेनंच माझ्या संपूर्ण आयुष्याला यशाची कलाटणी दिली. बांधकाम व्यावसायिक म्हणून जे काही नाव कमावलं, त्यात पवना बँकेचा खूप मोठा वाटा आहे. २००० साली ज्ञानेश्वरजी लांडगेसाहेबांनी माझ्या व्यावसायिक आयुष्याची सुरुवात करण्यासाठी २५ लाखांचे कर्ज मंजूर केलं. त्यातूनच माझा उत्कर्ष होऊ शकला. बँकेचा आणि माझा संबंध तसा जन्मापासूनच आहे. माझे आजोबा कै.अप्पासाहेब ऊर्फ विष्णूपंत गावडे हे ज्ञानेश्वरजी लांडगेसाहेबांसोबत बँकेचे संस्थापक होते. ते पंधरा वर्षे संचालक होते. त्यानंतर माझे सासरे पांडुरंग गावडे हेही बँकेशी संबंधित होते. त्यामुळे पवना बँक पहिल्यापासूनच परिचयाची होती. बांधकाम क्षेत्रात उतरल्यानंतर लोणावळ्यात पहिला प्रकल्प उभारण्याचं नियोजन केलं. त्यासाठी पवना बँकेकडे कर्जाची मागणी केली. तुमची कागदपत्रं योग्य असतील, तर कोणाची ओळख असो अथवा नसो, तुम्हाला कर्ज मिळतं. त्यासाठी कोणता संचालक कपभर चहाही घेत नाही, हे पवना बँकेचं वैशिष्ट्य आहे. त्याचा अनुभव मला तेव्हा आला.

# ॥ जे का रंजले गांजले त्यांसि म्हणे जो आपुले ॥

लांडगेसाहेबांनी माझ्यावर विश्वास टाकला आणि मला कर्ज मिळालं. त्यामुळे मी लांडगेसाहेबांना पेढे घेऊन गेलो. पण, तुझा पेढा आता नाही, तर प्रकल्प पूर्ण झाल्यावर खाईन, असं त्यांनी सांगितलं. पुणे-लोणावळा लोकलनं लोणावळ्यात रोज ये-जा करून एक वर्षातच प्रकल्प पूर्ण केला. मुदतीच्या आधीच कर्ज फेडलं आणि साहेबांना पेढा दिला. त्यानंतर पुन्हा तीनदा पवना बँकेनं कर्ज दिलं. त्याचीही परतफेड योग्य वेळी केली. २०१० मध्ये बँकेच्या निवडणुका आल्यानंतर लांडगेसाहेबांनी मला बोलवून घेतलं आणि बँकेच्या संचालकपदासाठी अर्ज भरण्यास सांगितलं. ज्येष्ठ मंडळी असतानाही साहेबांनी बँकेवर संचालकपदी काम करण्याची संधी दिली. त्या पदावर तेरा वर्षे होतो. साहेबांच्या नेतृत्वाखाली या काळात उत्तम काम करता आलं. संचालक झालो, त्या वेळी बँकेच्या चार शाखा होत्या. तेरा वर्षांच्या कालावधीत आता ही संख्या बावीस शाखांवर पोहोचली. संचालक मंडळाच्या या कामात माझाही खारीचा वाटा आहे.

बँकेच्या २०२३ मधील निवडणुकीत साहेबांनी पुन्हा संचालक मंडळात येण्याची सूचना केली. मात्र, मला दोनदा संधी मिळाली, तुमच्यामुळेच आज मला नावलौकिक मिळाला. आता नव्यांना संधी द्या, असं मी म्हणालो. त्यामुळे साहेबांनी नवीन लोकांना संधी दिली. नव्या संचालकांच्या बैठकीत मला संचालक मंडळात पुन्हा घेण्याचा विचार झाला. त्यातून साहेबांनी व्यवस्थापकीय संचालक म्हणून जबाबदारी दिली. बँकेनं मला जे दिलं ते आयुष्यात विसरू शकणार नाही. पवना बँकेमुळेच माझं आयुष्य घडलं. संचालक मंडळात आल्यानंतर मीही त्याच दृष्टीनं काम केलं. पवना सहकारी बँकेनं अनेकांना शून्यातून उभं केलं. उद्योजक, व्यावसायिक म्हणून नावलौकिक दिला. त्याला माझाही हातभार लागला.

सध्या बँकिंग क्षेत्रात आव्हानात्मक परिस्थिती आहे. अशा काळात बँकेच्या प्रगतीचा वेग कायम ठेवायचा आहे. मला काय वाटतं, यापेक्षाही लोकांना बँकेकडून काय अपेक्षा आहेत, त्याची आपण पूर्तता करू शकतो का, हे पाहणं गरजेचं आहे. त्या दृष्टीनं आम्ही प्रयत्न करतो आहोत. राष्ट्रीयीकृत बँकेच्या तोडीसतोड सुविधा आम्ही ग्राहकांना देत आहोत. कर्मचारी आणि संचालक ही रथाची दोन चाकं आहेत. ती सुरळीत चालली पाहिजेत. कर्मचाऱ्यांमध्ये बँकेबद्दल आपुलकीची भावना निर्माण होणं महत्त्वाचं आहे. त्या अनुषंगानं कर्मचाऱ्यांसाठीही वेगवेगळ्या योजना राबवण्यात येतात. भविष्यात बँकेतील ठेवींचा आकडा हजार कोटींपुढे पोहोचवण्यासह बँकेला शेड्युल्ड दर्जा देण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. लांडगेसाहेब बँकेशी संबंधित सर्व घटकांच्या उन्नतीचा सातत्यानं विचार करून त्या दृष्टीनं पावले उचलत असतात. त्यांच्या नेतृत्वाखालील पवना सहकारी बँकेने पन्नास वर्षांचा यशस्वी टप्पा पूर्ण केला, याचा मला मनस्वी आनंद आहे.

# कायद्याच्या चौकटीतच काम

**ऑडिटर या नात्याने मी बऱ्याच बँका पाहिल्या. सर्व संचालकांचा निःस्वार्थीपणा, विश्वास पवना बँकेत पाहिला. बँकेचं कर्ज व्यवस्थित आणि योग्य माणसाच्या हातात जातं की नाही, हे प्रत्येक संचालक पाहतो. एखादा गरीब किंवा मोठा उद्योजक असो, माणूस चांगला हवा. त्यानं कागदपत्रांची पूर्तता केली असेल आणि रिझर्व्ह बँकेच्या चौकटीत बसत असेल, तरच कर्ज द्या. ठेवीदार आणि भागधारक हेच बँकेचे मालक आहेत, हे ज्ञानेश्वरजी लांडगेसाहेबांचं वाक्य मला फार आवडतं.**

**राजेंद्र दत्ताजीराव पाटील**
(व्यवस्थापन मंडळ सदस्य)

पिंपरी-चिंचवड नगरपालिका आणि एमआयडीसीची नव्यानं स्थापना झाली. त्या वेळी शेतकरी, कामगार वर्ग इथं मोठ्या प्रमाणात होता. त्यांना आर्थिक मदतीची गरज होती. अण्णासाहेब मगर, ज्ञानेश्वरजी लांडगेसाहेब आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी याच लोकांना डोळ्यासमोर ठेवून पवना बँकेची स्थापना केली. निःस्वार्थी, मितभाषी, शांत, प्रत्येक गोष्टीचा सारासार विचार करून निर्णय देणारी व्यक्ती म्हणून मगरसाहेबांनी लांडगेसाहेबांकडे बँकेची धुरा सोपवली. लांडगेसाहेबांशी माझा परिचय अनेक वर्षांपासून होता. मी सीए झाल्याचं साहेबांना कळल्यानंतर, पवना बँकेवर ऑडिटर म्हणून त्यांनी माझी नेमणूक केली. बँकेच्या चुका दाखवा, काही त्रुटी असतील तर त्या पूर्ण करून घ्या. कर्मचाऱ्यांकडून होणारी कर्ज प्रकरणं व्यवस्थित आहेत का ते पाहा, असं त्यांनी स्पष्ट सांगितलं होतं. दहा वर्षे मी पवना बँकेत ऑडिटर म्हणून काम पाहिलं. त्यानंतरच्या काळात मी मुंबईत होतो. गेल्याच वर्षी साहेबांशी पुन्हा संपर्क झाला. तुमच्यासारखी चांगली माणसं हवी आहेत, असे सांगून लांडगेसाहेब, व्ही. एस. काळभोरसाहेब, एस. डी. गराडेसाहेबांनी माझी पवना बँकेच्या व्यवस्थापकीय संचालकपदी नेमणूक केली.

पवना बँकेत व्यवस्थापकीय संचालक म्हणून काम सुरू केल्यानंतर मला दृष्टीस आलं, की बँकेच्या पन्नास वर्षांच्या प्रवासात लांडगेसाहेबांमुळे एक विश्वास तयार झाला आहे. कुठलंही कर्ज देताना, हा माझा जवळचा किंवा लांबचा माणूस, हे कधीच पाहिलं जात नाही. कागदपत्रं पूर्ण आहेत का, तरच कर्ज मंजूर करा, हे त्यांचं ब्रीदवाक्य. लांडगेसाहेबांकडे बघूनच आज बँकेकडे सातशे कोटी रुपयांच्या ठेवी जमल्या. ऑडिटर या नात्याने मी बऱ्याच बँका पाहिल्या. सर्व संचालकांचा निःस्वार्थीपणा, विश्वास पवना बँकेत पाहिला. बँकेचं कर्ज व्यवस्थित आणि योग्य माणसाच्या हातात जातं की नाही, हे प्रत्येक संचालक पाहतो. एखादा गरीब किंवा मोठा उद्योजक असो, माणूस चांगला हवा. त्यानं कागदपत्रांची पूर्तता केली असेल आणि कर्ज रिझर्व्ह बँकेच्या चौकटीत बसत असेल, तरच कर्ज द्या. ठेवीदार आणि भागधारक हेच बँकेचे मालक आहेत, हे लांडगेसाहेबांचं वाक्य मला फार आवडतं.

# ॥ जे कां रंजले गांजले त्यांसि म्हणे जो आपुले ॥

लांडगेसाहेब, काळभोरसाहेब आणि गराडेसाहेब ही त्रिमूर्ती बँकेत आहे. ब्रह्मा, विष्णू, महेश असंच मी त्यांना म्हणेन. काळभोरसाहेब, गराडेसाहेब ही उच्चशिक्षित, प्रामाणिक, निःस्वार्थ आणि भविष्याचा वेध घेणारी माणसं लांडगेसाहेबांच्या बरोबर असल्यानं पन्नास वर्षांत बँकेची मोठी प्रगती झाली, असं मला वाटतं. लांडगेसाहेबांसारखा निःस्वार्थी माणूस बघितल्यावर प्रत्येकालाच कामाचा उत्साह येतो. मी त्यांना दादासाहेब म्हणतो. मी केवळ साहेबांमुळेच बँकेच्या कामात सहभागी झालो. मला काय मिळेल, हा उद्देश ठेवून लोक संचालक मंडळात येतात. पण, या ठिकाणी साहेबांनी घालून दिलेली निःस्वार्थ वृत्ती कुठं पाहिली नाही. साहेब आहेत म्हटल्यावरच आधार येतो. साहेबांनी बँकेसाठी भक्कम पाया तयार करून ठेवला आहे. त्यामुळे अजून शंभर वर्षेही बँकेला काही होणार नाही, असा माझा ठाम विश्वास आहे. निःस्वार्थी वृत्तीच्या व्यक्तींसोबत मला काम करण्याची संधी मिळाली, हे माझं भाग्य समजतो. बँकेच्या सुवर्णमहोत्सवी वर्षांत संचालक मंडळ, सभासद आणि खातेदारांना मनःपूर्वक शुभेच्छा.





# ॥ जो जे वांछील तो ते लाहो ॥

**आतां विश्वात्मके देवे, येणे वाग्यज्ञे तोषावे।**
**तोषोनि मज द्यावे, पसायदान हे ||**
**दुरितांचे तिमिर जावो, विश्व स्वधर्म सूर्ये पाहो।**
**जो जे वांछील तो ते लाहो, प्राणिजात ||**

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माउलींनी ‘ज्ञानेश्वरी’च्या शेवटी परमेश्वराकडे स्वतःसाठी काही न मागता विश्व कल्याणाची आर्त मागणी केली. वाइटांतील अंधार दूर होऊन संपूर्ण विश्वानं स्वधर्मरूपी सूर्यप्रकाशात स्वतःला पाहावे, असं पसायदानाच्या तिसऱ्या ओवीत माउलींनी म्हटलं आहे. त्याचबरोबरीनं सर्वांच्या इच्छा पूर्ण होवोत, ते जे मागतील ते त्यांना मिळो, अशी प्रार्थना केली आहे. या ओवीप्रमाणेच समाजातल्या प्रत्येक घटकांतील सर्वांच्या इच्छा आर्थिक पाठबळाच्या माध्यमातून पूर्ण करण्याचा यज्ञ पवना बँकेनं पन्नास वर्षांपासून अखंड सुरू ठेवला आहे. प्रत्येकाची गरज लक्षात घेऊन त्या दृष्टीनं कर्जपुरवठ्याच्या विविध योजना राबवल्या. उद्योजक, व्यापारी, महिला, अपंग, विद्यार्थी, शेतकरी, कामगार आदींसह रस्त्यावर भाजीविक्रीसारखे छोटे व्यवसाय करणाऱ्या मंडळींनाही आधार दिला. प्रत्येकाच्या जीवनातील अडचणींचा अंधार दूर करून प्रगतीचा प्रकाश दिला !

# ॥ जो जे वांछील तो ते लाहो ॥

स्थानिक माणसाला आर्थिक पाठबळ देऊन त्याला उभं करायचं, हेच अण्णासाहेब मगर आणि ज्ञानेश्वरजी लांडगेसाहेबांचं पवना बँक स्थापनेमागचं ध्येय. त्यातूनच आज अनेकांनी बँकेतून मिळालेल्या कर्जाच्या आर्थिक पाठबळावर मोठे व्यावसायिक, औद्योगिक साम्राज्य उभं केलं आहे. परिसरातील नागरिकांचा विकास साधण्याबरोबरच बँकेचा व्यवसाय वाढण्यासाठी आम्ही विविध संकल्पना, योजना बँकेत राबवल्या. त्यात सामाजिक बांधिलकीचं भानही ठेवलं. पथारीचालकापासून उद्योजकांपर्यंतच्या प्रत्येक घटकांना बँकेशी जोडून घेत त्यांना मदतीचा हात दिला.

**मनेश बबन बोऱ्हाडे**
(मुख्य कार्यकारी अधिकारी)



पवना बँकेत ऑक्टोबर १९९९ मध्ये लिपिक पदावर रुजू झालो. त्यापूर्वीही बँकेत येणे-जाणं होतं. शिक्षण बी.कॉम, बीएड केलं होतं. ज्ञानेश्वरजी लांडगेसाहेबांच्या मार्गदर्शनाखाली बँकिंग क्षेत्राची सुरुवात केली. जिथं पाय ठेवशील तिथं परिपूर्ण काम करायचं आणि ज्ञान मिळवायचं, ही लांडगेसाहेबांची शिकवण. म्हणून जिज्ञासू वृत्ती पहिल्यापासूनच ठेवली. बँकेत आल्यानंतर मी सहकार क्षेत्रातील विशेष अभ्यासक्रम पूर्ण केला. रुजू झालो तेव्हा संगणकीकरण नव्हते. पण, त्यानंतर एकेक शाखेत ते सुरू झालं. त्या वेळी कर्मचाऱ्यांचं मोठं सहकार्य मिळालं. संध्याकाळी बँकेच्या कामाची सुट्टी झाली, की रात्री आणि अगदी पहाटेपर्यंत संगणकात माहिती भरण्याचं काम कर्मचारी करीत. ही सुरुवातच आज बँकेचं काम संगणकाच्या एका क्लिकवर पोहोचविण्यास मोलाची ठरली.

पवना बँकेला १२ जुलै १९७३ ला सहकार खात्याची आणि २ ऑगस्ट १९७४ ला रिझर्व्ह बँकेची परवानगी मिळाली. पहिल्या वर्षी ९७१ सभासद. पाच ते साडेपाच लाखांच्या ठेवी आणि २.८० लाखांपर्यंत कर्ज होतं. चिंचवड स्टेशनला भाड्याच्या जागेत पहिली शाखा सुरू झाली. बँकेचं काम संपलं, की त्याच जागेवर संचालक मंडळ बैठक घेत. त्याचा भत्ता त्यांनी कधी घेतला नाही. शाखेत सरस्वती होती, तिथं नारळ फोडायचा आणि तोच प्रसाद अल्पोपहार म्हणून घ्यायचा. साधा चहाही ते घेत नव्हते. पिंपरी-चिंचवडमधील स्थानिक माणसाला आर्थिक पाठबळ देऊन त्याला उभं करायचं, हेच अण्णासाहेब मगर आणि लांडगेसाहेबांचं ध्येय. त्यातूनच आज अनेकांनी बँकेतून मिळालेल्या कर्जातून मोठे व्यावसायिक, औद्योगिक साम्राज्य उभं केलं आहे.

बँकेनी स्वतःची पहिली इमारत चिंचवडच्या केएसबी चौकात तीन गुंठे जागेत उभारली. मुख्य शाखा आणि मुख्यालय, असं दोन्ही कामकाज तिथं सुरू झालं. कालांतरानं पाच शाखांचा विस्तार झाला. आज बँकेच्या २२ शाखा झाल्या. विस्तारामुळे मोठ्या प्रशासकीय इमारतीची गरज भासू लागली. लांडगेसाहेब, व्ही. एस. काळभोरसाहेब, शांताराम गराडेसाहेब या दिग्गजांनी प्रशासकीय इमारतीची संकल्पना मांडली. सध्या उभ्या असलेल्या इमारतीची जागा सर्वांना पसंत पडली. मात्र, ही जागा औद्योगिक क्षेत्रातील होती. ती व्यावसायिक करण्यासाठी एमआयडीसीकडे प्रस्ताव पाठवला. पण, त्यावर कासवगतीनं काम होत होतं. एमआयडीसीच्या स्थानिक अधिकाऱ्यांकडे मी तीन महिने हेलपाटे मारूनही प्रकरण काही मंजूर होत नव्हतं. स्थानिक अधिकारी दादच देत नव्हते. ही सर्व स्थिती गराडेसाहेब आणि लांडगेसाहेबांना कळल्यानंतर त्यांनी पुढची सूत्रं हाती घेतली. मुंबईत एमआयडीसीचे उच्चाधिकारी त्या वेळी श्री. पोमणसाहेब होते. ते पूर्वी पिंपरी-चिंचवड महापालिकेत होते. गराडेसाहेब आणि लांडगेसाहेबांनी त्यांना केवळ एक फोन केला आणि सर्व परिस्थिती सांगितली. त्यानंतर लगेचच आमचा प्रस्ताव त्यांनी मुंबईत मागवून घेतला, त्याला मंजुरीही दिली. ही प्रशासकीय इमारत सुसज्ज आणि आदर्शवत करण्याचा संकल्प पूर्वीपासून होता. त्यातील सर्व सुविधांचा बारकाईनं अभ्यास केला. ज्येष्ठ संचालकांनी मला केवळ सूचनाच दिल्या नाहीत, तर इमारतीसाठी घेतल्या जाणाऱ्या प्रत्येक गोष्टींची त्यांनी प्रत्यक्ष बाजारात येऊन पाहणी केली. पूर्वीच्या प्रशासकीय इमारतीत विजेचं बिल २० ते २५ हजारांपर्यंत यायचं. नव्या इमारतीचं पहिलं वीजबिल पाहून आम्हाला धक्काच बसला. तब्बल दोन लाख वीस हजारांचं ते बिल होतं. त्यामुळे सोलर यंत्रणेची कल्पना पुढे आली. त्याचा अभ्यास करून १७ लाखांचा खर्च केला. छतावर सोलर यंत्रणा बसवली. आज इमारतीत वापरण्यात येणाऱ्या विजेपैकी ७५ टक्के वीज सोलरची आहे. त्यामुळे केवळ २५ टक्केच वीजबिल भरावं लागतं. या इमारतीच्या बांधकामाचे वैशिष्ट्य म्हणजे, ७० टक्के भागांत दिवसभर विजेच्या दिव्यांची गरज भासत नाही. नैसर्गिक प्रकाश आणि पर्यावरणपूरक बांधकामास प्राधान्य दिलं आहे.

बँकेच्या प्रगतीचा आलेख गेल्या ५० वर्षांत कधीही झुकलेला नाही. पहिल्या पंचवीस वर्षांत आठ कोटी ४५ लाख रुपयांच्या ठेवी आणि सात कोटी ३३ लाखांची कर्ज होती. त्या वेळी सभासदांची संख्या ३५२१ होती. ३५ व्या वर्षांत ठेवींचा आकडा आठ कोटींवरून १२५ कोटींपर्यंत गेला. कर्ज ५३ कोटींवर गेले. सभासदांची संख्या वाढून ५९०० झाली. आता पन्नासाव्या वर्षांत बँकेकडे ७०० कोटींच्या ठेवी आहेत. ४३९ कोटींचे कर्ज, तर ११,९५० सभासद आहेत. परिसरातील नागरिकांचा विकास साधण्याबरोबरच बँकेचा व्यवसाय वाढण्यासाठी आम्ही विविध संकल्पना बँकेत आणल्या. त्यात सामाजिक बांधिलकीचं भानही ठेवलं. पेट्रोल, डिझेल आदी गोष्टींच्या

महागाईमध्ये विजेवर चालणाऱ्या वाहनांच्या खरेदीसाठी प्रोत्साहन दिलं. विजेवरील वाहनांच्या खरेदीसाठी कमी व्याजदरातील कर्जाला चांगला प्रतिसाद मिळाला.

## महिला, पथारीधारक, शेतकऱ्यांना साहाय्य

पथारी, भाजीपाला, पानपट्टीवाल्यांसारख्या छोट्या व्यावसायिकांना ५० हजार ते एक लाखांपर्यंतची कर्ज हवी होती. पण, करोनाच्या काळात त्यांच्याकडे कोणी पाहत नव्हतं. बँकेनं या मंडळींना डोळ्यासमोर ठेवून ५० हजारांचे 'उन्नती कर्ज' सुरू केलं. रस्त्यावर व्यवसाय करणाऱ्या प्रत्येकासाठी योजना लागू केली. त्याला भरघोस प्रतिसाद मिळाला. विशेष म्हणजे एकही रुपया थकबाकी राहिली नाही. त्यानंतर ५० हजारांच्या कर्जाची मर्यादा एक लाखांपर्यंत करण्याची मागणी आली. म्हणून आपण 'प्रगती कर्ज' या योजनेत कर्जाची मर्यादा एक लाखांपर्यंत नेली. त्यालाही अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. त्यात आतापर्यंत एकही कर्ज थकलं नाही. वाघोली, शिक्रापूर, कामशेत आदी ग्रामीण भागांत बँकेच्या शाखा आहेत. शेतीसाठी कर्जपुरवठा करण्याची मागणी या भागातून आली. त्यातून 'शेती कर्ज' सुरू केलं. त्यांच्या सोयीनुसार मासिक, तिमाही, सहामाही आणि वार्षिक असा हप्ता ठेवला. ट्रॅक्टर खरेदी, विहीर खोदकाम, पाइपलाइन, जमीन लेव्हलिंग, पॉलिहाउस, ग्रीनहाउस, कुक्कुटपालन आदींसाठी शेतकऱ्यांना कर्ज दिलं. ग्रामीण भागातून त्याला उत्तम प्रतिसाद मिळाला. ग्रामीण भागांत प्रत्येक करपावतीवर महिलांचे नाव सक्तीचं केलं आहे. त्या दृष्टीनं महिला सक्षमीकरणाचं पाऊल म्हणून बँकेनं 'गृहलक्ष्मी योजना' आखली. महिलांच्या नावावर घर असेल, तर व्याजदरात सवलत दिली. त्यालाही सर्व ठिकाणी चांगला प्रतिसाद आहे.

## वैद्यकीय क्षेत्र, अपंगांसाठी योजना

पिंपरी-चिंचवडमधील उद्योगनगरीला बँकेनं पहिल्यापासूनच साथ दिली. लघुउद्योग क्षेत्राला प्राधान्य दिलं. करोनाच्या कालावधीनंतर या क्षेत्रातील कर्जावर व्याजदर कमी करण्याचा प्रयत्न केला. जवळपास २५ टक्के कर्ज या क्षेत्रात वितरित केलं. करोना आणि त्यानंतरच्या कालावधीत वैद्यकीय क्षेत्राचं काम आघाडीवर होतं. वैद्यकीय क्षेत्राचा विस्तार आणि फार्मा विभागात औषधांचा साठा वाढवण्यासाठी कर्जाची गरज होती. नागरिकांच्या आरोग्यविषयक गरजेच्या काळात ही क्षेत्रं विस्तारण्यास अडचणी येऊ नयेत, म्हणून बँकेनं करोनाच्या कालावधीनंतर डॉक्टर आणि औषध क्षेत्रात मोठा वित्तपुरवठा केला. अपंगांसाठी काहीतरी करण्याचा विचार झाला. त्यातून 'स्वावलंबी योजना' तयार झाली. त्यात कमी व्याजदरामध्ये अपंगांना वित्तपुरवठा केला जातो. या पैशातून त्यांनी स्वतःचा व्यवसाय उभारून स्वावलंबी व्हावे, हा बँकेचा उद्देश आहे.

## शैक्षणिक कर्जात सामाजिक बांधिलकी

शिक्षण आज खूप महाग झाले आहे. केजीपासून पीजीपर्यंत मुलांना शिकवण्यासाठी पालकांना मोठा खर्च येतो. दहावी-बारावीत मुलगा-मुलगी पास झाले, की त्यांच्या पुढच्या अभ्यासक्रमाचा प्रवेश आणि त्यासाठी लागणारा खर्च याचीच सर्वाधिक चिंता पालकांना असते. अशा स्थितीत शैक्षणिक कर्जही बँकेनं उपलब्ध केलं. त्याचा व्याजदर ठरवताना सामाजिक बांधिलकीचा विचार केला. स्वदेशात किंवा परदेशात उच्च शिक्षण घ्यायचं असेल, तर आपण व्याजदर कमीत कमी ठेवण्याचा प्रयत्न करतो. अनेक पालकांनी त्याचा लाभ घेतला आणि आपली मुलं परदेशात शिक्षणासाठी पाठवली. मुलांच्या शिक्षणाची पातळी उच्च, पण पालकांची आर्थिक स्थिती कमी, अशा अवस्थेत असलेल्या अनेकांना या योजनेचा लाभ होत आहे. शहरात खासगी वाहनांचा वापर मोठा आहे. स्वतःचं चारचाकी वाहन दारापुढं असावं, हे प्रत्येकाचं स्वप्न असतं. ते साकार करण्यासाठीही बँक मदत करते. त्यातून वाहन खरेदीवरील व्याजदरातही काही प्रमाणात सवलत दिली आहे.

## अत्याधुनिक सुविधांमध्ये बँकेची आघाडी

बँकेचं आता डिजिटायझेशन झालं आहे. एका क्लिकवर कामं होतात. सुविधांमध्ये आपण अत्याधुनिकीकरणाला प्राधान्य दिलं. शाखांत एटीएमची सुविधा आहे. मोबाइल बँकिंगही सुरू केली. आपल्या खिशातल्या मोबाइलवरूनच बँकेच्या अनेक सुविधा ग्राहकांना घेता येतात. इंटरनेट बँकिंग वगळता सर्व सुविधा आपण मोबाइलमध्ये उपलब्ध करून दिल्या आहेत. आता पानाच्या टपरीपासून सर्वच छोटे-मोठे व्यावसायिक

क्यूआर कोडद्वारे रक्कम स्वीकारतात. त्यामुळे बँकेकडं छोट्या-छोट्या ग्राहकांनी क्यूआर कोडची मागणी केल्यानं ते आपण सुरू करून यशस्वीरीत्या चालवलं आहे. पेटीएम, फोन पे, गुगल पे आदी सुविधाही दिल्या. दुसऱ्या बँकेत असलेली सुविधा आपल्याकडे नाही, असं होऊ नये याची काळजी घेत, नवनव्या सर्व अत्याधुनिक सुविधा आपण सुरू केल्या. बँकेची एसएमएस प्रणालीही आहे. एका क्लिकवर सर्व खातेदारांना संदेश जातो. २२ शाखांमध्ये आपलं खातं कुठंही असेल, तरी कोणत्याही शाखेतून व्यवहार केला जाऊ शकतो. त्या दृष्टीनं कोअर बँकिंग सिस्टीम सुरू केली. वेगवेगळ्या बिलांचा भरणाही बँकेमार्फत करता येतो. राष्ट्रीयीकृत बँका देत असलेल्या सर्व सुविधा आज पवना बँक आपल्या ग्राहकांना देते. आता शेड्युल्ड बँकेच्या दिशेनं वाटचाल सुरू आहे.

### सायबर सुरक्षेसाठी भक्कम यंत्रणा

लोकांना सध्या आपल्याकडे येण्यास वेळ नाही. त्यामुळे आपल्यालाच त्यांच्याकडे जावं लागणार. त्यासाठी मार्केटिंग आवश्यक. आमचा प्रत्येक शाखाधिकारी रोज दहा नव्या लोकांना भेटतो आणि घरोघरी जाऊन काम करतो. प्रत्यक्ष ग्राहकांच्या अपेक्षा समजावून घेण्यासाठी वेळोवेळी आम्ही ग्राहक मेळाव्यांचेही आयोजन करतो. आणखी प्रगती साधायची, यशाचा आलेख उंचावत ठेवायचा आहे. त्यामुळे आम्ही नेहमी मोठ्या बँकांशी तुलना करतो. त्या बँकेनं केलं ते आपण का करू शकत नाही ? याचा विचार सतत असतो. लोकांचा पैसा सुरक्षित ठेवण्यासाठी सायबर सुरक्षाही सध्याच्या काळात अत्यंत महत्त्वाची झाली आहे. त्याबाबत बँकेनं कधीच कुठलीही तडजोड केली नाही. अनेक बँकांत सायबर हल्ले होऊन पैसे गेलेत. पण, पवना बँकेत आपण त्याबाबत विशेष काळजी घेऊन भक्कम यंत्रणा उभारली. त्याच्या खर्चात आपण कधीच तडजोड केली नाही. बँकेनं आता स्वतःचं डाटा रिकव्हरी सेंटर उभारण्याचं नियोजन केलं आहे.

### प्रशिक्षित कर्मचारी आणि संचालक

बँकेत मी रुजू झाल्यापासून आतापर्यंत वर्धापनदिनाचे २५ कार्यक्रम पाहिले. प्रत्येक वर्धापनदिनाला कर्जदार, सभासद मनोगत व्यक्त करतात. बँकेमुळे आपली कशी प्रगती साधली गेली, हे ते मनापासून मांडतात. बँकेनं आजवर आर्थिक पाठबळातून अनेक उद्योजक तयार केले, बांधकाम व्यावसायिक उभे केले. बँकेतील माणुसकी आणि प्रेमाच्या वागणुकीची भावना खातेदार बोलून दाखवतात. बँकेच्या प्रगतीसाठी संचालक आणि सेवकांमध्ये समन्वय महत्त्वाचा असतो. संचालकांनी विविध धोरणं तयार केली आहेत. कर्ज कशी वाटावीत, सेवकांनी कसे वागावं. शिपायापासून मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांपर्यंत सर्वांना शिस्त हवी, हे धोरण संचालकांनी तयार केलं आहे. त्यानुसारच सर्व कामकाज होतं. सेवक वर्गाला वेळोवेळी आधुनिक गोष्टींचं आणि सहकार खात्यातील बदलांचं प्रशिक्षण दिलं जातं. संचालकांना विविध गोष्टींबाबत पाच वर्षांतून एकदा अद्ययावत करण्याचा नियम आहे. मात्र, आपल्याकडे ते प्रत्येक वर्षाला होतं. प्रत्येक संचालक प्रशिक्षण घेतात.

### दोन हजार कोटींच्या व्यवसायाचं उद्दिष्ट

प्रत्येक दिवसाला बँकेला प्रगतीचा नवा टप्पा गाठायचा आहे. त्याचं उद्दिष्टही वेळोवेळी ठेवण्यात येतं. मागच्या वेळी १००० कोटींच्या व्यवसायाचं उद्दिष्ट होतं. ते पूर्ण होऊन १०५० कोटी रुपयांचा व्यवसाय झाला. पुढील पाच वर्षांत दोन हजार कोटींच्या व्यवसायाचं उद्दिष्ट ठेवलं आहे. कर्ज विभाग, वसुली विभाग, अकाउंट विभाग आदी विभाग करून कामाचं नियोजन केलं आहे. संचालक मंडळानंही कर्ज समिती, सेवक समिती, वसुली समिती, गुंतवणूक समिती, अशा समित्या केल्या आहेत. दैनंदिन कामकाजावर या समितांच्या माध्यमातून त्यांची सातत्यानं देखरेख असते. संचालक आणि सेवकांमधील मी दुवा आहे, त्या दोघांतला समन्वयक आहे. दोन्ही घटकांमध्ये संवाद आहे. सेवक आणि संचालक ही दोन्ही चाकं मुळातच चांगली चालत असल्यानं माझं काम सोपं होतं. या पदावर बसल्यानंतर समाजातील विविध क्षेत्रांचा अनुभव मिळाला आणि माझा अभ्यास वाढला. गेल्या २५ वर्षांच्या कारकीर्दीत मला बँकेनं खूप काही दिलं. त्याचं ऋण शब्दांत कधीच फेडता येणार नाही !

# तंत्रस्नेही पिढीसाठी बँकेची सज्जता

**बँकिंग क्षेत्रातील प्रत्येक तंत्रज्ञान पवना बँकेतील ग्राहकांनाही उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न संचालक, अधिकारी आदी सर्वांनीच सातत्यानं केला. त्यातून ग्राहकांना वेगवान सेवा उपलब्ध होऊ शकल्या. एटीएम केंद्रापासून स्वतंत्र आयएफएससी कोडपर्यंतच्या सुविधा ग्राहकांसाठी देण्यात बँकेनं पुढाकार घेतला. नवी पिढी तंत्रस्नेही आहे. तंत्रज्ञानानुसार बदल केले नाहीत, तर ही पिढी आपल्या बँकेशी जोडली जाणार नाही, ही बाब आता सर्वांनीच स्वीकारली. प्रवाहासोबत चालताना भविष्यात तंत्रज्ञानाच्या अनेक गोष्टी बँकेच्या कामकाजात आणाव्या लागणार आहेत. त्या दृष्टीनं आम्ही प्रयत्नशील आहोत.**

**नितीन कोकणे**
(उपमुख्य कार्यकारी अधिकारी)

पवना सहकारी बँकेच्या सेवेत फेब्रुवारी २००६ मध्ये रुजू झालो. त्या वेळी बँकेकडे ४६ कोटींच्या ठेवी होत्या. मी रुजू झाल्यापासून आजवरच्या कालावधीत बँकेची सेवा, बाजाराची स्थिती आदीमध्ये मोठ्या प्रमाणावर बदल झाला. बँकिंग क्षेत्रातील अत्याधुनिक तंत्रज्ञानाबाबत सुरुवातीच्या काळात पवना बँकेपुढे मोठ्या अडचणी होत्या. त्या दूर करून राष्ट्रीयीकृत किंवा खासगी बँकांमधील असलेल्या अत्याधुनिक सुविधा देण्याचा सातत्यानं प्रयत्न केला. तांत्रिकदृष्ट्या बँक सक्षम करून आपल्या ग्राहकांनाही दर्जेदार सुविधा मिळाव्यात, हा सर्वांचाच उद्देश होता. त्यातून २००९ मध्ये कोअर बँकिंग यंत्रणा सुरू केली. त्यातून बँकेच्या कोणत्याही शाखेतून व्यवहार करणे ग्राहकांना सुलभ झालं.

बँकिंग क्षेत्रात विकसित होणारं प्रत्येक तंत्रज्ञान पवना बँकेतील ग्राहकांनाही उपलब्ध करून देण्याचा विचार संचालक, अधिकारी आदी सर्वांनीच केला. त्यातून ग्राहकांना वेगवान सेवा उपलब्ध होऊ शकल्या. आता एटीएम केंद्रापासून स्वतंत्र आयएफएससी कोड आदीपर्यंतच्या सुविधा ग्राहकांसाठी देण्यात बँकेनं पुढाकार घेतला. रिझर्व्ह बँकेच्या सर्व अटींची पूर्तता करून बँकेसाठी स्वतंत्र आयएफएससी कोडसारख्या सुविधा मिळवण्यासाठी अनेक अडचणी आल्या. मात्र, बँकेने त्या सर्वांवर मात करून २०२१ मध्ये ही सुविधा मिळवली. त्यातील तांत्रिक गोष्टींची पूर्तता करण्यासाठी प्रत्येकानं मेहनत घेतली. त्यात आम्हाला यश मिळाल्याचं समाधान असून, बँकेसाठी ती अभिमानास्पद बाब ठरली. बँकेची सेवा वेगवान होण्यासह ग्राहकांना त्यातून आम्ही उत्तम सेवेची अनुभूती देऊ शकलो. त्यामुळे आता ग्राहकांची संख्या आणि व्यवसायाच्या वाढीलाही पोषक वातावरण तयार झालं.

सध्या बाजारातील ९९ टक्के व्यवहार रोकडविरहित झाले आहेत. पाकिटात आता कोणी पैसे ठेवत नाही. क्यूआर कोडच्या माध्यमातून लोकं व्यवहार करतात. सुरक्षेच्या दृष्टीनंही त्याकडे लोकांचा ओढा आहे. ही बाब लक्षात घेऊन पवना बँकेनं त्यातही आघाडी घेतली. अशा नव्या तंत्रज्ञानामुळे आता आपल्या बँकेतही रोकडविरहित व्यवहारांचं प्रमाण वाढलं आहे. ग्राहकाची ती गरज आहे. संचालक मंडळातही नव्या तंत्रज्ञानाबाबत जागृती आली

# ॥ जो जे वांछील तो ते लाहो ॥

आहे. नवे तंत्रज्ञान नसेल, तर ग्राहक आपल्याकडे येणार नाही. टिकून राहण्यासाठी प्रवाहासोबत वाटचाल करणं गरजेचं आहे, याची संचालक मंडळालाही जाणीव आहे. त्यामुळे बँकेत नवं तंत्रज्ञान आणण्याबाबत संचालक मंडळाचाही नेहमी पाठिंबा असतो. नवी पिढी तंत्रस्नेही आहे. बँकिंगच्या क्षेत्रातही ही मंडळी तंत्रज्ञानाला महत्त्व देते. आपण तंत्रज्ञानानुसार बदल केले नाहीत, तर नवी पिढी आपल्या बँकेशी जोडली जाणार नाही, ही बाब आता सर्वांनीच स्वीकारली आहे. त्यामुळे नवीन तंत्रज्ञान बँकेत आणण्यासाठी संचालक मंडळाकडून सर्व प्रकारची मदत होत गेली. त्याच्या आधारे नवनव्या अत्याधुनिक सुविधा बँकेत प्रत्यक्षात राबवता आल्या.

कोविडच्या कालावधीनंतर बहुतांश लोक आता घरातूनच कामं करतात. बँकिंगही त्यांच्या घरी पोहोचले आहे. भविष्यात आपल्यालाही त्याच दिशेनं जावं लागणार आहे. बँकेशी संबंधित कोणतंही काम ग्राहकाला बँकेत न येताही करता यायला हवं. हवी ती सुविधा त्याला घरबसल्या मिळायला हवी. अगदी बँकेतील खातेही त्याला घरबसल्या उघडता येणे शक्य आहे. त्या दृष्टीनेही भविष्यात पवना बँकेतही अशाच पद्धतीचं काम करावं लागणार आहे. त्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. बँकेच्या कारभारात प्रत्येकाचं काम महत्त्वाचं असतं. विशेषतः सहकारात काम करताना सर्वांना बरोबरीनं घेऊन काम करावे लागतं. त्यानुसार पवना बँकेत संचालक मंडळ, कर्मचारी हे सांघिक पद्धतीनं आणि एकोप्यानं काम करतात. त्यातूनच पवना बँक विकासाच्या मार्गावर अग्रेसर आहे.



|| जो जे वांछील तो ते लाहो ||

# एसटीडी बूथ ते सत्तर कोटींची उलाढाल

व्यवसायच करायचा, असं पहिल्यापासून मनात होतं. मेकॅनिकल इंजिनिअर झाल्यानंतर नोकरी मिळत असतानाही ती केली नाही. टायपिंग इन्स्टिट्यूट आणि एसटीडी बूथच्या माध्यमातून व्यवसायाला सुरुवात केली. तीस वर्षांपूर्वी त्यासाठी पवना बँकेच्या भोसरी शाखेतून कर्ज मिळालं. व्यवसाय चांगला चालला. एसटीडी बूथ कालबाह्य झाल्यानं, नंतर हा व्यवसाय बंद करून मी बांधकाम क्षेत्रात उतरलो. व्ही. व्ही. फुगे प्रमोटर ॲण्ड बिल्डर प्रा.लि. या नावानं पहिला प्रकल्प १९९८ ला सुरू केला. पवना बँकेचे आधारस्तंभ ज्ञानेश्वरजी लांडगेसाहेब, व्ही. एस. काळभोरसाहेब यांच्या मार्गदर्शनाखाली प्रकल्प सुरू झाला. त्यासाठी पवना बँकेनंच अर्थसाहाय्य दिलं. त्याच्या जोरावर मी व्यवसायात भरीव काम करू शकलो. आजवर जवळपास पंचवीस बांधकाम प्रकल्प पूर्ण केले आहेत. त्यानंतरही अनेकदा पवना बँकेकडून अर्थसाहाय्य घेऊन वेगवेगळ्या व्यवसायात उतरलो.

कर्नाटक, गोवा, दिवेआगर, भोसरी, रांजणगाव येथे हॉटेल व्यावसाय सुरू केला. हे धाडस केवळ पवना बँक भक्कमपणे पाठीशी उभी राहिल्यानंच करू शकलो. त्यानंतर पेट्रोल पंप सुरू केला. त्यासाठीही पवना बँकेने ७५ लाखांचे कॅश क्रेडिट दिलं. २०१७ ला क्वालिटी इंटरप्राइजेस नावानं व्यवसाय सुरू केला. त्यात जपानच्या कंपनीचा संपूर्ण भारतातील वितरक मी होतो. अमेझॉन आणि फ्लिपकार्टला आम्ही पुरवठा करीत होतो. त्यासाठी पवना बँकेनं तब्बल आठ कोटींचं अर्थसाहाय्य केलं. त्यावर मी वर्षाला ४० कोटींची उलाढाल करू शकलो. त्यातून हायग्रेड क्वालिटी इंटरप्रायजेस या कंपनीची स्थापना झाली. आजपर्यंत २५ ते ३० वेळेला पवना बँकेकडून कर्ज घेतलं आणि ते वेळेवर फेडलंही. पिंपरी-चिंचवड शहरातील तरुणांना मी सांगेन, की पवना बँक आपल्यासाठीच आहे. पुढे येऊन व्यवसाय करण्याची इच्छा व्यक्त केली, तर सर्व संचालक मंडळी आर्थिक पाठबळ देण्यासाठी तयार आहेत. आज व्यवसायातून मी वर्षाला जवळपास ७० कोटींची उलाढाल करतो आहे. हे केवळ पवना बँकेच्या आर्थिक पाठबळामुळेच शक्य झाले. पवना बँकेनं पन्नास वर्षांत दिमाखदार कामगिरी केली आहे. मला जसा बँकेचा लाभ झाला, तसा इतर तरुणांनीही करून घ्यावा !

**विजय विष्णू फुगे** (सभासद ग्राहक)





# पवना बँकेमुळेच स्कूल बस व्यवसाय वेगात

आम्ही भागीदारीत वाहतुकीचा व्यवसाय करतो. आमची रावेतमध्ये श्री गणेश ट्रान्सपोर्ट ही फर्म आहे. पूर्वी कंपन्यांच्या कामगारांची वाहतूक करीत होतो. दहा वर्षांपूर्वी शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करण्यासाठी २० स्कूल बस घेण्याचा निर्णय घेतला. इतकी मोठी रक्कम कोण देईल, असा प्रश्न होता. रावेत येथे पवना सहकारी बँकेची नवी शाखा सुरू झाली होती. आम्ही तिथं जाऊन आमची योजना सांगितली. तेथील व्यवस्थापकानं सर्व स्थितीची माहिती घेऊन कर्जाला होकार दिला. कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर काही दिवसांतच १९ स्कूल बससाठी तीन कोटींचं कर्ज मंजूर झालं. त्यानंतर बँकेच्या मदतीनंच स्कूल बसची संख्या वाढून ऐंशीवर गेली. त्यातून व्यवसायात भरच पडत गेली. मात्र, करोनाच्या काळात व्यवसाय ठप्प झाला. २७ बस विकाव्या लागल्या. अशा अडचणीच्या काळात बँक पाठीशी उभी राहिली. कर्जाच्या परतफेडीसाठी अधिक तगादा न लावता व्याज, हप्त्यांमध्ये सवलत दिली. करोनातील टाळेबंदी संपल्यानंतर बँकेनं साडेतीन कोटीचं कर्ज दिलं. आता पुन्हा पाच कोटींचं कर्ज घेतलं. आज ११५ स्कूल बस आहेत. व्यवसाय सुरळीत आहे, बँकेचे हप्तेही वेळेवर जात आहेत. गेल्या दहा वर्षांत संचालक मंडळ, अधिकाऱ्यांशी चांगले संबंध निर्माण झाले आहेत.

पवना बँकेऐवजी इतर कोणतीही राष्ट्रीयीकृत बँक असती, तर असं सहकार्य झालंच नसतं. करोनातील व्यवसायाच्या पडझडीनंतर आम्ही ७० ते ८० स्कूल बस नव्यानं घेतल्या. हे सर्व बँकेच्या जिवावरच करू शकलो. आम्हाला अधिकाधिक कर्ज आणि व्याजदरातही बँकेनं दिलासा दिला. आम्ही मित्रमंडळी, नातलगांनाही सातत्यानं बँकेची माहिती देत असतो. कागदपत्रं असतील, तर दोनच दिवसांत कर्ज मिळतं. दुसऱ्या एका बँकेत आमचं खातं होतं. खात्यावर दहा लाख रुपये होते. पण, कर्जाचा हप्ता खात्यातील रकमेतून जमा न करता आम्हाला थकबाकीदार दाखवण्यात आले. त्यातून दंडाची वसुलीही करण्यात आली. पवना बँकेत मात्र असे प्रकार कधीच होत नाहीत, हा आमचा अनुभव आहे. पवना बँक सर्व ग्राहकांची काळजी घेते. प्रत्येकाला मोठं करायचं आणि अडचणीत मदतीचा हात द्यायचा, ही पवना बँकेची भूमिका सातत्यानं दिसून आली.

**संदीप घोगजे, सनील हापसे**

(सभासद ग्राहक)

# उद्योगाचा पाया आणि भरारीही पवना बँकेमुळेच

विलास इंटरप्राइजेस आणि शिवम इंजिनिअरिंग ॲण्ड कंपनी अशा माझ्या दोन फर्म आहेत. १९९४ मध्ये पवना बँकेच्या चिंचवड शाखेत खातं उघडलं. २००४ मध्ये बँकेतून सुरुवातीला पाच लाखांचं कर्ज घेतलं. त्यातून व्यवसाय सुरू केला. या पाच लाखांपासून आजपर्यंत अडीच कोटींपर्यंत माझी मजल गेली आहे. ज्ञानेश्वरजी लांडगेसाहेब, कै. दिगंबरशेठ काळभोर यांच्यासह पवना बँकेतील सर्व संचालक आणि अधिकाऱ्यांनी त्यासाठी मोलाची मदत केली. व्यवसायामध्ये अनेकदा चढ-उतार येतात, अशा काळामध्ये पवना बँक आमच्या पाठीशी ठामपणे उभी राहिली. विश्वास ठेवून आर्थिक मदत केली. बँकेच्या विश्वासाला आम्हीही पात्र ठरलो. त्यातून व्यवसायाची प्रगती केली. आज जिल्ह्यांत जवळपास सर्व एमआयडीसीमध्ये माझे प्लॉट आहेत. गेल्या २० वर्षांपासून मी उद्योगांत आहे. पिंपरी-चिंचवड लघुउद्योग संघटनेत संचालक या पदावर, तर जेजुरी लघुउद्योग संघटनेतही काम करतो आहे.

पवना बँकेशी संबंध आल्यापासून इतर बँकांच्या संपर्कात कधी आलो नाही. इतर बँकांत व्याजदर तुलनेत कमी असतानाही केवळ संचालक मंडळ आणि अधिकारी-कर्मचाऱ्यांकडून मिळाणाऱ्या सन्मानाच्या वागणुकीमुळे पवना बँकेशी नातं कायम ठेवलं. पाच लाखांच्या कर्जावरून अडीच कोटी रुपयांपर्यंत मला नेले, हे केवळ पवना बँकेत होऊ शकते. सुरुवातीला टाटा मोटर्सची फॅब्रिकेशनची कामं केली. ऑटोमोबाइल स्पेअर पार्ट, लेबर चार्जेस, रबर मोल्डिंग आणि वेअर हाउस भाड्यानं देण्याची कामं माझ्या फर्मकडून केली जातात. पिंपरी-चिंचवड, चाकण, जेजुरी आणि रांजणगाव एमआयडीसीमध्ये माझी कामे चालतात. या उद्योगाचा पाया पवना बँकेमुळे रचला गेला. बँकेच्या संचालक मंडळाचे काम निःस्वार्थी आहे. अधिकारी वर्ग आपुलकीनं काम करतो. 'एक कुटुंब' या नात्याने ही मंडळी सभासद, ग्राहकांना वागणूक देतात. करोनाच्या काळातही बँकेनं सहकार्य केले. बँकेच्या मदतीतून आता चाकणमध्ये काम सुरू केले आहे. एक एकराच्या प्लॉटसाठी इतर बँकांचं कर्ज मिळू शकलं असतं, पण पडत्या काळात पवना बँकच माझ्यासोबत होती. त्यामुळे इतर बँकेत अद्याप खातंही काढलेलं नाही.

**विलास सोपानराव मेमाणे**
(सभासद ग्राहक)





# रस्त्यावरच्या माणसाचं जीवनच बदललं

लातूर-निलंग्याजवळ माझं मूळ गाव. पोटापाण्यासाठी पिंपरी-चिंचवडला आलो. रस्त्यावर अनेक व्यवसाय केले. थेरगावच्या डांगे चौकात केळी विकली. आता चिंचवडच्या केएसबी चौकाजवळ माझी वडापाव, चहाची टपरी आहे. पवना बँकेचं मुख्यालय पूर्वी याच भागात असताना एका किराणा मालाच्या दुकानात बँकेतील कर्मचारी खरेदीसाठी यायचे. दुकानदाराचं बँकेत खातं होतं. मलाही खातं उघडायचंय, असं मी त्यांना सांगितलं. ते जामीनदार झाले आणि २०१० मध्ये हजार रुपये भरून पवना बँकेत माझं खातं सुरू झालं. धंद्यात काही अडचणी होती, मुलंही मोठी होत असल्यानं त्यांचा शिक्षणाचा खर्च वाढत होता. गावाकडंही पैसे पाठवावे लागत होते. अशा काळात व्यवसायात आर्थिक पाठबळ शोधत होतो. पवना बँकेनं माझ्यावर विश्वास ठेवला. मला तीन लाखांचं पहिलं कर्ज दिलं. त्यामुळे मी अडचणींतून बाहेर येऊ शकलो. व्यवसाय वाढीसाठी बँकेच्या या मदतीनं संजीवनीचंच काम केलं. या कर्जाची परतफेड केल्यानंतर मुलीच्या विवाहासाठीही मला बँकेनं कर्जाच्या रूपानं मदत केली.

बँकेने वेळोवेळी दिलेल्या मदतीमुळे व्यवसाय, कुटुंबातील आर्थिक अडचणी दूर होऊन माझ्या व्यवसायाला गती मिळाली. इथं आणि गावाकडचं घर सुस्थितीत चालवण्यासह मुलांचं शिक्षण केलं. इतकंच नव्हे, तर व्यवसायाच्या प्रगतीतून सासवडला चार गुंठे जागा घेतली. गावाला शेतजमीन खरेदी केली. लातूरला तालुक्याच्या ठिकाणीही एक गुंठा जागा घेऊ शकलो. पवना बँकेत सेवकापासून अधिकाऱ्यांपर्यंत सर्वांकडून चांगली वागणूक मिळते. अगदी घरच्यासारखं ही लोकं संबंध ठेवतात. अडचणीत असलेल्या माझ्यासारख्या प्रत्येकासाठी मदतीची भावना ठेवतात. मी रस्त्यावरचा माणूस, मला कोणीही सहकार्य करत नव्हतं. पूर्वी दुसऱ्या एका बँकेकडे कर्ज मागायला गेलो होतो. पण, माझ्यासारख्या रस्त्यावर व्यवसाय करणाऱ्या माणसाला त्यांनी कर्ज दिलं नाही. पवना बँकेच्या संपर्कात आल्यानंतर मात्र माझं जीवनच बदलून गेलं !

**विजयकुमार मनोहर सूर्यवंशी**
(सभासद ग्राहक)

# वाहतूक व्यवसाय
# प्रगतीला मदतीचं इंधन

पवना सहकारी बँकेशी माझा संबंध १९८७ पासूनचा. ट्रकच्या माध्यमातून मी वाहतूक व्यवसायात पाऊल ठेवलं. हा ट्रक घेण्यासाठी त्या वेळी पवना बँकेकडून एक लाख २० हजारांचं कर्ज मिळालं होतं. बँकेच्या याच मदतीनं पुढील काळात १८ ट्रक झाल्या. बँकेनं वेळोवेळी मदत केल्यानं एकूण ३० गाड्यांचा व्यावसाय झाला. दरम्यानच्या काळात एमआयडीसीतील विविध कंपन्यांतून कामगारांची वाहतूकही सुरू केली होती. त्यासाठी सुरुवातीला तीन बस घेतला होत्या. ट्रक आणि बसच्या माध्यमातून व्यवसाय सुरू असतानाच १९९६ मध्ये स्कूल बसच्या व्यवसायात उतरलो. पहिल्याच वर्षी एस. बी. पाटील संस्थेत पाच बसचे काम मिळालं. त्यानंतर १० बस घेण्यासाठी पुन्हा पवना बँकनं आर्थिक पाठबळ दिलं. त्यानंतर व्यवसायानं भरारी घेतली. आज ३२ बस आहेत. त्यासाठी पवना बँकेनंच वेळोवेळी मदत केली.

बँकेतील संचालक मंडळ, अधिकारी, कर्मचारी सर्वांनी आजवर सहकार्य दिलं. एका कुटुंबाप्रमाणं नातं तयार झालं. दुसऱ्या एका सहकारी बँकेशीही मी संबंधित आहे. मात्र, तिथं मिळणारी वागणूक आणि पवना बँकेत मिळणारा जिव्हाळा, यात मोठा फरक आहे. माझ्या भावाची अभिजित इंजिनिअर्स ही फर्म आहे. या फर्मलाही मी बँकेशी जोडलं. बँकेनं त्यांच्याही सुरुवातीच्या काळात मोठी मदत केली. आज त्यांचे चार युनिट झाले असून, २५० कोटींची वार्षिक उलाढाल झाली आहे. गेल्या ३० ते ३२ वर्षांपासून मी बँकेचा प्रवास पाहतो आहे. एका छोट्या रोपट्यापासून आज वटवृक्षात रूपांतर झालं आहे. कर्मचाऱ्याचा प्रामाणिकपणा, संचालकांचे खातेदारांशी नातं चांगलं आहे. ग्राहकांशी कशा प्रकारे वागणूक ठेवायची, याचं चांगलं प्रशिक्षण बँकेतील कर्मचाऱ्यांना देण्यात आलं आहे. बँकेत प्रत्येकाला चांगली वागणूक दिली जाते. बँकेबाबतचे हे चांगले अनुभव प्रत्येकाला सांगत असतो.

**बाळकृष्ण विठ्ठल उरे**
(सभासद ग्राहक)





# दोन पिढ्यांपासून विश्वासाचं नातं

पवना बँकेशी आमचा संबंध दोन पिढ्यांचा आहे. १९८० मध्ये वडिलांनी या बँकेत व्यवसायासाठी खातं सुरू केलं होतं. तेव्हा वडिलांचा वीटभट्टीचा व्यवसाय होता. त्यांच्या बरोबरीनं आणि त्यांच्या नंतर मीही बँकेत व्यवहार सुरू ठेवले आहेत. वडिलांच्या व्यवसायाला बँकेनं मोठी मदत केली. त्यातून सुरुवातीला वीटभट्टीच्या व्यवसायाला हातभार लागला. त्यानंतर ट्रान्सपोर्ट आणि बांधकाम व्यवसायात मजल मारली. प्रत्येक वेळेला बँक ठामपणे पाठीशी उभी राहिली. आता मी व्यवसाय पुढं घेऊन जात आहे. चाळीस वर्षांपासून आमचं बँकेत खातं असल्यानं मी लहानपणापासून बँकेतील घडामोडी पाहिल्या आहेत. निःस्वार्थपणे आणि विश्वासानं येथे सातत्यानं होत असलेलं काम पाहिलं आहे. संचालक मंडळातील सर्व मंडळी परिचयाची आहेत. ज्ञानेश्वरजी लांडगेसाहेबांच्या विश्वासावर आमच्या ठेवी आणि बँकेतील व्यवहार आहेत.

आता बँकिंग क्षेत्रात भरपूर पर्याय निर्माण झाले आहेत. राष्ट्रीयीकृत बँकांसह सहकारी बँकाही आहेत. पण, वडिलांपासून आजपर्यंत आम्ही इतर बँकांचा पर्याय निवडला नाही. संचालक मंडळी भक्कमपणे आमच्या पाठीशी उभं राहतात. त्यातून पवना बँकेबाबत एक विश्वासाचं अनोखं नातं गेल्या अनेक वर्षांत निर्माण झालं आहे. बँकेची सेवा आणि कर्मचाऱ्यांकडून मिळणारं सहकार्यही उत्तम आहे. व्यवहाराबाबत काहीही अडचण आल्यास कोणत्याही प्रसंगी कर्मचारी-अधिकारी मदतीला तत्पर असतात. त्यामुळे दुसरीकडे जाण्याचा प्रश्नच कधी आला नाही. मोठ्या प्रमाणावर शाखा उघडण्यापेक्षा सुरू केलेली प्रत्येक शाखा सुस्थितीत चालवून टिकवायची, हे बँकेचं धोरण आहे. व्यावसायिकदृष्ट्या त्यांचं हे धोरण उत्तम आहे. बँकेची वाटचाल आणखी उज्ज्वल व्हावी, याच आमच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त बँकेला शुभेच्छा !

**अभय ज्ञानेश्वर लायगुडे**
(सभासद ग्राहक)

# ५० वर्षांतील यशाची झेप

## ठेवी




## कर्ज वितरण




## भागधारक



## भविष्यातील उद्दिष्टांची भरारी

- अधिकाधिक नागरिकांना लाभ देण्यासाठी बँकेच्या शाखांचा विस्तार
- बँकेला ‘शेड्युल्ड’ दर्जा मिळवून देण्यासाठी प्रयत्न
- ग्राहकांसाठी ऑनलाइन बँकिंग सुविधा
- पुढील पाच वर्षांत बँकेचा व्यवसाय २००० कोटींवर नेण्याचे उद्दिष्ट
- शाखांच्या इमारती स्वमालकीच्या करण्यावर भर

### ठेवी वाढीचे लक्ष्य




## सुलभ प्रक्रियेने कर्ज घ्या...

- प्रत्येक कर्जासाठी कमीत कमी व्याजदर
- कर्जाच्या मंजुरीची प्रक्रिया जलद
- काळानुरूप आणि नागरिकांच्या गरजेनुसार कर्जाच्या योजनांत बदल
- कर्जासाठी सोपी, सुलभ प्रक्रिया आणि खर्चही कमी

### कर्ज वितरणाचे लक्ष्य



# सर्वसामान्यांच्या
# आर्थिक पाठबळासाठी...



## कर्जाच्या ठळक योजना

### पवना उन्नती कर्ज योजना
छोट्या व्यापाऱ्यांना व्यवसाय वाढवण्यासाठी या योजनेचा लाभ होतो. (५० हजारांपर्यंतचे कर्ज)

### पवना प्रगती कर्ज योजना
महिला व्यापाऱ्यांना व्यवसाय वाढवण्यासाठी या योजनेचा फायदा होतो. ( एक लाखांपर्यंतचे कर्ज)

### स्वावलंबन कर्ज योजना
दिव्यांग, अपंग व्यावसायिकांना उद्योग उभारणीसाठी या योजनेचा लाभ होतो. (एक लाखांपर्यंतचे कर्ज)

### पवना फार्मा कर्ज योजना
मेडिकल व्यावसायिकांना व्यवसाय उभारणीसाठी या योजनेचा फायदा होतो. (२५ लाखांपर्यंत कर्ज)

### पवना शेती कर्ज योजना
शेतकऱ्यांना शेतीसाठी किंवा शेतीपूरक व्यवसाय करण्यासाठी या योजनेचा लाभ होतो. (२५ लाखांपर्यंत कर्ज)

### पवना एमएसएमई कर्ज योजना
लघु आणि मध्यम उद्योग-धंद्यांना चालना मिळण्यासाठी या योजनेचा लाभ होतो. (२५ लाखांपर्यंतचे कर्ज)

### पवना सोलर कर्ज योजना
सौर यंत्रणा बसवून विजेची मोठ्या प्रमाणावर बचत करण्यासाठी या योजनेचा फायदा होतो.
(२५ लाखांपर्यंत कर्ज)

### पवना सोनेतारण कर्ज
सर्व प्रकारच्या वर्गातील नागरिकांना या योजनेत तत्पर कर्जपुरवठ्याची मदत होते. (दोन लाखांपर्यंतचे कर्ज)
नोकरदार आणि व्यावसायिक वर्गातील नागरिकांना या योजनेत कर्ज मिळते. (दोन लाखांपुढील कर्ज)

### पवना वाहन स्वप्नपूर्ती कर्ज
सर्व वर्गवारीतील नागरिकांना आपल्या वाहनाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी या योजनेची मदत होते. (व्यावसायिक आणि खासगी वाहन)

### पवना इलेक्ट्रिक वाहन कर्ज
इंधनाची बचत करण्यासाठी विजेवर चालणारी वाहने उपयुक्त ठरतात. त्यामुळे या योजनेचा फायदा होतो. (खासगी वाहन)



# पवना बँकेचा शाखा विस्तार




## चिंचवड शाखा

एच- ब्लॉक, प्लॉट नं. सी- २०,
पिंपरी औद्योगिक वसाहत,
ऑटो क्लस्टरजवळ, चिंचवड,
पुणे- ४११०१९
फोन- ८२३७०८५७७८/७९




## कासारवाडी शाखा

संत तुकारामनगर एसटी
स्टँडसमोर, पिंपरी,
पुणे- ४११०१८
फोन- ८२३७०८५७८०/ ८१




## भोसरी शाखा

हिरा प्लाझा, गाळा क्र.
यूजी ६, ७, संत ज्ञानेश्वर
हॉस्पिटलशेजारी, पुणे-नाशिक
रोड, भोसरी, पुणे- ४११०३९
फोन- ८२३७०८५७८२/ ८३




## पिंपरी शाखा

नाणेकर कॉम्प्लेक्स, नव
महाराष्ट्र विद्यालयाजवळ.
पिंपरी गाव, पुणे- ४११०१७
फोन- ८२३७०८५७८४/ ८५




## काळेवाडी शाखा

मधुरा, स. नं. १३, जुना
मुंबई- पुणे महामार्ग, थेरगाव,
पुणे- ४११०३३
फोन- ८२३७०८५७८६/ ८७




## आकुर्डी शाखा

स. नं. ४३३७, बजाज ऑटो
कंपनीसमोर, पुणे-मुंबई रस्ता,
आकुर्डी, पुणे- ४११०३५
फोन- ८२३७०८५७८८/ ८९




## वाकड शाखा

प्रथमेश संकुल,
स. नं. २४१/ ३ / १, वाकड,
ता. मुळशी, जि. पुणे- ४११०५७
फोन- ८२३७०८५७९०/ ९१




## सोमाटणे फाटा शाखा

शॉप नं. १२०- १२४, त्रिमूर्ती
कॉम्प्लेक्स, गट नं. १६७
परंदवाडी रोड, सोमाटणे फाटा,
ता. मावळ, जि. पुणे- ४१०५०६
फोन- ८२३७०८५७९३




## चिंबळी फाटा शाखा

गट नं. ९३/ १ अ, पुणे-नाशिक
रस्ता, चिंबळी फाटा, ता. खेड,
जि. पुणे- ४१०५०१
फोन- ८२३७०८५७९४/ ९५




## रावेत शाखा

भोंडवे कॉर्नर, युनिट नं. १०३,
से. नं. २०९, बल्क प्लॉट १३/१,
पी.सी.एन.डी.टी.ए., रावेत,
पुणे- ४१२१०१
फोन- ८२३७०८५७९६/ ९७




## आळंदी शाखा

सर्व्हे नं. १२९, स्वामी सर्व्हिस
स्टेशनशेजारी, पुणे-आळंदी
रस्ता, देहू फाटा, आळंदी,
पुणे- ४१२१०५
फोन- ८२३७०८५८००/ १




## दापोडी शाखा

शितळा देवी चौक, सिद्धी टॉवर,
ए विंग. दापोडी-पिंपळे गुरव
रस्ता, गणेशनगर, दापोडी,
पुणे- ४११०१२
फोन- ८२३७०८५७९८/ ९९




## वाघोली शाखा

गुलाबतारा कॉम्प्लेक्स, गट नं.
६१५, पुणे-नगर रोड, केसनंद
फाटा, वाघोली, ता. हवेली,
जि. पुणे- ४१२२०७
फोन- ८२३७०८५८०२/ ३




## पाषाण शाखा

स. नं. २०/ २, अवंती हाइटस्,
बाणेर रोड, सोमेश्वरवाडी,
पाषाण, पुणे- ४११००८
फोन- ८२३७०८५८०४/ ५




## देहूगाव शाखा

स. नं. ३/ १ अ, मेन रोड,
देहूगाव, ता. हवेली,
जि. पुणे- ४१२१०९
फोन- ८२३७०८५८०६/ ७




## वडगाव शाखा
५११, रेल्वे स्टेशन रोड, पंचायत समिती कार्यालयासमोर,
वडगाव, ता. मावळ,
जि. पुणे- ४१२१०६
फोन- ८२३७०८५८०८/ ९




## स्पाइन रोड शाखा
सेक्टर नं. ४, प्लॉट नं. २८२ / ए, पुणे-नाशिक रोड, मोशी प्राधिकरण, पुणे- ४१२१०५
फोन- ८२३७०८५८१०/ ११




## कामशेत शाखा
सर्व्हे नं. ९१/ २ बी, स्वामी समर्थ एरंडे कॉम्प्लेक्स, पुणे-मुंबई हायवे, कामशेत, पुणे- ४१०४०५
फोन- ८२३७०८५८१२/ १३




## शिक्रापूर शाखा
गट क्र. ४६६ / २, शॉप क्र. १०, ११, जगताप कॉम्प्लेक्स,
शिक्रापूर, ता. शिरूर,
जि. पुणे- ४१२२०८
फोन- ८२३७०८५९१४/ १५




## मारुंजी नेरे शाखा
सर्व्हे नं. ७८, हिस्सा नं. ९,
मारुंजी, ता. मुळशी,
जि. पुणे- ४१११०५७
फोन- ८२३७०८५८१६/ १७




## इंदुरी शाखा
सिटी सर्व्हे नं. ४४४, ४४५, ४४६, ४४७ आणि ४४८, मु. पो. इंदुरी, तळेगाव-चाकण रस्ता, इंदुरी किल्ल्यासमोर, ता. मावळ,
जि. पुणे- ४१०५०७
फोन- ८९५६८२६१०५/ ६




## चिखली शाखा
सिटी सर्व्हे नं. ४९४, ४९६, पीएमपीएल चिखली बस स्टॉपजवळ, चिखली, ता. हवेली, जि. पुणे- ४११०६२
फोन- ८९५६८२६१०७/ ८



# बँकेच्या यशावर पुरस्कारांची मोहोर...

- को-ऑपरेटिव्ह २०२१ (नवभारत)
- बँको ब्लू रिबन २०२२ (अविज पब्लिकेशन)
- बँको पुरस्कार २०१७ प्रथम क्रमांक (अविज पब्लिकेशन)
- शून्य टक्के एनपीए ॲचिव्हमेंट गौरवचिन्ह २००६ (पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशन)
- ढोबळ एनपीएचे प्रमाण पाच टक्क्यांपेक्षा कमी ठेवल्याबद्दल गौरव २०१५-१६ (पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशन)
- शून्य टक्के एनपीए ॲचिव्हमेंट गौरवचिन्ह २००९-१० (पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशन)
- को-ऑपरेटिव्ह बँकिंग अवार्ड २००६ PARTICIPANT (बँकिंग फ्रंटियर्स)
- को-ऑपरेटिव्ह बँकिंग अवार्ड २००८ PARTICIPANT (बँकिंग फ्रंटियर्स)
- को- ऑपरेटिव्ह बँकिंग अवार्ड २०१० PARTICIPANT (बँकिंग फ्रंटियर्स)
- शून्य टक्के एनपीए ॲचिव्हमेंट गौरवचिन्ह २००७ (पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशन)
- शून्य टक्के एनपीए ॲचिव्हमेंट गौरवचिन्ह २००८ (पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशन)
- ढोबळ एनपीएचे प्रमाण पाच टक्क्यांपेक्षा कमी ठेवल्याबद्दल गौरव २०१६-१७ (पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशन)
- बेस्ट मोबाइल ॲप २०१७ (बँकिंग फ्रंटियर्स)
- ढोबळ एनपीएचे प्रमाण पाच टक्क्यांपेक्षा कमी ठेवल्याबद्दल गौरव २०१४-१५ (पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशन)
- शून्य टक्के एनपीए ॲचिव्हमेंट गौरवचिन्ह २०१०-११ (पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशन)
- सन्मानचिन्ह २००८- सभासद बँकेत पंचवीस वर्षांपेक्षा अधिक वर्षे संचालक म्हणून सेवा केल्याबद्दल ज्ञानेश्वरजी लांडगेसाहेब यांना सन्मानचिन्ह (पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशन)
- रौप्य महोत्सवी वर्ष २०१०-११ सन्मानचिन्ह (नॅशनल इन्स्टिट्युट फॉर बँकिंग एज्युकेशन ॲण्ड रिसर्च)
- राज्यव्यापी वार्षिक अहवाल स्पर्धा, द्वितीय क्रमांक (सहकार सुगंध- प्रतिबिंब)
- शून्य टक्के एनपीए ॲचिव्हमेंट गौरवचिन्ह २००८ (पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशन)
- उत्कृष्ट बँक सेवा २००१ (अण्णासाहेब मगर सोशल फाउंडेशन)
- बँको ब्लू रिबन २०२० परीक्षक पुरस्कार (अविज पब्लिकेशन)
- बँको पुरस्कार २०१४ तृतीय क्रमांक (अविज पब्लिकेशन)
- राज्यव्यापी वार्षिक अहवाल स्पर्धा द्वितीय क्रमांक २०१३ (सहकार सुगंध- प्रतिबिंब)
- बँको पुरस्कार २०१६ द्वितीय क्रमांक (अविज पब्लिकेशन)
- उत्कृष्ट एनपीए व्यवस्थापन पुरस्कार २०१३-१४ (पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशन)
- शून्य टक्के एनपीए ॲचिव्हमेंट गौरवचिन्ह २००८-०९ (पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशन)
- बेस्ट अधिग्रहनकर्ता अवार्ड (बँकिंग फ्रंटियर्स)
- समर्पण पुरस्कार (ग्रीन वर्ल्ड पब्लिकेशन)




बँको
पुरस्कार २०१६
लि., चिंचवड.
द्वितीय क्रमांक
बँको
BLUE RIBBON
Ceremony
2020
परिक्षक पुरस्कार
FCBA
Pavana Sahakari
Bank Ltd, Pune
for
Best Acquirer Award
in Small UCB Category
FIS
पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक्स्
असोसिएशन लि., पुणे
विजय ढेरे
अध्यक्ष
पवना सहकारी बँक लि., पुणे

# क्षण आठवणींचे...




आळंदी शाखेच्या उद्घाटन प्रसंगी मान्यवरांची उपस्थिती



३० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत प्रशासक व इतर सभासद




वाघोली शाखेच्या उद्घाटन प्रसंगी बँकेचे तत्कालीन अध्यक्ष मा. शांताराम गराडे मनोगत व्यक्त करताना



शिक्रापूर शाखेचे उद्घाटन करताना मा. ना. बाबुराव पाचारणे




३१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत प्रशासनसमवेत चर्चा करताना सभासद




सोमाटणे फाटा शाखेस सदिच्छा भेट प्रसंगी  उपमुख्यमंत्री मा.ना.अजित पवार



जुन्या मुख्य कार्यालय उद्घाटन प्रसंगी संचालक व कर्मचारी वर्ग



जुन्या मुख्य कार्यालयाच्या पायभरणी वेळेचा प्रसंग



जुन्या मुख्य कार्यालयाचा तत्कालीन आराखडा



जुन्या मुख्य कार्यालयाच्या उद्घाटन प्रसंगी संचालक मंडळ



जुन्या मुख्य कार्यालयाच्या पायभरणी वेळेचा प्रसंग




आळंदी शाखेच्या उद्घाटन समारंभात बँकेचे तत्कालीन अध्यक्ष मा. शांताराम गराडे मनोगत व्यक्त करताना




३२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत मार्गदर्शन करताना संचालक श्री. ज्ञानेश्वर लांडगे




३३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित संचालक मंडळ



३४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सभासदांचे मनोगत ऐकताना संचालक मंडळ



मा. अध्यक्ष सभासदांना मार्गदर्शन करताना




३५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस मार्गदशन करताना संचालक श्री. ज्ञानेश्वर लांडगे




इंदुरी शाखेचे उद्घाटन प्रसंगी मा.आ.संजय तथा बाळा भेगडे मनोगत व्यक्त करताना



इंदुरी शाखेचे उद्घाटन करताना
मा. आमदार संजय तथा बाळा भेगडे



पाषाण शाखेचे उद्घाटन प्रसंगी मनोगत व्यक्त करताना
मा. आ. विनायकशेठ निम्हण




पाषाण शाखा उद्घाटन प्रसंगी मा. आ. विनायकशेठ निम्हण व इतर मान्यवर




रावेत शाखेचे उद्‌घाटन करताना मा. आ. लक्ष्मणभाऊ जगताप




रावेत शाखा उद्‌घाटन प्रसंगी बँकेचे तत्कालीन अध्यक्ष श्री. दामोदर गव्हाणे मनोगत व्यक्त करताना



मारुंजी शाखा उद्‌घाटन प्रसंगी दीप प्रज्वलन करताना मान्यवर




मारुंजी शाखा उद्‌घाटन प्रसंगी उपस्थित मान्यवर मंडळी




कामशेत शाखेच्या उद्घाटन प्रसंगी दिप प्रज्वलन करताना मान्यवर




मारुंजी शाखा उद्घाटन प्रसंगी मनोगत व्यक्त करताना बँकेचे अध्यक्ष श्री. ज्ञानेश्वर लांडगे व इतर मान्यवर




स्पाइन रोड शाखा उद्घाटन प्रसंगी मनोगत व्यक्त करताना बँकेचे अध्यक्ष श्री. ज्ञानेश्वर लांडगे




३६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत मनोगत व्यक्त करताना संचालक श्री. विठ्ठल काळभोर




बँकेच्या ३७ वा वर्धापन दिनी मनोगत व्यक्त करताना खातेदार
श्री. गुलाब मोहम्मद शेख




बँकेच्या ३७व्या वर्धापनदिनी दीप प्रज्यालन
करताना मा. संचालक मंडळ




वडगांव शाखेचे उद्घाटन प्रसंगी दीप प्रज्वलन करताना मान्यवर



३८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत कै. अण्णासाहेब मगर यांच्या फोटोचे पूजन करताना मान्यवर




३८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत मार्गदशन करताना संचालक श्री. ज्ञानेश्वर लांडगे




बँकेच्या ३८ व्या वर्धापन दिनानिमित्त मनोगत व्यक्त करताना संचालक श्री. दामोदर गव्हाणे




बँकेच्या ३९ वा वर्धापन दिनानिमित्त मनोगत व्यक्त करताना
संचालक श्री.दामोदर गव्हाणे




वार्षिक सर्वसाधारण सभेला संबोधित करताना
संचालक श्री. विठ्ठल काळभोर




कामशेत शाखा उद्‌घाटन प्रसंगी मनोगत व्यक्त करताना बँकेचे अध्यक्ष श्री. ज्ञानेश्वर लांडगे



वार्षिक सर्वसाधारण सभेत दीपप्रज्वलन करताना संचालक मंडळ



वार्षिक सर्वसाधारण सभेत मार्गदर्शन करताना मा. ज्ञानेश्वरजी लांडगेसाहेब



४० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत दीप प्रज्वलन करताना संचालक मंडळ




४० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत मनोगत व्यक्त करताना संचालक श्री. शिवाजीराव वाघेरे




४० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत मनोगत व्यक्त करताना अध्यक्ष ज्ञानेश्वरजी लांडगेसाहेब



४० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित जनसमुदाय




४० वा वर्धापन दिन साजरा करताना संचालक मंडळ व इतर मान्यवर




४१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत मनोगत व्यक्त करताना
संचालक श्री.विठ्ठल काळभोर




बँकेच्या ४१ वा वर्धापनदिनानिमित्त उपस्थित
संचालक मंडळ व इतर मान्यवर



बँकेचा ४२ वा वर्धापनदिन साजरा करताना संचालक मंडळ



बँकेच्या ४२ वा वर्धापन दिनी मनोगत व्यक्त
करताना संचालक श्री. ज्ञानेश्वर लांडगे




४२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत बँकेसंदर्भात माहिती देताना संचालक श्री.वसंत लोंढे




४४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत मनोगत व्यक्त करताना अध्यक्ष श्री. ज्ञानेश्वर लांडगे




वडगांव शाखेचे उद्घाटन प्रसंगी एटीएमची माहिती घेताना मान्यवर




४५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत बँकेविषयी माहिती देताना मुख्यकार्यकारी अधिकारी मनेश बोऱ्हाडे




४६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेकरिता उपस्थित संचालक मंडळ



बँकेच्या ४६ वा वर्धापनदिनानिमित्त दीप प्रज्वलन
करताना मा. संचालक मंडळ




बँकेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या लोगोचे अनावरण करताना मा. अध्यक्ष आणि संचालक मंडळ



# पवनापर्व

## विश्वासाची सुवर्णझेप


प्रकाशक

**पवना सहकारी बँक लि., पुणे**

मुख्य कार्यालय- एच ब्लॉक,
प्लॉट नं. २०, पिंपरी औद्योगिक वसाहत,
ऑटो क्लस्टरजवळ, चिंचवड, पुणे ४११०१९

संकल्पना, लेखन व संपादन

**फोर्थ इस्टेट मिडिया**

६७, वैष्णव माता मार्ग, सेक्टर नं. ३,
इंद्रायणीनगर, भोसरी, पुणे ४११०३९
संपर्क : ९९२२९१८८३१

फोटोग्राफी : **ब्रेकिंग कोकोनट**

डिझाईन : **प्रभाकर भोसले**

(खासगी वितरणासाठी)